उत्पन्नाचे कार्यात्मक वितरण उत्पादनातील प्रत्येक घटक (जमीन, कामगार, भांडवल) प्राप्त झालेल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा समजावून सांगण्याचा प्रयत्न करते. ही पद्धत संपूर्णपणे भाड्याने (खंड), व्याज आणि नफ्याच्या स्वरूपात घटकांद्वारे मिळविलेले उत्पन्न पाहते. ही पद्धत विशिष्ट वैयक्तिक उत्पन्नाशी संबंधित नाही. उत्पन्नाचे कार्यात्मक वितरण ही अभ्यासाची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणून उदयास आली आहे. हा घटक उत्पादनास दिलेल्या योगदानाद्वारे उत्पादनातील घटकांच्या उत्पन्नाचे स्पष्टीकरण देतो. पुरवठा आणि मागणी वक्र प्रत्येक उत्पादक घटकाची युनिट (एकक) किंमत निश्चित करण्यासाठी गृहित धरले जाते. जेव्हा या युनिट (एकक) किंमती रोजगाराच्या प्रमाणात वाढवतात, तेव्हा आपल्याला प्रत्येक घटकास एकूण देयके मिळतात. उदाहरणार्थ, कामगारांचा पुरवठा आणि मागणी वेतन दर निश्चित करणे जेव्हा हे वेतन एकूण रोजगाराच्या पातळीने गुणले जाते. तेव्हा त्यास वेतन बिल म्हटले जाते. अशाप्रकारे उत्पन्नाचे कार्यात्मक वितरण हा वितरण अभ्यासाचा एक अतिशय संबंधित आणि महत्त्वाचा भाग आहे.

**आर्थिक वाढ आणि उत्पन्न असमानता :**

देशातील नागरिकांच्या प्रगतीची पातळी व आरोग्याची पातळी निश्चित करण्यासाठी उत्पन्नाची असमानता हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. विकसनशील देशांनी वाढ आणि विकास

करुनही बहुसंख्य लोकसंख्या गरीबच आहे. अशाप्रकारे आर्थिक प्रगती नंतरही असमानता वाढली आहे. असमानतेची पैलू आहेत. अनुलंब / लंबरेषा असमानता ही असमानतेचे पारंपारिक मापन आहे ज्याची चर्चा विकास धोरणात केली जाते. क्षैतिज असमानता ही वंश, धर्म, भाषा, वर्ग, लिंग इत्यादींच्या आधारे समाजातील भिन्न गटांशी कसे वागावे याबद्दल संबंधित आहे. दोन्ही उपाय (मापन) लोकांच्या कल्याणकारीतेचे (आरोग्य / हित) मूल्यांकन / मूल्यमापन करण्यास मदत करतात असे अनुभवास आले आहे की, अर्थव्यवस्था ही पारंपारिक अर्थव्यवस्था ते आधुनिक अर्थव्यवस्था अशी जसजशी वाढत जाते तसतसे वैयक्तिक उत्पन्नाच्या वितरणामध्ये वाढती असमानता देखील वाढत जाते. असमानता लोकांचे कडक स्वभाव आणि कौशल्य यासारख्या विविध कारणांमुळे उद्भवू शकते. सर्वांसाठी संधीसुद्धा उपलब्ध नसणे हे सुद्धा असमानतेस कारणीभूत ठरते. योग्य कर प्रणालीची कमतरता आणि वैयक्तिक क्षमतेतील फरक यामुळे असमानता उद्भवू शकतात. त्यानंतर अधिक विकासात्मक प्रयत्न केले असता त्या प्रयत्नांसह असमानता कमी होईल. क्षैतिज असमानता असे दर्शविते की आर्थिक फरक, सामाजिक मर्यादा आणि राजकीय शक्ती या एकत्रितपणे समाजातील विविध गटांमध्ये असमानता कशा निर्माण करतात, हे गट भिन्न वंश, धर्म, लिंग, वर्ग किंवा भाषेचे असू शकतात. क्षैतिज असमानतेमुळे समाजात संघर्ष होऊ शकतो ज्याचा विकास प्रक्रियेवर विपरित परिणाम होतो.

असमानता अर्थव्यवस्थेवर विविध प्रकारे विपरित परिणाम करते. म्हणूनच आर्थिक वाढीचा जोपर्यंत प्रश्न आहे. वाढलेली असमानता ही गरीबांमध्ये असंतोष, वाईट भावना आणि निराशेची भावना निर्माण करते ज्यामुळे गृह युद्ध (नागरी / यादवी युद्ध) देखील होऊ शकते. अत्यंत / कमालीच्या असमानतेमुळे आर्थिक असमर्थता येते. असमानतेमुळे संसाधनांचे अकार्यक्षम वाटप होऊ शकते. उदाहरणार्थ, उच्च असमानतेमुळे चांगल्या प्रतीच्या सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची किंमत मोजून त्याला डावलून उच्च शिक्षणावर जास्त जोर दिला जातो. उच्च असमानतेमुळे अत्यधिक गटबाजी, मोठी राजकीय देणगी, लाचखोरी आणि क्रोध भाव यासारख्या कृती होतात.

## १.६ लुईस / लेवीसचा विकास सिद्धांत (रचनात्मक / संरचनात्मक बदल प्रतीमान)

रचनात्मक / संरचनात्मक बदल प्रतीमान या यंत्रणेवर लक्ष केंद्रित करते, ज्याद्वारे अविकसित अर्थव्यवस्था त्यांच्या आर्थिक संरचनांना कृषी अभिमुखतेपासून आधुनिक औद्योगिक आणि सेवाभिमुख अर्थव्यवस्थेमध्ये रुपांतरित करतात. हे परिवर्तन कसे घडते ? याचे वर्णन करण्यासाठी नवसनातनवादी किंमत आणि संसाधन वाटप सिद्धांत आणि आधुनिक इकोनोमेट्रिक्सचे टोल वापरतात. रचनात्मक / संरचनात्मक बदल प्रतीमानाचा एक प्रतिनिधी सिद्धांत म्हणजे डब्लू आर्थर लुईसचा दोन क्षेत्रातील अतिरिक्त कामगार सिद्धांत.

### मुलभूत सिद्धांत (दोन क्षेत्र अर्थव्यवस्था) :

लुईसचे दोन क्षेत्र प्रतिमान हे ६० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात आणि ७० च्या दशकाच्या सुरुवातीस अतिरिक्त कामगार असलेल्या विकसनशील देशांच्या विकास प्रक्रियेचे सामान्य प्रतिमान बनले. लुईस प्रतीमानामध्ये अविकसित देशांमध्ये दोन विभाग असतात. एक पारंपारिक आणि दूसरा आधुनिक जास्त लोकसंख्या असलेल्या पारंपारिक ग्रामीण निर्वाह क्षेत्र

जिथे कामगारांची सीमांत उत्पादकता शून्य आहे. या प्रतिमानाचे प्राथमिक लक्ष हे श्रम हस्तांतरणाच्या प्रक्रियेवर आणि आधुनिक क्षेत्रात उत्पादन आणि रोजगाराच्या वाढीवर आहे. कामगारांना ग्रामीण भागातून स्थलांतर करण्यास प्रवृत्त करण्यासाठी शहरी वेतन सरासरी ग्रामीण वेतनाच्या तुलनेत ३०% जास्त असेल. असा विश्वास लुईसने धरला. शहरी मजुरी स्थिर असल्याचे गृहित धरले जाते आणि म्हणूनच या वेतन दरावर कामगारांचा पुरवठा अगदी लवचिक आहे.




**शहरी क्षेत्रातील भांडवलदार अधिशेष :**

OS हे निर्वाह क्षेत्रात सरासरी निर्वाह वेतन दर्शविते आणि OW हे शहरी क्षेत्रातील भांडवलशाही वेतनाचे प्रतिनिधीत्व करते. शहरी क्षेत्रातील OW वेतन दरात कामगारांचा पुरवठा हा अमर्यादित आहे आणि तो WW क्षैतिज पुरवठा वक्रांद्वारे दर्शविला जातो. सुरुवातीला, जेव्हा शहरी क्षेत्रात ON1 कामगार कार्यरत असतात, तेव्हा त्यांचा सीमान्त उत्पादकता वक्र हा P1L1 आहे आणि क्षेत्राचे एकूण उत्पादन हे OP1Q1N1 आहे. या एकूण उत्पादनापैकी कामगारांना OWQ1N1 या क्षेत्राच्या इतके वेतन दिले जाते. हे एकूण वेतन बील आहे (वेतन दर OW गुणिले कामगार संख्या ON1). उर्वरित क्षेत्र WP1Q1 हे अतिरिक्त उत्पादन आहे. हा शहरी क्षेत्रातील भांडवलदाराचा वाढावा / आधिक्य आहे. जेव्हा हा अतिरिक्त वाढावा पुन्हा गुंतवला जातो तेव्हा सीमान्त उत्पादकता वक्र हा वर सरकतो आणि P2L2 वर जातो. त्यामुळे उत्पादनात आणि रोजगारात वाढ होते. आता भांडवलदाराचा वाढावा आणि रोजगार अनुक्रमे WP2Q2 आणि ON2 इतका मोठा आहे. अतिरिक्त उर्वरित कामगार शहरी क्षेत्रामध्ये आत्मसात / शोषून घेईपर्यंत उर्वरित वाढावा गुंतवणूकीची ही प्रक्रिया सुरु राहते. यानंतर, कामगार पुरवठा वक्र सकारात्मक उतार गृहित धरेल आणि वेतन आणि रोजगार विकासासह वाढत जाईल.

भांडवलदारांनी मिळविलेल्या नफ्यातून भांडवल तयार होते. जर तांत्रिक प्रगती ही भांडवल बचतकारी असेल, तर भांडवलाची उत्पादकता वाढेल आणि ते कामगार बचतकारी / श्रमबचतकारी असेल, तर ते श्रमांची उत्पादकता वाढवेल. तांत्रिक प्रगतीमुळे वाढावा निर्माण

होईल आणि शहरी क्षेत्रातील उत्पन्न, गुंतवणूक आणि रोजगार वाढेल. पारंपारिक ग्रामीण शेतीतून आधुनिक शहरी उद्योगात बदलत असलेल्या आर्थिक क्रियांच्याद्वारे अर्थव्यवस्थेत संरचनात्मक परिवर्तन घडले आहे.

अविकसित देशामध्ये, वेतन आणि पगार मिळवणारे हे राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ ३ टक्के बचत करतात. प्रबळ वर्ग हा उल्लेखनीय वापरात गुंतलेला आहे. म्हणूनच राज्य भांडवलदार आणि खाजगी भांडवलदार जे मिळविलेल्या नफ्यातून भांडवल तयार करतात. खाजगी भांडवलदार नवीन संधीचा पूर्ण फायदा घेतात, बाजारपेठेचे रुंदीकरण करतात, नवीन तंत्र विकसित करतात आणि अवलंब करतात ज्यामुळे श्रमांची उत्पादकता वाढते आणि अतिरिक्त उत्पन्न निर्माण होते. भांडवलशाही क्षेत्राचा नफा (कर आकारणीद्वारे) वापरुन राज्य भांडवलदार अधिक भांडवल साठवू शकतो आणि अतिरिक्त निर्वाह कामगार देखील वापरु शकतो. भांडवली उत्पादकता वापरण्याच्या संधी वेगाने वाढल्या तर भांडवलशाही वर्गाबरोबर अतिरिक्तही / वाढावाही वेगाने वाढेल.

**बँक पतद्वारे भांडवल रचना :**

मुबलक निष्क्रिय संसाधने आणि भांडवलाची कमतरता असलेल्या अविकसित देशांमध्ये भांडवल निर्मितीदेखील बँक पतद्वारे होऊ शकते. तथापि, बँक पतधारणा असलेल्या भांडवलाच्या निर्मितीमुळे महागाई / चलनवाढ देखील होऊ शकते. चलनवाढ होते कारण ग्राहकांच्या वस्तूंचा पुरवठा स्थिर राहतो आणि भांडवलाच्या / भांडवली क्षेत्राला बँक पत मिळाल्यामुळे पैशाचा पुरवठा वाढतो. परंतु महागाईची समस्या केवळ तात्पुरती आहे कारण जेव्हा भांडवली वस्तू या ग्राहक वस्तूंची निर्मिती करण्यास सुरुवात करतात, तेव्हा ग्राहकांच्या वस्तूंची मागणी आणि पुरवठा यामधील अंतर कमी होते आणि किंमती मूळ स्तरावर परत जातात. भांडवल निर्मिती सतत होत असल्याने उत्पादन, रोजगार आणि नफ्यात सतत वाढ होते. जास्त नफ्यामुळे जास्त बचत होते आणि अशी वेळ येते जेव्हा बचतीची वाढ इतकी होते की नवीन पर गुंतवणूकीसाठी बँक क्रेडिट शिवाय / पत शिवाय वित्तपुरवठा करता येतो.

**वाढीची प्रक्रिया समाप्ती / वाढ प्रक्रिया समाप्ती :**

वाढीची प्रक्रिया पूर्ण होते, कारण मजुरांचा पुरवठा पूर्णपणे ताठर होतो किंवा वेतनाचे दर वाढू लागतात आणि नफा कमी होऊ लागतो जेणेकरुन पुननिर्मितीसाठी / पुनर्गुंतवणुकीसाठी कोणताही वाढावा शिल्लक उरत नाही.

**मुक्त अर्थव्यवस्था :**

खुल्या अर्थव्यवस्थेत भांडवलदार मोठ्या प्रमाणात कामगारांना भांडवलाची निर्यात करु शकतो जेव्हा घरगुती कामगारांचा पुरवठा पूर्णपणे ताठर असतो किंवा सरकार निर्वाह वेतनातून अतिरिक्त कामगारांच्या मोठ्या प्रमाणात स्थलांतर करण्यास प्रोत्साहित करु शकते जेणेकरुन वाढीची प्रक्रिया चालूच राहू शकेल. तथापि लुईसच्या मते, सामुहिक इमिग्रेशन (कायमचे वास्तव्य करण्यासाठी परदेशातून येणे) शक्य नाही, कारण कामगार संघटना त्यास विरोध करतील. पुढे भांडवल निर्यातीमुळे आयात केलेल्या वस्तूंच्या उत्पादनाची किंमत कमी होईल आणि परिणामी कामगारांच्या वास्तविक वेतनात वाढ होईल, ज्यामुळे भांडवली नफ्यात घट होईल. म्हणूनच बंद अर्थव्यवस्थेचे जे सत्य आहे ते खुल्या अर्थव्यवस्थेचे देखील आहे आणि वाढीची प्रक्रिया संपुष्टात येणे आवश्यक आहे.

**लुईसच्या प्रतिमानावरील / सिद्धांतावरील टीका :**

लुईस सिद्धांत हा विशिष्ट परिस्थितीत अति लोकसंख्या असलेल्या अविकसित देशांशी संबंधित आहे. त्याची अयोग्यता त्यांच्या गृहितकांद्वारे मर्यादित आहे. त्यावर पुढील टीका केल्या जातात.

**१) भांडवलाच्या क्षेत्रात वेतन दर स्थिर नसतो :**

ग्रामीण क्षेत्रातील खुल्या बेरोजगारीच्या उपस्थितीत अविकसित देशाच्या भांडवलशाही क्षेत्रातील वेतनाचे प्रमाण कालांतराने वाढत आहे. कामगार संघटनांची सौदे बाजी शक्ती, नागरी सेवा वेतन रचना आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कामावर घेण्याच्या पद्धती यासारख्या संस्थात्मक घटकांमुळे शहरी क्षेत्रातील सामान्य वेतन पातळी वाढू शकते. त्यामुळे भांडवलशाही क्षेत्रात मजुरीचे दर स्थिर राहिलेले नाहीत.

**२) बेरोजगार आर्थिक वाढ :**

जर उत्पादक भांडवल कामगार बचती करीत असतील, तर ते अतिरिक्त श्रम शोषून घेणार नाहीत आणि पुनर्वापराचे / पुनर्गुंतवणुकीचे वितरण परिणाम हे सर्व समाज कल्याणात कोणतीही वाढ न करता भांडवलशाही वर्गाच्या बाजूने असतील आणि म्हणूनच हा सिद्धांत मोडतो. आर्थिक विकासाचे विकास-विरोधी स्वरूप खालील आकृती मध्ये दर्शविले आहे.




**३)** कुशल कामगार पुरवठा ही तात्पुरती समस्या नाही. लुईस याने अकुशल कामगारांचे अस्तित्व गृहित धरले. त्याला वाटते की, कुशल कामगार ही तात्पुरती समस्या आहे. ज्यास प्रशिक्षण सुविधा पुरवून दूर करता येते. तथापि, कौशल्य निर्मिती ही एक लांबलचक प्रक्रिया आहे आणि कुशल कामगार शक्तीचा पुरवठा ही विकसनशील देशांमधील एक गंभीर समस्या आहे.

**४)** महागाई ही सेल्फ-लिक्विडेटेड नाही. लुईस असे गृहीत धरतो की, बँक पतधोरणातील गुंतवणूकीमुळे उद्भवणारी महागाईला स्वतःची तरलता आहे. तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की गरीब देशांमध्ये उपभोगाची सीमांत वाढ खूपच जास्त आहे आणि संरचनात्मक अडचणीमुळे उपभोग्य वस्तूंचा पुरवठा कमी होतो आणि त्यामुळे बारमाही चलनवाढ होते.

५) ग्रामीण क्षेत्रात अतिरिक्त कामगारांच्या पुराव्यांची अनुपस्थिती ग्रामीण क्षेत्रातील कामगारांची सीमान्त उत्पादनक्षमता शून्य आहे. यावर शूल्टज सारखे काही अर्थशास्त्रज्ञ सहमत नाहीत. पूढे

ग्रामीण भागातील अतिरिक्त कामगारांची अचूक संख्या शोधणे अवघड आहे कारण सर्व कामगारांना काही मजुरी ही वस्तु स्वरूपात किंवा रोख स्वरूपात मिळतात. जरी ग्रामीण भागातून अतिरिक्त कामगार काढून गेले, तरीही शेतीच्या उत्पादनात घट होईल आणि ग्रामीण मजुरी आणि अन्नधान्याच्या किंमती वाढतील.

**निष्कर्ष :**

आधुनिक तंत्रज्ञान हे कामगार बचतकारी आहे. भारतासारखे भांडवलाची कमतरता असलेले देश भांडवलाचे उड्डाण रोखू शकत नाहीत कारण जागतिक व्यापार संघटने अंतर्गत भांडवल ही रंगहीन वस्तू बनली आहे. अतिरिक्त मजूर ग्रामीण भागात अस्तित्वात नाही. जरी ग्रामीण भागात काही अतिरिक्त कामगार असले तरी शहरातही अतिरिक्त शहरवासीय कामगारांचीही समस्या आहे. पुढे नागरी वेतनाचे (शहरी) दरही सतत वाढत असल्याचे दिसून येत आहे. अविकसित देश हे संरचनात्मक कठोरता आणि संस्थात्मक मागासलेपणाने वेढले आहेत. अशा परिस्थितीत लुईसचे परिमाण अव्यवहार्य होते.

## १.७ सारांश (CONCLUSION) :

अर्थशास्त्रज्ञामध्ये आर्थिक विकासाला नक्की कसा बढावा द्यावा यावर एकमत नसले तरी सर्वसाधारण करार असा आहे की विकासाला आर्थिक वाढ, दरडोई उत्पन्नात खरी वाढ आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विस्तारास पाठिंबा देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक व राजकीय संस्थांची आवश्यकता असते. यासाठी उद्योजकांमध्ये प्रभावीपणे कार्य करु शकणारे नागरिक देखील आवश्यक आहेत. लोकसंख्येच्या वाढीच्या तुलनेत वस्तू आणि सेवांचे उत्पादन जेव्हा वाढीच्या दराने वाढते, तेव्हा आर्थिक वाढ होते. दरडोई उत्पन्नात वाढ करण्याबरोबरच आर्थिक विकासामध्ये अर्थव्यवस्थेच्या रचनेत मुलभूत बदलांचादेखील समावेश आहे. हे बदल वाढत्या औद्योगिक क्षेत्रासह, सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) शेतीचा घटता वाटा तसेच लोकसंख्या वाढीतील महत्त्वपूर्ण बदल, ग्रामीण ते शहरी स्थलांतर आणि रोजगाराच्या संधीसह वैशिष्टयीकृत आहेत.

## १.८ प्रश्न (QUESTIONS)

१) आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास या संकल्पना स्पष्ट करा.
२) लॉरेंझ वक्राचे स्पष्टीकरण द्या.
३) लेविसचा विकास सिद्धांत स्पष्ट करा.

## १.९ संदर्भ ग्रंथ (REFERENCES) :

१. Ray Debraj (2004), Developmen Economics, New Delhi.
२. www.Google.com

❖❖❖❖

**घटक -१**

# २

# वृद्धी आणि विकासाच्या संकल्पना व मापन - II

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे
२.१ मानवी विकास निर्देशांक
२.२ लिंग संबंधित विकास निर्देशांक
२.३ बाजारयंत्रणा आणि सरकार (शासन) यांची विकासातील भूमिका
 २.३.१ बाजार यंत्रणेची आर्थिक विकासातील भूमिका
 २.३.२ सरकार किंवा राज्याची आर्थिक विकासातील भूमिका
२.४ सारांश
२.५ प्रश्न
२.६ संदर्भग्रंथ सूची

## २.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. मानव विकास निर्देशांकाचे मोजमाप लक्ष्यात घेणे.
२. लिंग संबंधित विकास निर्देशांकांची संकल्पना समजून घेणे.
३. सरकार किंवा राज्याची भूमिका समजून घेणे.

## २.१ मानवी विकास निर्देशांक (HUMAN DEVELOPMENT INDEX)

मानव विकास निर्देशांक हा एक सारांश संयुक्त निर्देशांक आहे जो मानवी विकासाच्या तीन मूलभूत बाबी म्हणजे आरोग्य, ज्ञान आणि एक सभ्य जीवनमान. आरोग्य हे जन्माच्या वेळी असलेल्या आयुष्यमानाने मोजले जाते; प्रौढ साक्षरता दर आणि एकत्रित प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीयक एकूण नोंदणी प्रमाण यांच्या संयोजनाद्वारे ज्ञान मोजले जाते. आणि दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीडीपीनुसार) जीवनमान (पीपीपी यूएस डॉलर) मोजले जाते.

मानव विकास निर्देशांक (एचडीआय / HDI i.e. Human Development Index) एक संयुक्त सांख्यिकी आहे जो "मानवी विकास" आणि स्वतंत्र विकसित (उच्च विकास), विकसनशील (मध्यम विकास) आणि अविकसित (निम्न विकास) देशांच्या स्तरावर

देशांच्या दर्जासाठी वापरला जातो. सांख्यिकी खालील कार्यपद्धती विभागात दिलेल्या सूत्राचा वापर करुन राष्ट्रीय पातळीवर गोळा केलेली आयुर्मान (Life Expectancy), शिक्षण (Literacy or Knowledge) आणि दरडोई जीडीपी (Real GDP Per Capita - PPP$) (जीवनमानाचे सूचक म्हणून) दिलेल्या आकडेवारीनुसार बनविलेले आहे.

मानवी विकास निर्देशांक (एचडीआयची) उत्पत्ति संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या (यूएनडीपी) मानव विकास अहवाल (एचडीआर) मध्ये सापडली आहे. हे १९९० मध्ये पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ महबूब उल हक यांनी आखून दिले आणि त्याचा प्रारंभ केला / ते गतिमान केले. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा विकासाच्या अर्थशास्त्राचा केंद्रबिंदू हा राष्ट्रीय उत्पन्न लेखापासून लोक केंद्रित धोरणांकडे वळविणे हा त्यांचा स्पष्ट हेतू होता.

मानवी विकास निर्देशांक / एचडीआय तयार करण्यासाठी, महबूब उल हक यांनी पॉल स्ट्रीटन, फ्रान्सिस स्टीवर्ट, गुस्ताव रानीस, किथ ग्रिफिन, सुधीर आनंद आणि मेघनाद देसाई यांच्यासह प्रख्यात विकासशास्त्रज्ञांचा एक गट एकत्र केला. परंतु अमर्त्य सेन यांचे क्षमता आणि कार्ये यावरील कामाने त्यास अंतर्निहित वैचारिक चौकट प्रदान केली.

हक यांना खात्री होती की, लोकांना आणि धोरण निर्मात्यांना हे समजवून देण्यासाठी मानवी विकासाचे एक साधे संयुक्त उपाय आवश्यक आहेत की ते केवळ आर्थिक प्रगतीच नव्हे तर मानवी कल्याणातील सुधारणांद्वारे विकासाचे मूल्यांकन करु शकतात. सेन यांनी सुरुवातीला या कल्पनेचा विरोध केला, परंतु नंतर त्यांनी हक यांना मानव विकास निर्देशांक (एचडीआय) विकसित करण्यास मदत केली. सेनला काळजी होती की मानवी क्षमतामधील संपूर्ण गुंतागुंत एका निर्देशांकात मिळविणे अवघड आहे. परंतु हक् यांनी त्याला पटवून दिले की केवळ एक संख्या ही व्यक्ती धोरणातील निर्मात्यांचे लक्ष आर्थिक केंद्रीकरणाकडून मानवी कल्याणकडे वळवू शकेल.

मानवी विकास निर्देशांक / एचडीआयचा वापर १९९० पासून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे त्याच्या वार्षिक मानवी विकास अहवालासाठी केला जात आहे.

मानवी विकास निर्देशांकाचा / एचडीआयचा वापर १९९० पासून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे त्याच्या वार्षिक मानवी विकास अहवालासाठी केला जात आहे.

मानव विकास निर्देशांक हा खालील तीन निकषांच्या आधारे सरासरी कामगिरी मोजतो. मानवी विकासास महत्त्व असलेली क्षेत्रे :

१) जन्माच्या वेळचे अपेक्षित आयुर्मान जे आयुष्याचे दीर्घायुष्य मोजते.
२) ज्ञान जे खालील दोन घटकांवर आधारित आहे.
   अ) प्रौढ साक्षरता दर
   ब) प्राथमिक, माध्यमिक व तृतीय स्तरावरील एकूण नोंदणी प्रमाण
३) दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन जे लोकांचे जीवनमान मोजते.

वरील निकषांच्या आधारे वरील प्रत्येक परिमाणांकरिता एक निर्देशांक तयार केला जातो. हे प्रत्येक निर्देशकांच्या जास्तीत जास्त आणि किमान मूल्यांच्या आधारे केले जाते.

**तक्ता क्र. २.१**

**मानवी विकास निर्देशकांची गणना करण्यासाठी अधिकतम आणि किमान मूल्ये**

| निर्देशक | कमाल मूल्य | किमान मूल्य |
|---|---|---|
| जन्मा दरम्यान आयुर्मान | ८५ | २५ |
| प्रौढ साक्षरता दर | १०० | ० |
| एकूण नोंदणी प्रमाण | १०० | ० |
| दरडोई स्थूल एतद्देशीय / आंतरदेशीय उत्पादन (क्रय शक्ती समता $PPP$) | ४०,००० | १०० |

त्याचे सामान्य सूत्र खालीलप्रमाणे आहे :

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}} = \frac{७० - २५}{८५ - २५} = \frac{४५}{६०} = ०.७५$$

उपरोक्त सूत्र लागू केल्याने आपल्याला अपेक्षित आयुर्मान (Life Expectancy Index LEI), शिक्षण निर्देशांक (Education Index EI) आणि स्थूल देशांतर्गत उत्पादन निर्देशांक जीडीपी इंडेक्स (GDPI) मिळतो. मग HDI = (LEI + EI + GDPI) / 3

एचडीआय सुदृढतेच्या विस्तृत परिभाषाचे प्रतिनिधित्व करते आणि ३ मुलभूत घटकांचे एकत्रित उपाय प्रदान करते. आरोग्य शिक्षण आणि उत्पन्न.

२०११ च्या एचडीआय अहवालात टिकाव / शाश्वत आणि समता यांवर जोर देण्यात आला.

सर्वांसाठी उत्तम भविष्य : तीन मानवी निर्देशांक आहेत.

१) आयुर्मान अपेक्षितता निर्देशांक (एलईआय) : जन्माच्या वेळेस आयुर्मान (वर्षानुवर्षे)

२) शिक्षण निर्देशांक (EI): शिक्षणाचे सरासरीचे वर्ष (वर्षांमध्ये) आणि शिक्षणाचे अपेक्षित वर्ष (वर्षांमध्ये)

३) उत्पन्न निर्देशांक (II): दरडोई उत्पन्न $

शेवटी एचडीआय $HDI = \sqrt[3]{(LEI.EI.II)}$

प्रत्येक देशातील वास्तविक मूल्यांची तुलना कमाल आणि किमान मूल्याशी केली जाते आणि प्रत्येक देशासाठी सर्व निर्देशकांची मूल्ये ० आणि १ दरम्यान असतात. खालील सूत्र वापरले आहे.

$$\text{प्रत्येक सूचक / दर्शक निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

**तक्ता क्र. २.२**

| Human Development Index | Norway HDI Rank : 1 | India HDI Rank : 127 | Burundi HDI Rank : 171 |
|---|---|---|---|
| Life expectancy at birth (years), 2001 | 78.7 | 63.3 | 40.4 |
| Adult literacy rate (% age - 15 and above), 2001 | - | 58.0 | 49.2 |
| Combined primary, secondary and tertiary grcfcs enrolment ratio (%), 2000-01 | 29,620 | 2,840 | 690 |
| GDP per capita (PPP US$), 2001 | 0.90 | 0.64 | 0.26 |
| Life expectancy index, 2001 | 0.99 | 0.57 | 0.43 |
| Education index, 2001 | 0.95 | 0.56 | 0.32 |
| GDP index, 2001 | 0.944 | 0.590 | 0.337 |
| Human Development Index (HDI) value, 2001 | 4 | - 12 | 0 |
| GDP per capita (PPP US$) rank minus HDI Bank | | | |

एचडीआय मधील तीन परिमाण : एचडीआय तीन आयामांचे संयोजन करते.

लोकसंख्येचे आरोग्य आणि दीर्घायुष्य निर्देशांक म्हणून जन्माच्या वेळेचे आयुर्मान प्रौढ साक्षरता दर (दोन तृतियांश भारांसह) आणि एकत्रित प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीयक एकूण नोंदणी गुणोत्तर (एक तृतीयांश वजनासह) द्वारे मोजलेले ज्ञान आणि शिक्षण, जीवनमान, क्रय शक्ती समतेनुसार दरडोई सकल देशांतर्गत उत्पादनाचे नैसर्गिक घातांकाद्वारे दर्शविल्याप्रमाणे.

एचडीआय निश्चित करणारे सूत्र संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमा (यूएनडीपी) ने जाहीर केले आहे, सर्वसाधारणपणे, कच्चा माल बदलण्यासाठी, एक्स असे समजा, ० त १ दरम्यान युनिट-फ्री इंडेक्समध्ये (एकक मुक्त निर्देशांक) (ज्यायोगे वेगवेगळे निर्देशांक एकत्र जोडले जाऊ शकतात), खालील सूत्र

$$x - \text{निर्देशांक} = \frac{x - \text{किमान } x}{\text{कमाल } x - \text{किमान } x}$$

जिथे किमान $x$ व कमाल $x$ या क्ष चल मिळवू शकेल अशा अनुक्रमे किमान आणि कमाल मूल्ये आहेत. मानव विकास निर्देशांक (एचडीआय) नंतर खालील घटकांच्या निर्देशांकाद्वारे योगदान दिलेल्या १/३ सह एक समान वजनाची रक्कम दर्शवते.

**एचडीआय मापन पद्धती :**

अ) जीवन प्रत्यक्ष / अपेक्षा सूचकांक / निर्देशांक : हे अपेक्षित आयुर्मान (सांख्यिकीय दृष्टिकोनातून) दिलेल्या वयात उर्वरित आयुष्याची संख्या आहे. हे ex द्वारे दर्शविले जाते. ज्याचा अर्थ असा होतो की विशिष्ट मृत्यूच्या अनुभवाच्या अनुषंगाने आताच्या वयाच्या $x$ आयुष्याच्या पुढील वर्षाची सरासरी संख्या (तांत्रिक साहित्यामध्ये, या चिन्हाचा अर्थ म्हणजे वर्षाच्या अपूर्णांक वगळता उर्वरित पूर्ण आयुष्याची संपूर्ण संख्या. एक वर्षाचे अपूर्णांक, आयुर्मानाचा सामान्य अर्थ यासह संबंधित आकडेवारी, ई वर लहान वर्तुळासह प्रतीक असते). एखाद्या व्यक्तीच्या गटांचे आयुर्मान मोठ्या प्रमाणात गट निवडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निकषांवर अवलंबून असते. आयुर्मानाची अपेक्षा सहसा नर (पुरुष) आणि मादीसाठी (स्त्रिया) स्वतंत्रपणे मोजली जाते.

आधुनिक प्रसूती-काळजी असणाऱ्या देशांमधील स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त काळ जगतात. उच्च बाल मृत्यु दर असलेल्या देशांमध्ये, जन्माच्या वेळेस आयुर्मानाने आयुष्याच्या पहिल्या काही वर्षात मृत्यूच्या दराबद्दल अत्यंत संवेदनशील असते. बालमृत्यूंच्या या संवेदनशीलतेमुळे वयाच्या शून्य वयातील साध्या आयुर्मानाच्या चुकीच्या अर्थ लावणे होऊ शकते. ज्यामुळे असा विश्वास होऊ शकतो की कमी आयुर्मान असणाऱ्या लोकसंख्येमध्ये वृद्ध व्यक्तींचे प्रमाण अल्प प्रमाणात असेल.

उदाहरणार्थ, काल्पनिक स्थिर लोकसंख्या ज्यामध्ये अर्धी लोकसंख्या ही पाच वय वर्षापूर्वीच मरते. परंतु इतर सर्व हे बरोबर ७० व्या वर्षी मरतात, शून्य वयाला अपेक्षित आयुर्मान हे अंदाजे ३५ वर्षे असेल, तर जवळपास २५% लोकसंख्या ही ५० ते ७० या वयोगटातील असेल.

वयानुसार आयुर्मान यासारख्या अन्य उपयांचा उपयोग बालवयाच्या मृत्यूच्या परिणामाचा सोपा उपाय म्हणुन कमी वयात वापरल्या जाऊ शकतो - बालकाच्या वयातच - वरील कल्पित लोकसंख्येमध्ये, ५ व्या वर्षी अपेक्षित आयुष्यमान हे ७० वर्षे असेल.

लोकसंख्या रचना आणि गतीशीलतेचे विश्लेषण करताना विविध वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण यासारख्या वैयक्तिक - आधारित उपायांसह औपचारिक आयुर्माना प्रमाणेच एकूण लोकसंख्या उपायांचा वापर केला पाहिजे.

**महिला विरुद्ध पुरुष अपेक्षित आयु :**




लहान वयातच स्त्रियांचा मृत्यू दर कमी असतो. गर्भाशयात, पुरुषांच्या गर्भपात मृत्यूचे प्रमाण जास्त असते (बाळांची गर्भधारणा सुमारे १२४ पुरुष ते १०० स्त्रियांच्या प्रमाणात होते, परंतु जन्मापर्यंत टिकून राहण्याचे प्रमाण फक्त १०५ पुरुष ते १०० महिला आहे). सर्वात लहान अकाली बाळांपैकी (२ पौंड किंवा ९०० ग्रॅमच्या खाली असलेल्या) महिलांमध्ये पुन्हा अस्तित्वाचा दर जास्त असतो. दुसऱ्या टोकाला, ११० वयोगटातील जवळजवळ ९०% व्यक्ती महिला आहेत. पूर्वी, मूल पत्करण्याच्या मुलभूत वयोगटातील महिलांचे मृत्यूचे प्रमाण समान वयातील पुरुषांपेक्षा जास्त होते. यापुढे असणार नाही आणि पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांचे मानवी आयुष्यमान खूपच जास्त आहे. याची कारणे पूर्णपणे निश्चित नाहीत. पारंपारिक युक्तिवाद हा सामाजिक-पर्यावरणीय घटकांना अनुकूल ठरत आहे. याची कारणे पूर्णपणे निश्चित नाहीत. पारंपारिक युक्तिवाद हा सामाजिक-पर्यावरणीय घटकांना अनुकूल ठरत आहे. ऐतिहासिक दृष्ट्या, बहुतेक समाजात पुरुषांनी सामान्यतः तंबाखू, मद्यपान आणि मादक पदार्थांचे सेवन केले आहे आणि त्यामुळे फुफ्फुसाचा कर्करोग, क्षयरोग आणि यकृताच्या सिरोसिस सारख्या अनेक संबंधित आजारांमुळे मरण्याची शक्यता असते. जखमांमुळेही पुरुषांचा मृत्यू होण्याची शक्यता असते, मग नकळत (जसे की कार अपघात) किंवा हेतूपुरस्सर (आत्महत्या, हिंसाचार, युद्ध), स्त्रियांपेक्षा पुरुषांची मृत्यूच्या बहुतेक प्रमुख कारणास्तव (बहुतेक आधीच वर नमूद केलेले) मरण पावण्याची जास्त शक्यता असते. अमेरिकेत यापैकी काही समाविष्ट आहेत. श्वसन प्रणालीचा कर्करोग, मोटार वाहन अपघात, आत्महत्या, यकृताचा सिरोसिस, एम्फिसीमा आणि कोरोनरी ह्रदयरोग हे स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग इत्यादींपेक्षा महिलांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे.

काही लोक असा तर्क करतात की, पुरुषांची आयु कमी असणे हे सर्वसाधारण नियमातील आणखी एक प्रकटीकरण आहे, सर्व सस्तन प्राण्यांमध्ये असे दिसून येते की मोठ्या व्यक्तींमध्ये सरासरी आयुष्य लहान असते. हा जैविक फरक उद्भवतो कारण स्त्रियांमध्ये संक्रमण आणि डीजनरेटिव्ह रोगांचा जास्त प्रतिकार असतो.

$$\text{Life Expectancy Index} = \frac{\text{LE-25}}{\text{85-25}}$$

**ब) शिक्षण निर्देशांक :**

शिक्षण निर्देशांक हा प्रौढ साक्षरता दर (दोन तृतियांश भारांसह) आणि एकत्रित प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीयक एकूण नोंदणी प्रमाण (एक तृतीयांश वजनासह) द्वारे मोजला जातो. प्रौढ साक्षरता दर वाचन-लेखन करण्याची क्षमता दर्शविते, तर जीईआर बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतच्या शिक्षणाच्या पातळीचे संकेत देतात. शिक्षण हे कल्याणकारी घटकांचे प्रमुख घटक आहे आणि याचा उपयोग आर्थिक विकास आणि जीवन गुणवत्ता मोजण्यासाठी केला जातो, एखादा हा एक विकसीत, विकसनशील किंवा अविकसित देश आहे की नाही हे निर्धारित करणारा मुख्य घटक आहे.

$$\text{Education Index} = \frac{2}{3} \times ALI + \frac{1}{3} \times GEI$$

**क) प्रौढ साक्षरता निर्देशांक :**

प्रौढ साक्षरता निर्देशांक (एएलआय) ही एक सांख्यिकीय पद्धत आहे जी विशिष्ट क्षेत्रात किंवा देशात किती प्रौढ वाचू आणि लिहू शकतात, हे निर्धारित करण्यासाठी वापरली जाते. आयुर्मान, शिक्षण आणि जीवनमान यासह प्रत्येक राष्ट्राचा मानव विकास निर्देशांक (एचडीआय) मोजण्यासाठी वयस्क साक्षरता ही एक बाब आहे. प्रौढ साक्षरता निर्देशकांची गणना करण्याचे सूत्र असे आहे.

$$\text{Adult Literacy Index}\left(ALI\right) = \frac{ALR-0}{100-0}$$

सकल नावनोंदणी प्रमाण (जीईआर) किंवा सकल नावनोंदणी अनुक्रमणिका (जीईआय) हा एक सांख्यिकीय उपाय आहे जो शिक्षण क्षेत्रात आणि यूएनने त्याच्या शिक्षण निर्देशांकात वापरला आहे. जीईईआर बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतच्या शिक्षणाचे स्तर दर्शवितात - जे यूके आणि काही इतर देशांमध्ये (बहुतेक राष्ट्रकुल राष्ट्रांमध्ये) प्राथमिक, माध्यमिक आणि / किंवा तृतीयक म्हणून ओळखले जातात. दिलेल्या अधिकार क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये.

संयुक्त राष्ट्रा मध्ये, जीईआरची गणना तीन स्तरांकरिता अधिकृत शालेय वयाच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार, वयाची पर्वा न करता, प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीय स्तराच्या शिक्षणामध्ये असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शवून केली जाते.

$$\text{Gross Enrolment Index (GEI)} = \frac{CGER-0}{100-0}$$

**ड) एकूण देशांतर्गत उत्पादन (सकल देशांतर्गत उत्पादन) :**

सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) किंवा सकल देशांतर्गत उत्पन्न (जीडीआय) हे देशाच्या एकूणच आर्थिक उत्पादनाचे एक उपाय आहे. बनवलेल्या सर्व अंतिम वस्तू आणि सेवांचे

हे बाजार मूल्य आहे. हे एका वर्षामध्ये देशाच्या सीमेत बनवलेल्या सर्व अंतिम वस्तू आणि सेवांचे बाजार मूल्य आहे. हे सहसा जीवनाचे मानक, त्या उद्देशाने जीडीपीच्या वैकल्पिक उपायांशी सकारात्मकपणे संबंधित असते. हे (राहणीमानाचा दर्जा) सहसा जीवनाचे मानक, त्या उद्देशाने जीडीपीच्या वैकल्पिक उपायांशी सकारात्मकपणे संबंधित असते.

## २.२ लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक (जीडीआय) (GENDER RELATED DEVELOPMENT INDEX (GDI)

लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक (GDI) (जीडीआय) हा संयुक्त राष्ट्रसंघाने (यूएन) विकसित केलेल्या देशात राहणीमानाचे एक संकेत आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या वार्षिक मानव विकास अहवालात वापरल्या गेलेल्या पाच सुचकांपैकी हे सूत्र एक आहे. दीर्घ आणि निरोगी जीवन, ज्ञान आणि एक सभ्य राहणीमान या क्षेत्रातील पुरुष आणि स्त्रियांमधील असमानता दर्शविणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

मानवी विकास निर्देशांक हा सरासरी कामगिरीचे मोजमाप करतो, तर लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक हा पुरुष आणि स्त्रियांमधील असमानता दर्शविण्यासाठी सरासरी उपलब्धी समायोजित करतो. या उद्देशासाठी वापरलेले तीन घटक पुढीलप्रमाणे आहेत. (१) महिला आयुर्मान, (२) महिला प्रौढ साक्षरता आणि एकूण नोंदणी प्रमाण, आणि (३) महिलांचे दरडोई उत्पन्न. जर लिंग असमानतेवर दंड आकारला गेला नाही तर लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक आणि मानवी विकास निर्देशांक यांचे मुल्य समान असेल, परंतु जर लिंग असमानता अस्तित्वात असेल तर लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांकाचे मूल्य मानवी विकास निर्देशांकाच्या तुलनेत कमी असेल. एचडीआय आणि जीडीआयमधील फरक जितका जास्त तितकी लैंगिक असमानता जास्त असते. नॉर्वे, कॅनडा, युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, जपान, मेक्सिको, रशियन फेडरेशन, मलेशिया, व्हेनेझूएला, फिलिपिन्स, श्रीलंका, चीन, व्हिएतनाम आणि इंडोनेशियात जवळजवळ समानता आहे.

सौदी अरेबिया, पाकिस्तान, इराण, भारत, इजिप्त आणि नायजेरिया हे उच्च लैंगिक असमानता दर्शविणारे देश आहेत. तथापि, जगात लैंगिक असमानतेबद्दल अधिक जागरुकता आहे आणि महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देऊन आणि त्यांना कुटुंबात एक चांगला दर्जा देऊन लिंग असमानता कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांविरुद्ध सांस्कृतिक पक्षपात केल्यामुळे काही देश मागे पडले आहेत. तथापि, त्यांच्यातही स्त्री-चळवळी या लैंगिक समानता आणण्याच्या कारणास प्रोत्साहन देत आहेत.

### भारतातील लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक (GDI IN INDIA):

२००१ मध्ये भारतात स्त्रियांच्या जन्माचे आयुर्मान ६४ वर्ष होते, परंतु पुरुषांसाठी ते ६२.८ वर्षे होते. मध्यम मानवी विकास देशांशी तुलना केली तर भारतीय कामगिरी जरी चांगली असली तरीही मेक्सिको, व्हेनेझूएला, रशियन फेडरेशन, थायलंड, फिलिपिन्स, श्रीलंका, इराण, व्हिएतनाम या देशांच्या तुलनेत कमी आहे. जरी अपेक्षित आयुर्मान संदर्भात स्त्री व पुरुषांमधील अंतर हे कमी आहे, परंतु इतर लिंग संबंधित विकास निर्देशकांमध्ये हे अंतर फारच विस्तृत आहे. उदाहरणार्थ, २००१ मध्ये ६९.० टक्के पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रौढ साक्षरतेचे प्रमाण केवळ

४६.४ टक्के होते. २००१ मध्ये पुरुषांच्या ६३.० टक्यांच्या तुलनेत महिलांचे एकत्रित सकल नोंदणी प्रमाण ४९ टक्के होते.

त्याचप्रमाणे २००१ मध्ये महिलांची अंदाजित कमाई $1,531 होती, तर पुरूषांची संख्या त्या तुलनेत २००१ मध्ये ४,०७० होती. यावरुन असे दिसून येते की पुरुषांच्या उत्पन्नापैकी महिलांचे उत्पन्न फक्त ३८ टक्के होते. अर्थात एकतर महिलांना वेतनाच्या उत्पन्नातील लैंगिक भेदभावाचा त्रास सहन करावा लागला किंवा त्यांना नियमित रोजगार मिळाला नाही आणि बरीच मोठी रक्कम प्रासंगिक मजूर म्हणून काम केली गेली किंवा स्त्रियांच्या मोठ्या संख्येने अर्धवेळ काम केले.

जरी आणखी बरेच घटक असले तरी हे नाकारता येणार नाही की शिक्षण आणि नोकरीच्या बाबतीतही महिलांवर लैंगिक पक्षपात झाला.

भारतातील लिंग संबंधित विकासात्मक निर्देशकांची गणना करण्यामध्ये तीन चरणांचा / पायऱ्यांचा समावेश आहे (Calculation of GDI involves three steps) :

**चरण / पायरी १ :** ० ते १ मधील (एकक) युनिट-मुक्त निर्देशकांची गणना खालीलपैकी प्रत्येक क्षेत्रातील महिला आणि पुरुषांसाठी केली जाते.

१) आयुर्मान
२) शिक्षण (प्रौढ साक्षरता दर आणि एकत्रित प्राथमिक ते तृतीय स्तरीय पटसंख्या प्रमाण)
३) अंदाजे मिळविलेले उत्पन्न (क्रयशक्ती समतेनुसार यूएस डॉलर मध्ये)

- Female Life Expectancy Index
  $$= \frac{\text{female life expectancy - 27.5}}{\text{87.5-27.5}}$$
- Male Life Expectancy Index
  $$= \frac{\text{female life expectancy - 22.5}}{\text{82.5-22.5}}$$

Female & Male Education Indices

$$= \frac{2}{3}\frac{\text{adult literacy rate of gender}}{100} + \frac{1}{3}\frac{\text{gross enrollment rate of gender}}{100}$$

$$\text{Female \& Male Income Indices} = \frac{\log \textit{earned income of gender} - \log 100}{\log 40,000 - \log 100}$$

**चरण / पायरी २ :** प्रत्येक क्षेत्रासाठी, लिंग निर्देशकांची जोडी, समानतेने वितरित निर्देशकांमध्ये एकत्र केली जाते जी लैंगिक समानतेस पुरस्कृत करते आणि असमानतेस दंड देते.

*Equally Distributed Index*

$$= \left( \frac{\textit{female share of population}}{\textit{female} - \textit{index}} + \frac{\text{male share of population}}{\textit{male} - \textit{index}} \right)^{-1}$$

**चरण / पायरी ३ :** लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक हा तीन समान वितरित निर्देशकांची अप्रकाशित सरासरी आहे. समान वितरित आयुर्मान अपेक्षित निर्देशांक, समानपणे वितरित शिक्षण निर्देशांक, समानपणे वितरित उत्पन्न निर्देशांक, मुळात स्त्रिया पुरुषांपेक्षा ५ वर्षे जास्त जगल्या पाहिजेत हे स्वाभाविक आहे असे गृहित धरुन संयुक्त राष्ट्र हे पुरुष आणि स्त्रियांच्या आयुर्मानासाठी भिन्न मानकांचा वापर करते. जर आयुर्मान निर्देशांक ८५ वर्षांच्या समान वयात निर्देशित केले गेले असेल तर लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक गणनेत वाढ होईल / केली जाईल आणि बहुतेक सर्व देशांमधील स्त्रियांचे उच्च आयुर्मान दिसून येईल. हे समान करण्यासाठी फक्त ८७.५ वर्षे आणि ८२.५ वर्षे ८५.० वर्षासह बदला आणि २७.५ वर्षे आणि २२.५ वर्षे २५.० वर्षांनी बदला. उदाहरणार्थ, आइसलँडची ०.९६२ ऐवजी ०.९९२ ची लिंग संबंधित विकासात्मक निर्देशांक या पद्धतीनुसार असेल.

## २.३ बाजारयंत्रणा आणि सरकार (शासन) यांची विकसनशील भूमिका (ROLE OF MARKET AND STATE IN DEVELOPMENT)

### २.३.१ बाजारयंत्रणेची आर्थिक विकासातील भूमिका (Role of Market in Economic Development) :

देशामधील सर्व अर्थव्यवस्था या साधनसंपत्तीचा इष्टतम वापर करण्याचा प्रयत्न करतात. साधनसंपत्तीचा अयोग्य वापर हा देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करतो. म्हणूनच उपलब्ध साधनांचा किंवा साधनसंपत्तीचा इष्टतम आणि योग्य वापर करणे महत्त्वाचे ठरते.

बाजार / बाजारयंत्रणा ही अशी एक यंत्रणा आहे जिच्याद्वारे ग्राहक आणि विक्रेते हे किंमत निश्चिती आणि वस्तू व सेवा यांच्या देवाणघेवाणीबाबत एकमेकांशी संवाद साधतात. किंमती आणि बाजारपेठा याद्वारे लोक, उपक्रम आणि व्यवसाय यामध्ये समन्वय साधणारी ही विस्तृत यंत्रणा आहे. कोट्यावधी लोकांच्या (व्यक्तींच्या) ज्ञानाचा आणि क्रियांचा एक कोष (pool) ही यंत्रणा तयार करते. कोट्यावधी अज्ञान चलांद्वारे आणि संबंधाद्वारे उत्पादन आणि वितरणासंबंधीचे प्रश्न सोडविले जातात. सॅम्युलसन आणि नॉरथन्स यांच्या मते, कोणीही बाजारपेठेची रचना केली नाही तरी ती उल्लेखनीयरित्या उत्तम कार्य करते (Nobody designed the market, yet it functions remarkably well).

बाजारयंत्रणेची आर्थिक विकासातील भूमिका खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**A) निर्धारण / उपयोजन / वाटप कार्य (Allocative Function) :**

बाजारयंत्रणेचे हे एक महत्त्वाचे कार्य आहे. बाजारयंत्रणेमध्ये साधनसंपत्तीच्या निर्धारणाबाबत काही मुलभूत प्रश्न उद्भवतात, उदा. काय, कसे, किती आणि कोणासाठी उत्पादन करायचे आणि बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठा यांच्यातील आंतरक्रियातून ते प्रश्न सोडविले जातात. नफा कमविण्याच्या इच्छेने प्रेरित झालेल्या उद्योगसंस्था अशा आर्थिक संस्थांच्या घडणीमध्ये / रचनेमध्ये निविष्टी विकत घेऊन उत्पादन करतात आणि वस्तू व सेवा विकतात. याउलट घरगुती क्षेत्र (households) आपल्या घटकांद्वारे मिळालेल्या उत्पन्नातून वस्तु आणि सेवा यांची मागणी करत त्या विकत घेतात.

बाजारयंत्रणेमध्ये सरकार (शासन) एखादी व्यक्ती किंवा संस्था ही आर्थिक प्रश्न सोडविण्यास जबाबदार नसते. याउलट स्वतःची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या हेतुने लक्षावधी व्यवसाय (व्यावसायिक / उद्योजक) आणि ग्राहक हे ऐच्छिक व्यापारात परस्परांशी संवाद साधतात आणि त्यांच्या क्रिया (कृती / actions) ह्या किंमती आणि बाजारपेठा या प्रणालीद्वारे (system) समन्वित केल्या जातात. म्हणून ॲडम स्मिथ यांच्या मते, बाजार अर्थव्यवस्थेमध्ये साधनसंपत्तीचे निर्धारण हे उपभोक्त्याच्या मागणीच्या अनुशंगाने बाजारातील अदृश्य हातांद्वारे (invisible hands) केले जाते.

पूर्णतः मुक्त बाजारयंत्रणेत किंमत ही पूर्णतः बाजारात विशद केली जाते. काय, कोठे, किती, कसे आणि कोणासाठी उत्पादन करायचे या संबंधीचे निर्णय हे पूर्णपणे विकेंद्रित केले जातात आणि हे निर्णय बाजार यंत्रणेवर सोपविले जातात. जर वस्तुच्या मागणीत वाढ झाली तर तिच्या किंमतीत वाढ होते आणि त्यामुळे उत्पादक हे उत्पादन आणि पुरवठा वाढविण्यास प्रेरीत होतात. याउलट जर मागणी कमी झाली तर किंमतीमध्ये सुद्धा घट होते आणि त्यामुळे उत्पादक हे उत्पादन आणि पुरवठा वाढविण्यास प्रेरीत होतात. याउलट जर मागणी कमी झाली तर किंमतीमध्ये सुद्धा घट होते आणि त्यामुळे उत्पादक हे उत्पादन आणि पुरवठा कमी करतात. बाजारातीक किंमती या उत्पादकांनी उत्पादन जास्त करावे किंवा कमी करावे यासंबंधी दिशादर्शकाची भूमिका पार पाडतात. बाजार यंत्रणेची कार्यक्षमता ही दिशादर्शकाची भूमिका पार पाडणाऱ्या किंमतीवर अवलंबून असते. बाजारयंत्रणा ही संसाधनाचे कार्यक्रम निर्धारण / वाटप करेल असे अपेक्षित आहे. बाजारयंत्रणेचे निर्धारण (allocative) कार्य हे कल्याणकारी अर्थशास्त्राच्या महत्त्वाच्या प्रमेयांद्वारे विशद / स्पष्ट केले जाते. पॅरटो कार्यक्षमता अटीनुसार जर उपभोक्ते हे उपभोगाची सिमांत उपभोग्यता आणि वस्तुची किंमत समान (MU = P) होत असलेल्या बिंदूपर्यंत जर उपभोग घेत असतील आणि जर उत्पादक हे उत्पादनाचा सिमांत खर्च आणि किंमत (MC = P) समान होत असलेल्या बिंदूपर्यंत उत्पादन करीत असतील तर साधनसंपत्तीचे किंवा संसाधनांचे चांगल्याप्रकारे (इष्टतम) निर्धारण होते. कारण ज्याअर्थी उत्पादनाची सिमांत उपभोग्यता आणि सिमांत खर्च समान असेल, अशावेळी समाज हा त्याची उपभोग्याच्या सर्वोच्च पातळीशी पोहोचेल. जी त्याच्या उत्पादन शक्यतांबरोबर सुसंगत असते.

(कल्याण महत्तीकरण Welfare Maximisation)




वरील आकृतीमध्ये वस्तू A ही क्ष अक्षावर आणि वस्तू B ही य अक्षावर दर्शविली आहे. $IC_1$ आणि $IC_2$ हे समाजाचे समय समाधान वक्र किंवा तटस्थता वक्र आहेत. (A आणि B वस्तू दरम्यान). $P_1F_1$ आणि $P_2F_2$ हे देशाचे उत्पादन शक्यता वक्र आहेत. R हा बिंदू $P_1F_1$ या

उत्पादन शक्यता वक्राच्या खाली आहे. हा बिंदू संसाधनाचा कमी वापर दर्शवितो (Underutilisation). म्हणून आपल्याला A आणि B च्या वस्तू कमी मिळतात. $P_1F_1$ हा उत्पादन शक्यता वक्र साधनांचा इष्टतम वापर दर्शवितो. $E_1$ या बिंदुपाशी $P_1F_1$ आणि $IC_1$ हे दोन्ही वक्र एकमेकांना स्पर्श करतात. कोणत्याही कारणांनी (इष्टतम वापर, तांत्रिक प्रगती इ.) जर उत्पादन शक्यता वक्र हा पुढे सरकला ($P_2F_2$) तर आपल्याला $E_2$ हा नवीन समतोल बिंदू मिळतो. या बिंदूपाशी $IC_2$ आणि $P_2F_2$ हे वक्र एकमेकांना स्पर्श करतात. परत वस्तु A आणि B जास्त मिळतात. हे पुढील कार्यामध्ये विस्ताराने सांगितले आहे.

**B) नवनिर्मिती / सर्जनशील / निर्मितीक्षम कार्ये (Creative Function) :**

बाजारयंत्रणा ही सर्जनशील कार्ये करुन महत्त्वाची भूमिका पार पाडते. बाजारयंत्रणा ही बदल किंवा परिवर्तनासाठी योग्य अशी वातावरण निर्मिती करते. त्यामुळे उत्पादन शक्यता वक्राच्या विस्तारास मदत होते. यामध्ये उत्पादन शक्यता वक्र आणि तटस्थता वक्र हे उजीवकडे स्थलांतरीत होतात. यामुळे उपभोग्यतेची उच्च पातळी साध्य करणे शक्य होते ($IC_2$). वरील आकृतीत $E_2$ या बिंदूपाशी हा नवा समतोल साधला जातो. बदलासाठी आवश्यक अशा वातावरणाची तरतूद बाजार शक्ती करतात. त्यामुळे तांत्रिक प्रगती नवप्रवर्तन आणि शेवटी गुंतवणूकीस वाढ होते. बाजारयंत्रणेची नवनिर्मिती ही विकासासाठी नवीन संधी उपलब्ध करते. या संधी अर्थव्यवस्थेची वृद्धी आणि विकास प्रक्रियेत मोठे योगदान देतात.

**बाजारयंत्रणेच्या कामगिरीसाठी आवश्यक अटी / शर्ती (Conditions Required for Market To Perform) :**

निर्धारीत आणि नवनिर्मिती कार्ये इष्टतम पद्धतीने साकार करण्यासाठी बाजारयंत्रणेला काही अटींची / शर्तींची पुर्तता करावी लागते. आपली कार्ये ही कार्यक्षम पद्धतीने करण्यासाठी बाजारयंत्रणेला काही खास सामाजिक, संस्थागत (institutional) कायदेशीर आणि सांस्कृतिक पूर्ण शर्ती (अटी) पूर्ण करणे आवश्यक आहे. नथन कीफीटझ आणि रॉबर्ट डॉफमन यांनी बाजार यंत्रणेच्या कार्यक्षम कार्यासाठी खालील ४ संस्थागत आणि सांस्कृतिक आवश्यकता सांगितल्या.

१) विश्वास (Trust) (बँक, विमा कंपन्या, पुरवठा करणारे इ. ची विश्वासर्हता)
२) कायदा आणि सुव्यवस्था (व्यापारी करारांच्या पूर्ततेसाठी)
३) व्यक्ती आणि त्यांच्या मालमत्तेची सुरक्षा / संरक्षण
४) स्पर्धा आणि सहकार्य यातील संतुलन (सुरक्षित

## २.३.२ सरकार / राज्याची भूमिका (ROLE OF GOVERNMENT / STATE)

अनेक कारणामुळे बाजारपेठेतील अपयश येते. बाजारपेठेतील अपयशाचा प्रतिकूल परिणाम सुधारण्यासाठी सरकारने अर्थव्यवस्थेच्या सामाजिक आणि राजकीय विचारसरणीला प्रतिबिंबित करणारी अनेक प्रभावी धोरणे सादर करावी लागतील.

**१) बाजार यंत्रणा (Market Mechanism) :**

असा युक्तिवाद केला जात आहे की बाजार यंत्रणेमुळे संसाधनांचे कार्यक्षम वाटप होते. हे ग्राहकांना हवे असलेले आणि स्वस्त मार्गाने उत्पादन करते. हे गृहितक परिपूर्ण स्पर्धेवर आधारित आहे.

परंतु अपूर्ण स्पर्धा, माहितीचा अभाव, सार्वजनिक वस्तू इत्यादीमुळे उद्भवणाऱ्या बाजारपेठेतील अपयशामध्ये सरकारी नियमांची आवश्यकता असते. कंपन्या किंमती वाढवण्यासाठी आणि उत्पादन कमी करण्यासाठी आपल्या शक्तींचा वापर करतात.

**२) कायदेशीर चौकट प्रदान करणे :**

सरकार कंत्राटी व्यवस्था आणि देवाणघेवाण करण्यासाठी संरक्षण आणि कायदेशीर चौकट प्रदान करते. हे उद्योगसंस्था आणि बाजारामधील इतर पक्षांद्वारे कायदे अंमलात आणण्याची हमी देते.

**३) सार्वजनिक आणि गुणवत्तापूर्ण वस्तूंची तरतूद :**

हे वस्तू बाजारपेठेत पुरवले जाऊ शकत नाहीत. सार्वजनिक वस्तूंसाठी कोणतीही किंमत यंत्रणा नाही. न्याय, सार्वजनिक रस्ते, संरक्षण यासारख्या सार्वजनिक वस्तूंसाठी लोक त्यांची प्राधान्ये उघड करीत नाहीत. या वस्तू व सेवा शासनाने उपलब्ध करुन दिल्या आहेत. उत्तम शिक्षण, आरोग्य इ. सारख्या गुणवत्तापूर्ण वस्तूही सरकारने पुरविल्या पाहिजेत.

**४) बाह्यतेतून उद्भवणाऱ्या समस्या सुधारणे :**

सरकार अंदाजपत्रकातील तरतुदी, कर, उपकंपन्याद्वारे या बाह्यरुपांची दुरुस्ती करु शकते. सकारात्मक बाह्यता (रोजगार) निर्माण करणाऱ्या उपक्रमांना सरकारने अनुदान दिले पाहिजे आणि नकारात्मक बाह्यतांवर (प्रदूषण) कर लादले पाहिजे.

**५) उत्पन्न आणि संपत्तीचे असमान वितरण दुरुस्त करणे :**

सरकार कल्याणकारी कार्यक्रम आणि कराच्या धोरणांद्वारे उत्पन्नाचे पुनर्वितरण करु शकते. श्रीमंतांकडून गरिबांकडे उत्पन्नाचे वाटप करु शकते.

**६) सामाजिक उद्दिष्टे सुरक्षित करणे :**

उच्च रोजगार, स्थिरता, दारिद्र्य कमी करणे, आर्थिक वाढ यासारख्या सामाजिक उद्दिष्टे केवळ बाजारपेठेतून मिळवता येऊ शकत नाहीत. ही उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी आम्हाला सरकारच्या सक्रिय हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.

**७) सामाजिक सुरक्षेची तरतूद :**

सरकारने वृद्धापकासाठी निवृत्तीवेतन, आजारपण लाभ, बेरोजगारांना आजारी आणि वृद्धांना सामाजिक सुरक्षा दिली पाहिजे. हे बाजार यंत्रणेद्वारे प्रदान केले जाऊ शकत नाही.

**८) नैसर्गिक संसाधनाचा वापराचे मार्गदर्शन :**

बाजारातील यंत्रणा नैसर्गिक संसाधनाचा अयोग्य वापर करते. बाजाराद्वारे या नैसर्गिक स्त्रोतांचा अपव्यय होतो उदाहरणार्थ, प्रदूषण, पर्यावरणीय ऱ्हास.

## २.४ सारांश (CONCLUSTION)

व्यवसाय चक्र व्यवस्थापित करणे; व्यवसाय चक्राच्या विविध टप्प्यात सरकारी हस्तक्षेप आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेला नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी सरकारने खर्चात वाढ केली पाहिजे. समृद्धीच्या काळात खासगी खर्च जास्त असतो. सरकारने कर आकारणी करावी किंवा सक्तीची रक्कम लावावी.

## २.५ (QUESTIONS)

१) मानव विकास निदेशांकाची मापन पद्धती स्पष्ट करा.
२) लिंग संबंधित विकास निर्देशांकाचे विश्लेषण द्या.
३) सरकार किंवा राज्यांची भूमिका स्पष्ट करा.

## २.६ संदर्भ ग्रंथ (REFERENCES) :

३. Ray Debraj (2004), Developmen Economics, New Delhi.
४. www.Google.com

❖❖❖❖

**घटक -२**

# ३

# वृद्धी व वितरणाचे आधुनिक सिद्धांत - I

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे
३.१ हॅरॉड डोमर वृद्धी सिद्धांत
३.२ सोलोचे आर्थिक वृद्धी प्रतिमान
३.३ सारांश
३.४ प्रश्न
३.५ संदर्भग्रंथ सूची

## ३.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. हॅरॉड डोमर प्रतिमान समजून घेणे.
२. अविकसित देशाच्या संदर्भात हॅरॉड डोमर प्रतिमानाची उपयोगिता अभ्यासणे.
३. सोलोचे आर्थिक वृद्धी प्रतिमान अभ्यासणे.

## ३.१ हॅरॉड - डोमर वृद्धी सिद्धांत (हॅरॉड - डोमर वृद्धी प्रतिमान) (HARROD - DOMAR MODEL OF GROWTH)

हॅरॉड - डोमर वृद्धी प्रतिमान हे विकसीत देशांच्या अनुभवांवर आधारलेले आहे. ह्या दोन प्रतिमानांद्वारे विकसीत देशातील स्थिर वृद्धीच्या आवश्यकतांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला गेला.

हॅरॉड आणि डोमर यांना अर्थव्यवस्थेच्या सपाट / गुळगुळीत (Smooth) आणि निर्बंध / अडचणीविरहीत (Uninterrupted) कामकाजासाठी आवश्यक अशा उत्पन्न वृद्धी दराचा शोध घेण्यास स्वारस्य होते. हॅरॉड आणि डोमर यांची प्रतिमाने ही एकमेकांपेक्षा अगदी भिन्न / वेगळी आहेत. परंतु ही प्रतिमाने निष्कर्षाशी येऊन पोहोचतात.

हॅरॉड आणि डोमर यांनी आर्थिक वृद्धी प्रक्रियेत 'गुंतवणूकीस' (Investment) महत्त्वाची भूमिका देऊ केली आहे. त्यांच्या मते, गुंतवणूक ही अर्थव्यवस्थेमध्ये दुहेरी भूमिका बजावते. एका बाजूने गुंतवणूक ही उत्पन्न निर्माण करते, तर दुसऱ्या बाजूने गुंतवणूक ही भांडवली

साठ्यात वाढ करुन अर्थव्यवस्थेची उत्पादन क्षमता वाढविते. यातील पहिल्याला 'मागणी परिणाम' तर दुसऱ्याला 'पुरवठा परिणाम' असे मानले जाते. जोपर्यंत गुंतवणूक होत राहील तोपर्यंत वास्तविक उत्पन्न आणि उत्पादन हे वाढतच राहील. परंतु पूर्ण रोजगार समतोल राखण्यासाठी, उत्पन्न आणि उत्पादन क्षमता हे सम (समान) प्रमाणातच वाढले पाहिजे. असे झाले नाही म्हणजे जर त्यांच्यात सम प्रमाणात वाढ झाली नाही तर त्यामुळे अतिरिक्त क्षमता आणि गुंतवणूकीत घट होऊ शकते. म्हणून गुंतवणूकीचा असा दर शोधणे आवश्यक आहे की ज्यामुळे उत्पन्न हे उत्पादन वाढी इतके असेल.

**३.१.१ गृहीते :** हॅरॉड - डोमर वृद्धी प्रतिमान हे खालील गृहीतांवर अवलंबून आहे.

१. पूर्ण रोजगाराच्या पातळीवर उत्पन्नाचा समतोल साधला आहे.
२. सरकारी हस्तक्षेपाचा अभाव आहे.
३. बंदीस्त अर्थव्यवस्था गृहीत धरली आहे. विदेशी व्यापार होत नाही.
४. समायोजनात काहीच अंतर नाही.
५. सरासरी बचत प्रवृत्ती आणि सिमान्त बचत प्रवृत्ती समान असतात (APS = MPS)
६. भांडवल - उत्पादन गुणोत्तर स्थिर आणि निश्चित आहे.
७. व्याजदरात बदल होत नाही.
८. भांडवल - श्रमिक अनुपात / गुणोत्तर निश्चित प्रमाणात राहतात.
९. सामान्य किंमत पातळी स्थिर असते.
१०. सीमांत बचत प्रवृत्ती आणि भांडवल गुणांक स्थिर असते.

**३.१.२ हॅरॉडचे विवेचन (हॅरॉड प्रतिमान) :**

हॅरॉड यांचे प्रतिमान हे खालील तीन वेगवेगळ्या वाढीच्या दरावर विस्तारले आहे.

१. प्रत्यक्ष वाढीचा दर किंवा वाढीचा प्रत्यक्ष दर (G)
२. वाढीचा अपेक्षित (अनुज्ञेय) (Warranted) दर (Gw)
३. वाढीचा नैसर्गिक दर (Gn)

**१) वाढीचा प्रत्यक्ष दर (Actual Growth Rate) (G) :**

वाढीचा प्रत्यक्ष दर हा 'G' या अक्षराने दाखविला आहे. वाढीचा प्रत्यक्ष दर हा बचत गुणोत्तर आणि भांडवल-उत्पादन गुणोत्तर याद्वारे निर्धारित केला जातो. यासाठी पहिले मूलभूत समीकरण मांडण्यात आले ते खालीलप्रमाणे मोडले गेले.

GC = S ………… (1) यात

G = उत्पादन वाढीचा दर हा $\frac{\Delta y}{y}$ असा दाखविला जातो.

C = Net addition to Capital भांडवलातील निव्वळ वाढ ही $\frac{I}{\Delta y}$ अशी दाखविली जाते.

S = सरासरी बचत प्रवृत्ती ही $\frac{S}{y}$ अशी दाखविली जाते.

$$GC = S$$

$$= \frac{\Delta y}{y} \cdot \frac{I}{\Delta y} = \frac{S}{y}$$

$$= \frac{I}{y} = \frac{S}{y}$$

$$I = S$$

(म्हणजेच गुंतवणूक = बचत)

येथे I आणि S प्रत्यक्ष (Ex-Post) गुंतवणूक व बचत दाखवितात. स्थिर दराने विकास घडून येण्यासाठी अपेक्षित (Ex-ante) I व S समान असले पाहिजेत.

**२) वाढीचा अपेक्षित (अनुज्ञेय) दर (Gw) (Warranted Growth Rate) :**

ज्या दरामुळे उत्पादकाचे समाधान होईल अशा दराला वाढीचा अपेक्षित दर असे म्हणतात. या दरामुळे उत्पादकांना समाधानकारक लाभ मिळतो. स्थिर प्रगतीसाठी आवश्यक असलेली समतोलाची अट ही दुसऱ्या मुलभूत समीकरणाद्वारे मांडण्यात आली. हे समीकरण

Gw Cr = S ………… (2) यात

Gw = वाढीचा अपेक्षित दर किंवा उत्पन्न वाढीचा पूर्ण क्षमता दर. (भांडवलाचा वाढता साठा पूर्णपणे वापरला जातो आणि संयोजकाला गुंतवणूकीत प्रत्यक्ष केलेल्या रकमेबाबत समाधान देते). Gw हा $\frac{\Delta y}{y}$ असा दाखविला जातो. $\left(\frac{\text{उत्पन्नातील वाढ}}{\text{मूळ उत्पादन}}\right)$

Cr = भांडवलाची आवश्यकता वाढीचा अपेक्षित दर राखण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम याद्वारे दाखविली जाते. याला भांडवल - उत्पादन (प्रमाण) गुणोत्तर असे म्हणतात. Cr ही $\frac{I}{\Delta y}$ अशी दाखविली जाते.

S = सरासरी बचत प्रवृत्ती $\left(\frac{S}{y}\right)$

$$Gw\,Cr = S$$

$$\frac{\Delta y}{y} \cdot \frac{I}{\Delta y} = \frac{S}{y} \ldots\ldots (I = S)$$

अर्थव्यवस्था एक स्थिर दराने वाढवायची असेल तर ‘उत्पादनातील वाढ’ आणि ‘उत्पन्नातील वाढ’ यातील दर समान असावयास पाहिजे. याचाच अर्थ

$$Gw = \frac{S}{Cr}$$

उत्पन्न अपेक्षित दराने वाढले तर देशातील भांडवल याचा उचीत (योग्य) उपयोग होईल आणि त्यामुळे उत्पादक गुंतवणूक करण्यास उत्सूक असतील.

पूर्ण रोजगार संतुलन स्थितीमध्ये G आणि Gw समान राहिले पाहिजेत. त्यामुळे अर्थव्यवस्थेत स्थिर विकास होईल म्हणजे आर्थिक विकास हा स्थिर गतीने होईल आणि C = Cr म्हणजे प्रत्यक्ष भांडवली वस्तू आणि स्थिर विकासासाठी आवश्यक भांडवली वस्तू समान हव्यात.

याचाच अर्थ G = Gw पण जर G आणि Gw समान नसतील $(G \neq Gw)$ तर असमतोल निर्माण होईल. उदा.

अ) जर $G > Gw$ तर $C < Cr$ याचा अर्थ जर देशातील प्रत्यक्ष वाढीचा दर हा अपेक्षित वाढीच्या दरापेक्षा जर जास्त असेल तर भांडवली वस्तूंचा साठा कमी राहील. यामुळे किंमतीत वाढ होईल व दीर्घकालीन (अनावृत्ती) भाववाढीची परिस्थिती निर्माण होईल. याचे कारण असे की क्षमतेतील वाढीने मान्यता दिलेल्या दरापेक्षा उत्पन्न हे जास्त वेगाने वाढते. यामुळे पुढे भांडवली वस्तुची कमतरता भासेल.

भांडवली वस्तुंचा प्रत्यक्ष (amount) साठा हा अपेक्षित भांडवली वस्तुंच्या साठ्यापेक्षा कमी असेल. अशा परिस्थितीमध्ये इच्छित गुंतवणूक (desired investment) ही इच्छित बचतीपेक्षा जास्त असेल आणि उत्पादन हे एकूण मागणीपेक्षा कमी असेल. त्यामुळे दीर्घकालीन भाववाढ (chronic inflation) होईल.

ब) याउलट जर $G < Gw$ तर $C > Cr$ याचा अर्थ जर देशातील प्रत्यक्ष वाढीचा दर हा अपेक्षित वाढीच्या दरापेक्षा कमी असेल तर भांडवली वस्तूंचा साठा जास्त राहील. अशा परिस्थितीत विकास दराला आवश्यक असलेल्या वाढीपेक्षा उत्पन्नातील वाढ कमी असेल. त्यामुळे देशात दीर्घकालीन मंदीची परिस्थिती निर्माण होईल. भांडवली वस्तूंचा साठा जास्त राहील आणि त्यामुळे इच्छित गुंतवणूकीत (desired investment) घट होईल. याचा परिणाम हा उत्पादन, रोजगार आणि उत्पन्न कमी होण्यात होईल. त्यामुळे दीर्घकालीन मंदी आढळून येईल.

क) वाढीचा नैसर्गिक दर (Gn) (Natural Growth Rate) : तिसरे मुलभूत समीकरण पुढीलप्रमाणे मांडले (लिहिले) जाते. $Gn.Cr = or \neq S$. यात Gn = वाढीचा नैसर्गिक दर. लोकसंख्येतील वाढ आणि तांत्रिक सुधारणा या दोन घटकांमुळे देशातील आर्थिक वाढीचा जो दर आवश्यक असतो त्यास नैसर्गिक वाढीचा दर असे म्हटले जाते.

वाढीचा हा नैसर्गिक दर विविध समष्टी घटकांवर अवलंबून असतो. उदा. लोकसंख्या, तंत्रज्ञान, नैसर्गिक साधनसंपत्ती, भांडवली उपकरणे, यंत्रसामग्री इत्यादी. यास ‘पूर्ण रोजगार विकास दर’ अथवा ‘संभाव्य विकास दर’ असे म्हणतात. हा पूर्ण रोजगारातील उत्पादन वाढीचा दर असतो आणि तो वाढती लोकसंख्या आणि तंत्रज्ञानातील प्रगतीचा दर यानुसार ठरविला जातो.

आता पूर्ण रोजगार समतोल वाढीसाठी Gn = Gw = G श्रमिक आणि भांडवल यांच्या संदर्भात जर उत्पादनाचा एकत्र विचार केला तर, Gn आणि Gw म्हणजे, विकासाचा नैसर्गिक दर आणि विकासाचा अनुज्ञेय दर समान होणे आवश्यक आहे. यासाठी श्रमिक शक्तीच्या वाढीचा दर, बचतीचे प्रमाण आणि भांडवल गुणक यांचे योग्य प्रमाण साधणे नेहमीच आवश्यक ठरते.

यापैकी, श्रमिक शक्तीच्या वाढीचा दर आणि भांडवल गुणक या बाह्य घटकांनी ठरतात तर बचतीचे प्रमाण हे उत्पन्नाच्या वाढीनुसार ठरते. अशी गुंतवणूक मागणीच्या अपेक्षेवर अवलंबून असते. मागणीची ही अपेक्षा नेहमीच खरी ठरेल, असे निश्चितपणे सांगता येत नाही. श्रमीकांच्या वाढीचा एखादा विशिष्ट दर असेल आणि जर मागणी कमी झाली तर त्यामुळे बेकारीची समस्या निर्माण होईल. याउलट जर मागणी वाढली तर श्रमीकांचा तुटवडा होण्याची समस्या निर्माण होईल.

अर्थव्यवस्थेचे वाढीच्या स्थिर पथापासूनचे विचलन सुरु झाले म्हणजे आवर्त पद्धतीने त्याच दिशेने वाढते. जेव्हा $G > Gw$ तेव्हा भाववाढ, तर जेव्हा $G < Gw$ तेव्हा मंदी वाढत जाते.

हॅरॉड यांनी या विचलनाच्या कमाल आणि किमान मर्यादा सांगितल्या आहेत. Gn मुळे कमाल मर्यादा ठरते व $G > Gn$ अशी स्थिती कधीच निर्माण होत नाही. पण Gn हा Gw पेक्षा कमी असू शकतो $(Gn < Gw)$. यावेळी उत्पन्नातील वाढ ही Gn या दरापर्यंत येऊन थांबते. उत्पन्नाच्या वाढीचा दर हा Gn च्या पलीकडे जाऊ शकत नसल्याने व $Gw > Gn$ अशी स्थिती असल्याने उत्पन्न वाढीचा दर पेक्षा कमी राहून अतिरिक्त उत्पादन होते व अर्थव्यवस्था घसरणीला लागते. तसेच जर $Gw > G \ and \ Gn$ तर दीर्घकालीन कुंठीतावस्था (dullness) निर्माण होते.




G = Gw = Gn

जर $Gn > Gw$ तर G सुद्धा Gw पेक्षा पुढे असेल. त्यामुळे भरभराट होते व पूर्ण रोजगार असतो. अशावेळी भाववाढ होऊ शकते.

जर $Gw > Gn$ तर G हा Gn पेक्षा बऱ्याच वेळेला कमी असतो. मंदीची हा काळ कायम राहत नाही. मंदीची खालची पातळी ही उपभोगाच्या खालच्या पातळीने ठरवली जाते. परंतु उपभोग पातळी ही एका मर्यादे पलीकडे खाली जाऊ शकत नाही. त्यामुळे स्थिर भांडवल (न्यूनतम) कमी पातळीच्या खाली जाऊ शकत नाही. मग संयोजकाच्या हस्तक्षेपामुळे पटकन सुधारणा होते.

**डोमरचे विवेचन / डोमरचे प्रतिमान (Domar's Model) :**

डोमर यांनी आपले प्रतिमान / विवेचन हे पुढील प्रभावाभोवती मांडतो. आपल्याला माहीतच आहे की, विकास प्रक्रियेत 'गुंतवणूक' ही दुहेरी भूमिका बजावते. एका बाजूने गुंतवणूक ही उत्पन्न निर्माण करते तर दुसऱ्या बाजूने गुंतवणूक ही उत्पादन क्षमता वाढविते. अशावेळी गुंतवणूक की कोणत्या दराने वाढली पाहिजे की ज्यामुळे उत्पन्नातील वाढ ही उत्पादन क्षमता वाढी इतकी असेल व त्यामुळे पूर्ण रोजगार राखता येईल.

या प्रश्नाचे उत्तर डोमर यांनी गुंतवणूकीद्वारे एकूण पुरवठा आणि एकूण मागणी यातील दुवा स्पष्ट करीत दिले.

**पुरवठ्याची बाजू :** डोमर यांनी असे सांगितले की समजा वार्षिक गुंतवणूकीचा दर जर 'I' असेल आणि नवीन तयार केलेल्या भांडवलाची वार्षिक उत्पादन क्षमता ही प्रत्येक डॉलर मागे 'S' असेल तर अशावेळी जर 'I' डॉलरची गुंतवणूक केली, तर त्याची उत्पादन क्षमता ही प्रति डॉलर I . S इतकी असेल.

परंतु नवीन गुंतवणूक ही जुन्या गुंतवणूकीची किंमत मोजूनच होते. ही नवीन गुंतवणूक जुन्या गुंतवणूकीबरोबर श्रम, बाजार, इतर उत्पादन घटक यासाठी स्पर्धा करते. त्यामुळे जुन्या कारखान्यातील (Plants) उत्पादन कमी होते व त्यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षमतेतील वाढ ही I. S पेक्षा कमी असते. हे $I \bullet \sigma$ याद्वारे दाखविले जाते. यात $I \bullet \sigma < I \bullet S$ (यात $\sigma$ (sigma) म्हणजे गुंतवणूकीची सरासरी उत्पादन क्षमता $\frac{\Delta y}{I}$) यास Sigma Effect असे म्हणतात.

**मागणीची बाजू :** मागणीची बाजू ही केन्सच्या गुणक तत्वाने स्पष्ट (विशद) केली आहे. जर उत्पन्नातील वार्षिक वाढ $\Delta y$ ही गुंतवणूकीतील वाढ ही $\Delta I$ आणि बचत प्रवृत्ती ही (सिमांत प्रवृत्ती) $\alpha$ (alpha) असेल (म्हणजे $\alpha = \frac{\Delta s}{\Delta y}$) तर उत्पन्नातील वाढ ही गुणक वेळा $\left(\frac{1}{\alpha}\right)$ गुंतवणूकीतील वाढी इतकी असेल. म्हणून $\Delta y = \Delta I \bullet \frac{1}{\alpha}$

अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराच्या उत्पन्न पातळीवरचे संतुलन राखण्यासाठी / टिकविण्यासाठी एकूण मागणी आणि एकूण पुरवठा सारखा असणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण प्रतिमानाच्या एका मुलभूत समीकरणाशी येतो.

$$\left[\Delta I \bullet \frac{1}{\alpha} = I \bullet \sigma\right]$$

$$\Delta I \bullet \frac{1}{\alpha} = I \bullet \sigma$$

$$\Delta I \bullet \frac{1}{\frac{\Delta s}{\Delta y}} = \not{I} \bullet \frac{\Delta y}{\not{I}}$$

$$\Delta I \bullet \frac{1}{\frac{\Delta s}{\Delta y}} = \Delta y$$

$$\Delta I = \Delta y \bullet \frac{\Delta s}{\Delta y}$$

$$\Delta I = \Delta s$$

**तुलनात्मक अभ्यास :**

| हॅरॉडचे विवेचन | डोमरचे विवेचन |
|---|---|
| GC = s | $\Delta I \bullet \frac{1}{\alpha} = I \bullet \sigma$ |
| $\frac{\Delta \not{y}}{y} \bullet \frac{1}{\Delta \not{y}} = \frac{s}{y}$ | $\Delta I \bullet \frac{1}{\frac{\Delta s}{\Delta y}} = \not{I} \bullet \frac{\Delta y}{\not{I}}$ |
| $\frac{I}{y} = \frac{s}{y}$ | $\Delta I \bullet \frac{1}{\frac{\Delta s}{\Delta y}} = \Delta y$ |
| | $\Delta I = \Delta \not{y} \bullet \frac{\Delta s}{\not{\Delta y}}$ |
| I = S | $\Delta I = \Delta S$ |

हॅरॉडचा विकास वेग व डोमरचा विकास वेग हे सारखेच आहेत. याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

$$\alpha = \frac{s}{y} \qquad \therefore s = \alpha y$$

$$\alpha = \frac{\Delta y}{I} \qquad \therefore \Delta y = \sigma I$$

परंतु $S = I \qquad \therefore I = \alpha y$

$$\Delta y = I\sigma \qquad \therefore I = \frac{\alpha y}{\sigma}$$

$$\therefore \alpha y = \frac{\Delta y}{\sigma} \qquad \therefore \alpha \times \sigma = \frac{\Delta y}{y}$$

याचाच अर्थ $\alpha \bullet \sigma = Gw$

कारण $Gw = \frac{\Delta y}{y}$

१) हॅरॉड यांच्या मते, व्यवसाय चक्र हे वृद्धी पथावरचा अविभाज्य भाग / घटक आहे.

डोमर यांच्यामते ते असे नाही, परंतु गुंतवणूकीचा सरासरी उत्पादकतेत चढ उताराची तरतूद करुन त्याला डोमरच्या प्रतिमानात सामावून घेतले गेले.

२) हॅरॉड यांनी सीमांत भांडवल उत्पादन गुणोत्तर आणि प्रवेगाचा (accelerator) वापर केला. तर डोमर यांनी परस्पर (अन्योन्य) भांडवल उत्पादन गुणोत्तर आणि गुणकाचा (multiplier) वापर केला.

३) हॅरॉड यांनी भांडवल संचयन आणि पूर्ण क्षमता वाढ (वृद्धी) यातील तांत्रिक संबंध स्पष्ट केला. तसेच हॅरॉड यांनी एका बाजूला मागणीतील वाढ आणि चालु उत्पादन व दुसऱ्या बाजूला भांडवल संचयन यातील वर्तणूक संबंध (नाते) (Behavioural relationship) स्पष्ट केले. डोमर यांनी फक्त तांत्रिक संबंध स्पष्ट केला.

**हॅरॉड - डोमर प्रतिमानाच्या मर्यादा :**

१) वरील दोन्ही प्रतिमानात बचत प्रवृत्ती व भांडवल उत्पादन गुणोत्तर (प्रमाण) हे स्थिर असते असे गृहीत धरले आहे. परंतू हे वास्तवाला धरुन नाही. प्रत्यक्षात या दोन्हीमध्ये दीर्घकाळात बदल होऊ शकतो.

२) श्रमीक आणि भांडवल हे स्थिर (निश्चीत) प्रमाणात वापरले जातात असे गृहीत धरले. परंतू हे बरोबर नाही. सर्वसाधारणपणे श्रम भांडवलासाठी प्रतिस्थापित केले जातात आणि अर्थव्यवस्था ही स्थिर विकासाच्या मार्गावर सहजतेने मार्गक्रमण करते.

३) या दोन्ही प्रतिमानामध्ये किंमत पातळी स्थिर ठेवली आहे. या दोन्ही प्रतिमानांना किंमत पातळीतील बदलाचा विचार करण्यात अपयश आले आहे. किंमत पातळीमध्ये किंवा किंमतीत कालांतराने नेहमीच बदल होत असतात.

४) व्याजदरात बदल होत नाही असे या दोन्ही प्रतिमानांमध्ये गृहीत धरले आहे. परंतु हे गृहीत अंशबद्ध आहे. प्रत्यक्षात व्याजदरात बदल होतात व ते गुंतवणूकीवर परिणाम करतात.

५) वरील दोन्ही प्रतिमाने ही सरकारी (शासकीय) कार्यक्रमांचा / उपक्रमांचा एकूण आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष करतात.

६) या प्रतिमानांमध्ये संयोजकाच्या वर्तणूकीकडे दुर्लक्ष केले गेले आहे. खर म्हणजे संयोजकाची वर्तणूक ही वाढीच्या अनपेक्षित दरामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

७) भांडवली वस्तू आणि उपभोग वस्तु यामध्ये भेद करण्यात या प्रतिमानांना अपयश आले आहे.

८) वरील दोन्ही प्रतिमानांनी सरकारी हस्तक्षेप होत नाही, असे गृहीत धरले आहे. परंतु हे वास्तवाला धरुन नाही.

९) वरील दोन्ही प्रतिमानांमध्ये विदेशी व्यापार होत नाही.

(Closed Economy / बंदीस्त अर्थव्यवस्था) असे गृहीत धरले आहे. परंतु आपल्याला असे आढळले की आर्थिक विकासात / वृद्धीत विदेशी व्यापाराचे महत्त्व नाकारता येत नाही. हे वास्तवाला धरुन नाही.

**हॅरॉड - डोमर प्रतिमान आणि अविकसित / विकसनशील देश - परस्पर संबंध:**

हॅरॉड आणि डोमर यांची प्रतिमाने ही मुख्यत्वेकरुन अर्थव्यवस्थेची कुठीतावस्था (ठप्प) आणि असमतोल याचा विचार करताना दिसतात. हे जरी खरे असले तरी आपल्याला असे आढळून येते की दोन्ही प्रतिमानाचा वापर हा अविकसित / विकसनशील देशांमधील काही समस्या सोडविण्यास करता येऊ शकतो.

अविकसीत देशांमध्ये साधनसामुग्रीचा किंवा संसाधनाचा पूर्ण वापर / उपयोग होताना दिसत नाही. बरेचदा हा वापर अपूर्ण असतो किंवा अयोग्य पद्धतीने केला जातो. विकसनशील देशांतील या महत्त्वाच्या संसाधनाचा / साधनसामुग्रीचा पूर्ण उपयोग होण्याच्या दृष्टीने विकासाचा आवश्यक दर ठरविणे गरजेचे असते. उत्पन्नाची विशिष्ट पातळी गाठण्यासाठी आवश्यक असा बचत दर व तसेच भांडवल उत्पादन गुणोत्तर ठरविणे आवश्यक असते. ह्या सर्व गोष्टी वरील दोन सिद्धांतामुळे / प्रतिमानांमुळे शक्य होतात. उदा. जर वाढीचा अनुज्ञेय / आवश्यक दर हा २% असेल व भांडवल उत्पादन गुणोत्तर हे ३ : १ असेल, तर बचतीचा योग्य दर हा २ × ३ = ६% (प्रतिवर्षी) असा ठरविता येतो.

हॅरॉड यांनी आपल्या प्रतिमानात / सिद्धांतात काही बदल व सुधारणा केल्या आहेत. जेणेकरुन हा सिद्धांत अविकसित देशांना लागू करता येईल. बचतीच्या पुरवठा - मागणीचे स्पष्टीकरण करण्यासाठी हॅरॉड यांनी नैसर्गिक व्याजदराची कल्पना मांडली. हा दर $(\alpha n)$ म्हणजे दरडोई उत्पन्नाचा नैसर्गिक दर $(Pn)$ व वाढीचा नैसर्गिक दर यांचा गुणाकार व उत्पन्नाची लवचिकता $(ey)$ यांचे गुणोत्तर आहे. याचाच अर्थ $\alpha n = Pn\frac{Gn}{ey}$ ची किंमत १ पेक्षा कमी असेल $(<1)\alpha n$ हा दर $ey$ च्या व्यस्त प्रमाणात बदलतो हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भांडवलाचा वापर $\alpha n$ च्या व्यस्त प्रमाणात बदलेल हे स्पष्ट आहे.

विकासासाठी भांडवल पुरवठा आवश्यक आहे व त्या भांडवल पुरवठ्यासाठी बचतीची आवश्यकता असते. भांडवल पुरवठा हा बचतीवर अवलंबून असतो. CF = R (sg.) सर्वसाधारणपणे अविकसित देशांमध्ये बचतीचे प्रमाण हे आवश्यकतेपेक्षा कमी असते. जर प्रत्यक्ष बचत ही आवश्यकतेपेक्षा जास्त असेल तर $Gw > Gn$ अशी परिस्थिती निर्माण होईल. आता बचत जास्त असल्याकारणाने उद्योजक हे जास्त गुंतवणूक करतील. परंतु अविकसित देशांमध्ये बचतीचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असणे ही गोष्ट / परिस्थिती दीर्घकाळात शक्य नाही. त्यामुळे $Gw > Gn$ ही परिस्थिती निर्माण होणे शक्य नाही. या उलट वाढीचा प्रत्यक्ष दर (G) हा वाढीच्या अपेक्षित (अनुज्ञेय) दरापेक्षा कमी $(G < Gw)$ राहण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे मंदीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

प्रचंड प्रमाणावरील गुंतवणूक, चलन फुगवठा व अल्प प्रमाणावरील बचत ही अविकसित देशांची प्रमुख लक्षणे आहेत. हॅरॉड यांनी असे सुचविले की प्रचंड गुंतवणूकीसाठी बँकाकडून पत पुरवठा करण्यात यावा व चलन वाढीमुळे मिळणारा नफा हा भांडवल बाजारात (Capital Market) गुंतवला जावा. अविकसित देशात संघटित बाजार नसल्याने पत-पैसा पुरविण्याची जबाबदारी बँकावर पडते. यासाठी एक चांगला उपाय म्हणजे प्रभावी उपाय योजनांनी बचतीचे

प्रमाण वाढविणे. असे करीत असताना सामाजिक व संस्थागत बदल घडवून आणणे सुद्धा अत्यंत आवश्यक आहे.

**अविकसित देशाच्या संदर्भात हॅरॉड - डोमर सिद्धांताची उपयोगिता / व्यवहार्यता (Applicability) :**

हॅरॉड - डोमर सिद्धांत / प्रतिमाने यांचा अविकसित देशातील विकासाबाबतचा वापर हा अत्यंत अल्प आहे. या सिद्धांताचा वापर करण्यात अनेक मर्यादा / अडचणी आहेत.

**१) विविध / वेगळी परिस्थिती (Different Conditions):**

हॅरॉड - डोमर प्रतिमाने / सिद्धांत हे विकसित देशांना संभाव्य कुंठीतावस्थेपासून रोखण्यासाठी मांडले होते. त्यांनी कधीच विकसनशील देशातील औद्योगिकीकरण कार्यक्रमांना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला नाही.

**२) बचत प्रमाण (Saving Ratio):**

उच्च बचत प्रमाण आणि उच्च भांडवल - उत्पादन प्रमाण हे हॅरॉड-डोमर प्रतिमानाचे वैशिष्ट्य आहे. परंतु अविकसित देशांमधील अनेक लोकांना फक्त निर्वाह वेतन मिळत असल्या कारणाने तेथे बचतीचे प्रमाण कमी असते.

**३) भांडवल - उत्पादन प्रमाण (Capital Output Ratio):**

ज्या ठिकाणी सामान्य उत्पादकता ही अनेक कमतरतांनी बाधित असते. त्या ठिकाणी भांडवल उत्पादन प्रमाणाचा अचूक अंदाज देणे अतिशय कठीण आहे.

**४) संरचनात्मक बेकारी (Structural Adjustment):**

प्रो. कुरीहारा यांच्या मते, हॅरॉड - डोमर यांचा गुंतवणूक वृद्धी दर हा अविकसित देशांमध्ये आढळणाऱ्या संरचनात्मक बेकारी या समस्येला सोडविण्यात अपयशी ठरला आहे. अविकसित देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर हा भांडवल संचय वाढीच्या दरापेक्षा जास्त असतो.

**५) छूपी / प्रछन्न बेकारी (Disguised Unemployment):**

हॅरॉड - डोमर सिद्धांत हे पूर्ण रोजगार गृहीतावर आधारलेले आहेत. परंतू अविकसित देशांमध्ये अशी परिस्थिती आढळून येत नाही. अत्याधिक लोकसंख्या असलेल्या अनेक अविकसित देशांमध्ये छूपी / प्रच्छन बेकारी आढळून येते. परंतु हॅरॉड - डोमर प्रतिमाने या समस्येबाबत कोणताही उपाय सुचवित नाहीत.

**६) सरकारी / शासकीय हस्तक्षेप (Government Intervention):**

हॅरॉड - डोमर प्रतिमाने ही आर्थिक उपक्रमांमध्ये सरकारी हस्तक्षेप आढळत नाही किंवा नसतो. या गृहीतांवर आधारलेली आहेत. परंतु हे अविकसित देशांबाबत लागू पडत नाही. अविकसित देशांमध्ये सरकार / शासन हे आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. वेळप्रसंगी उद्योजकाची भूमिका सुद्धा निभावण्याची जबाबदारी घेते.

### ७) परदेशी / विदेशी व्यापार आणि मदत (Foreign Trade and Aid):

हॅरॉड - डोमर प्रतिमाने ही बंदीस्त अर्थव्यवस्था गृहीत धरतात. परंतु हे वास्तवाला धरुन नाही. अविकसित देशांमध्ये मुक्त अर्थव्यवस्था (Open Economy) असते. अविकसित देशांच्या आर्थिक विकासामध्ये विदेशी व्यापार व मदत हे फार महत्त्वाची भूमिका बजावतात.

### ८) किंमत बदल (Price Changes):

हॅरॉड - डोमर प्रतिमान हे सर्वसाधारण किंमत पातळी स्थिर असते, तिच्यात बदल होत नाही, असे गृहीत धरते. परंतु आपल्याला असे आढळून येते की, अविकसित देशांमध्ये विकासाबरोबर येणारे किंमत बदल हे अटळ असतात.

### ९) संस्थात्मक बदल (Institutional Changes):

हॅरॉड - डोमर प्रतिमाने ही कोणतेही संस्थात्मक बदल गृहीत धरीत नाहीत. परंतु प्रत्यक्षात असे दिसून येते की अविकसित देशांमध्ये संस्थात्मक बदल हे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

## ३.२ सोलोचे आर्थिक वृद्धी प्रतिमान (SOLOW’S MODEL OF GROWTH):

सोलो यांच्या आर्थिक वृद्धी प्रतिमानाने (सिद्धांताने) नवपरंपरागत आर्थिक वृद्धी सिद्धांतामध्ये भरीव कामगिरी केली आहे. सोलो यांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. यासाठी सोलो यांना अर्थशास्त्रामधील नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. नवपरंपरागत वृद्धी प्रतिमानांनुसार, राष्ट्रीय बाजारपेठेच्या उदारीकरणामुळे अथवा राष्ट्रीय अर्थव्यवस्था मुक्त केल्यामुळे अतिरिक्त ओघ वाढतो व त्यामुळे भांडवल निर्मितीच्या दरामध्ये वाढ होते. यामुळे उत्पन्न आणि भांडवलाची कमतरता असलेल्या गरीब विकसनशील देशांमधील भांडवल - श्रम गुणोत्तर व दरडोई उत्पन्न यामध्ये वाढ होते.

सोलो वृद्धी प्रतिमान हे हॅरॉड - डोमर वृद्धी प्रतिमानासाठी सर्वसाधारण पर्यायी प्रतिमान म्हणून मानले गेले. सोलोचे वृद्धी प्रतिमान हे हॅरॉड - डोमर प्रतिमानाचा विस्तार म्हणून मानले गेले. सोलो यांच्या मते हॅरॉड - डोमर प्रतिमान हे काही अवास्तव गृहीतांवर आधारलेले आहे. उदा. निश्चित घटक प्रमाण, स्थिर भांडवल - उत्पादन आणि भांडवल - श्रम प्रमाण इ. अशा अवास्तव गृहीतकांमुळे हॅरॉड-डोमर यांच्या प्रतिमानाच्या वैधतेबाबत सोलो यांच्या मनात शंका निर्माण झाली. भांडवल आणि श्रम यांमधील प्रतिस्थापन क्षमता (Substitutability) हा सोलो यांच्या प्रतिमानाचा महत्त्वाचा मापदंड आहे. यामुळेच सोलो प्रतिमान हे विकसित आणि अविकसित देशांशी निगडीत होते. कारण तांत्रिक गुणांक (भांडवल - श्रम प्रमाण, भांडवल - उत्पादन प्रमाण) हे श्रम केंद्रित (प्रधान) आणि भांडवल केंद्रीत (प्रमाण) विभाग या दोन्हीमध्ये बदलतात. अर्थात आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की सोलो यांनी हॅरॉड - डोमर यांची मुलभूत गृहीते टाकुन दिली नाहीत. सोलो यांनी हॅरॉड - डोमर वृद्धी समीकरणामध्ये श्रम हा दुसरा घटक मिळविला आणि तंत्रज्ञान (technology) हे परिमाण जोडले.

हॅरॉड - डोमर प्रतिमान हे स्थिर सहगुणक आणि स्थिर उत्पादन फलाच्या नियमाच्या गृहीतावर आधारित आहे.

**सोलो वृद्धी प्रतिमानाची गृहीते (Assumptions of Solow's Growth Model) :**

सोलो यांचे आर्थिक वृद्धी प्रतिमान हे खालील गृहीतांवर आधारलेले आहे.

१. स्थिर परतावा नियम / कायदा संचलित करतो (Production Function is homogeneous of First Degree)

२. श्रम आणि भांडवल या दोन्ही घटकांना स्थिर उत्पादन फलनाचा नियम लागू असतो.

३. श्रम आणि भांडवल यांना घटत्या उत्पादन परताव्याचा नियम वेगवेगळा लागू होतो.

४. श्रम आणि भांडवल असे दोन उत्पादन घटक आहेत आणि या दोन्ही घटकांना त्यांच्या सीमांत भौतिक उत्पादकतेनुसार मोबदला दिला जातो.

५. किंमत-वेतन-व्याजदर यांची लवचिक प्रणाली प्रचलित आहे.

६. तांत्रिक तटस्थता - तांत्रिक विकास हा भांडवलाच्या उत्पादकतेवर व श्रमाच्या कार्यक्षमतेवर परिणाम करीत नाही.

७. श्रमाची नित्य (Perpetuas) पूर्ण रोजगार स्थिती आहे.

८. भांडवलाचा उपलब्ध साठा हा पूर्णपणे वापरला जातो.

९. भांडवल आणि श्रम यांमध्ये प्रतिस्थापन क्षमता असते याचा अर्थ श्रम आणि भांडवल हे एकमेकांचे पर्याय म्हणून वापरले जातात.

१०. बचतीचे गुणोत्तर स्थिर आहे.

११. मजूरीचे दर आणि किंमत लवचिक असतात.

१२. दीर्घकालीन विकास हा तांत्रिक प्रगतीमुळे घडून येतो आणि बाह्य घटकांवरुन ठरतो. म्हणजेच, इतर सर्व घटकांच्या व्यतिरिक्त स्वतंत्रपणे घडतो.

१३. तांत्रिक सहगुणक हे परिमाण आहे आणि म्हणून विकासाच्या प्रक्रियेत, भांडवल-श्रम गुणोत्तर / प्रमाण हे समतोल गुणोत्तरांच्या दिशेने स्वतःला सामावून घेण्याची प्रवृत्ती दर्शविते.

**सोलो वृद्धी प्रतिमान (अगणितीय स्पष्टीकरण) (Solow's Model of Growth: Non-Mathematical Explanation) :**

सोलो वृद्धी प्रतिमानाचा अगणितीय दृष्टीकोनाचे स्पष्टीकरण खालील उदाहरणाद्वारे सांगता येईल. समजा आपल्याकडे श्रम आणि भांडवल आहे आणि भांडवलातील वाढ ही श्रम वाढीपेक्षा जास्त आहे. (असे विकसीत देशांमध्ये असते) अशा परिस्थितीमध्ये भांडवल-श्रम गुणोत्तर जास्त असते. जेव्हा भांडवल - श्रम गुणोत्तर (प्रमाण) वाढते तेव्हा दर कामगारागणीक उत्पादन कमी होते आणि राष्ट्रीय उत्पादन पडते (कमी होते). यामुळे बचत, गुंतवणूक आणि भांडवल साठा कमी होतो. घटण्याची किंवा कमी होण्याची ही प्रक्रिया तो पर्यंत चालू राहते जो पर्यंत भांडवलातील वाढ ही श्रम वृद्धी दराशी समान होते. त्यानंतर भांडवल - श्रम गुणोत्तर आणि

भांडवल - उत्पादन गुणोत्तर स्थिर राहते आणि या प्रमाणाला (गुणोत्तराला) समतोल प्रमाण (गुणोत्तर) असे म्हणतात.

सोलो आपल्या प्रतिमानामध्ये असे प्रात्यक्षिक दाखवितो की बदलत्या तांत्रिक गुणांकामुळे (भांडवल - श्रम आणि भांडवल - उत्पादन प्रमाण / गुणोत्तर), भांडवल श्रम गुणोत्तराची (प्रमाणाची) समतोल गुणोत्तराच्या दिशेने समायोजन करण्याची प्रवृत्ती कायम राहते. जर प्रारंभिक भांडवल-श्रम गुणोत्तर हे समतोल गुणोत्तरापेक्षा (ratio) जास्त असेल तर भांडवल आणि उत्पादन हे श्रम शक्तीपेक्षा कमी प्रमाणात वाढेल. नंतर अशी वेळ येईल की जेव्हा ही दोन्ही गुणोत्तरे (प्रमाण / Ratio) समान झालेली असतील. त्यामुळे भांडवल - श्रम गुणोत्तर काहीही असले तरी सोलो प्रतिमानामध्ये स्थिर वृद्धी समतोलाशी रुपांतरण प्रवृत्ती असते.

सोलो यांनी दुहेरी समाजाचा (Dual Society) विचार केला. अर्थव्यवस्था ही दोन क्षेत्रांनी (sectors) बनलेली असते. यातील एक क्षेत्र म्हणजे भांडवल किंवा औद्योगिक क्षेत्र आणि दुसरे क्षेत्र म्हणजे श्रम किंवा शेती (कृषी) क्षेत्र होय. भांडवल क्षेत्रात, भांडवल संचयनाचा दर हा श्रम अवशोषण (विलयन) दराला ओलांडतो. बदलत्या तांत्रिक सहगुणकामुळे या क्षेत्रात रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध होणे शक्य होते.

दुसरी स्थिती ही की जिच्यात दोन स्थिर समतोल बिंदू असतात. यातील एक हा उच्च भांडवल-श्रम गुणोत्तर दर्शवितो तर दुसरा कमी भांडवल - श्रम गुणोत्तर दर्शवितो. जर वृद्धी प्रक्रिया ही उच्च भांडवल -श्रम गुणोत्तराने सुरु झाली तर विकास घटक हे वर्गाने पुढे सरकतील आणि भांडवल केंद्रित (प्रधान) तंत्रज्ञानामुळे संपूर्ण व्यवस्था ही मोठ्या प्रमाणातील वृद्धीकडे वाटचाल करेल. या उलट जर वृद्धी प्रक्रिया ही कमी भांडवल - श्रम गुणोत्तराने सुरु झाली तर विकास घटक हे हळू हळू पुढे सरकतील. संपूर्ण व्यवस्था ही श्रम केंद्रित तंत्रज्ञानासह कमी वृद्धी दराकडे वाटचाल करेल. याद्वारे असे सांगितले आहे की उच्च भांडवल - श्रम गुणोत्तर किंवा भांडवल केंद्रीत (प्रधान) तंत्रज्ञान हे भांडवलशाही क्षेत्राच्या वाढ आणि वृद्धीसाठी उपयुक्त आहे तर कमी भांडवल - श्रम गुणोत्तर किंवा श्रम केंद्रीत (प्रधान) तंत्रज्ञान हे श्रम क्षेत्राच्या वृद्धी आणि विकासासाठी उपयोगी आहे.

**b) गणितीय स्पष्टीकरण (Mathematical Explanation) :**

सोलो प्रतिमानाचे गणितीय स्पष्टीकरण हे वर नमूद केलेल्या विविध गृहीतांवर आधारलेले आहे.

समाजाच्या एखाद्या वस्तूच्या वार्षिक उत्पादनाचा दर जर y (t) मानला व तो समाजाचे वास्तविक उत्पन्न दर्शवितो. वास्तव उत्पन्नामधील काही भाग हा उपभोगासाठी वापरला जातो व उर्वरित भागाची बचत आणि गुंतवणूक केली जाते जी रक्कम बचत केली जाते. ती s हा स्थिरांक असते आणि म्हणून बचतीचा दर s Y(t) आहे. भांडवलाचा साठा हा K(t) आहे. भांडवल साठ्यातील वृद्धीचा दर हा $\frac{dk}{dt}$ आहे, याला निव्वळ (net) गुंतवणूक मानले जाते. ते K या अक्षराने दर्शवितात. अशारितीने आपल्याला आपले मूळ समीकरण मिळते.

$$K = s\,Y \quad \ldots\ldots\ldots\ldots (1)$$

उत्पादन हे भांडवल (K) आणि श्रम (L) यांनी उत्पादीत केली जाते. ते उत्पादन फलनाने दर्शविले जाते. हे उत्पादन फलन खालीलप्रमाणे आहे.

$$Y = F\left(K, L\right) \ldots\ldots\ldots\ldots\ldots\ldots (2)$$

उत्पादन फलन हे स्थिर उत्पादन फलनाच्या नियमानुसार आहे असे गृहीत धरले आहे. याचा अर्थ जर सामग्री १०% वाढविली तर उत्पादनसुद्धा १०% ने वाढेल.

जर आपण समीकरण (१) मधील Y ची किंमत, समीकरण (२) मध्ये ठेवली तर नवीन समीकरण खालीलप्रमाणे असेल,

$$K = sF\left(K, L\right) \ldots\ldots\ldots\ldots\ldots\ldots (3)$$

समीकरण (3) असे दर्शविते की उपलब्ध भांडवल व श्रमशक्ती पूर्णपणे वापरण्यासाठी किती कालखंडात भांडवल संचय झाले पाहिजे. सोलो यांच्या मते, एखाद्या वेळेस जेवढा उपलब्ध भांडवल साठा व श्रमशक्ती पूर्णपणे वापरली जाते, तीच वर्तमान उत्पादन ठरविते. त्याचप्रमाणे वास्तव मजुरीचा दर समायोजित (adjust) केला जातो. त्यामुळे उपलब्ध श्रमपुरवठा वापरला जातो व सीमांत भौतिक उत्पादनाएवढा (MPP) मजुरीचा दर निश्चित केला जातो.

निव्वळ उत्पादनापैकी किती उत्पादनाची बचत व गुंतवणूक केली जाते हे बचतीची प्रवृत्ती ठरविते. हे वर्तमान काळात आलेले निव्वळ भांडवल संचय दर्शविते. हा निव्वळ भांडवल संचय आधीच्या साठलेल्या भांडवल साठ्यात भर घालतो. हे एकूण भांडवल भविष्यकाळासाठी उपलब्ध होते. ही सर्व प्रक्रिया परत परत घडत राहते.

श्रम शक्तीच्या वाढीचा दर हा भांडवल संचयाच्या दराबरोबर आहे की नाही हे स्थिर अवस्थेसाठी पहावे लागते. यासाठी, सोलोने आपले मुलभूत समीकरण भांडवल-श्रमिक (श्रम) गुणोत्तराच्या स्वरुपात खालीलप्रमाणे मांडलेले आहे.

$$r = sF\left(r, 1\right) - nr \ldots\ldots\ldots\ldots\ldots\ldots (4)$$

येथे r = भांडवल-श्रम (श्रमीक) गुणोत्तरातील बदलाचा दर
r = भांडवलाचे श्रमाचे (श्रमीकाशी) असलेले गुणोत्तर (K / L)
n = श्रमशक्तीमध्ये झालेले संबंधित बदल $\left(\frac{1}{L}\right)$

समीकरण (r) मध्ये, फलन $sF\left(r,1\right)$ हे प्रति श्रमिक उत्पादन म्हणून प्रति श्रमिक भांडवल मात्रा दर्शविते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर हा एकूण उत्पादन वक्र आहे व तो भांडवलाच्या घटत्या सीमांत उत्पादकतेशी संबंधित असतो. सोलोचा मुलभूत समीकरण (r) असे दर्शविते की, भांडवल श्रम (श्रमीक) गुणोत्तरातील बदलाचा दर (r) हा $sF\left(r,1\right)$ आणि $nr$ या

दोन परिमाणातील फरक असतो. $sF(r,1)$ ही संज्ञा भांडवलातील वाढ दर्शविते तर '$nr$' ही श्रमिकातील वाढ दर्शविते.

**वृद्धीचे स्वरूप (Growth Pattern) :**

सोलोच्या मुलभूत समीकरण (r) वर आधारित वृद्धीचे स्वरूप खालील आकृतीत दाखविले आहे.




वरील आकृतीमध्ये फलन '$nr$' आणि फलन $sF(r,1)$ हे दोन्ही वक्र एकमेकांना 'L' या बिंदूपाशी छेदतात. या ठिकाणी r = 0 आणि $r_1$ r आहे. तेव्हा भांडवल-श्रमीक गुणोत्तर हे स्थिर असते आणि त्याचा विस्तार श्रमशक्ती च्या दरा प्रमाणात विस्तारला पाहिजे. एकदा का भांडवल श्रमिक गुणोत्तर ($r_1$) हा स्थापित झाला की तो कायम राखला जातो आणि भांडवल व श्रम सारख्याच दराने वाढत राहतात. जेव्हा भांडवल श्रमिक गुणोत्तर ($r_1$) इतके असते, तेव्हा संतुलीत वृद्धी समतोल साधला जातो. या बिंदूत, वास्तव उत्पन्न हे संबंधित दर (n) बरोबर वाढत जाते आणि दर श्रमिकामागे उत्पादन स्थिर राहते.

भांडवल-श्रमिक गुणोत्तर $r_1$ हे स्थिर अवस्था दर्शविते. जर r हे $r_1$ पेक्षा कमी किंवा जास्त असेल तर अर्थव्यवस्था तिच्या मुळ पदावर येईल व त्यामुळे $r_1$ हा स्थिर समतोल असेल (वरील आकृती). $r_1$ च्या डाव्या बाजूला $r < r_1$ असेल. याबाबतीत, $nr < sF(r,1)$ आणि म्हणून $r < 0$ याचा परिणाम म्हणून r संतुलित बिंदू $r_1$ कडे जातो. त्याचप्रकारे $r_1$ च्या उजवीकडे $r > r_1$ असेल, याबाबतीत $nr < sF(r,1)$ आणि $r < 0$ म्हणून असेल याचा परिणाम म्हणजे r हा $r_1$ च्या दिशेने कमी होईल. अशाप्रकारे सुरुवातीला भांडवल संतुलीत वृद्धीच्या दिशेने जाईल. जर प्राथमिक भांडवल साठा हा संतुलीत मुल्यापेक्षा कमी असेल तर भांडवल व उत्पादन यातील वाढ श्रमशक्तीतील वाढीपेक्षा जास्त असेल, जोपर्यंत समतोल गुणोत्तर स्थापित होईल. तसेच जर प्राथमिक भांडवल साठा संतुलीत (समतोल) मुल्यापेक्षा जास्त असेल, तर भांडवल व उत्पादन यातील वाढ ही श्रमशक्तीतील वाढीपेक्षा कमी असेल, जोपर्यंत समतोल गुणोत्तर / प्रमाण (Equilibrium Ratio) स्थापित होईल.

आता आपण या बचतीच्या दरातील वाढ लक्षात घेऊ. जेव्हा 'S' बचतीचा दर 'r' ने वाढविला तर उत्पादन वाढीच्या दरातही वाढ होईल. तरीसुद्धा दीर्घकाळात 'S' बचतीमधील वाढ ही वृद्धीमध्ये वाढ घडवून आणू शकणार नाही. त्यामुळे फक्त $r_1$ या समतोलात वाढ होईल.

याचाच अर्थ, अर्थव्यवस्थेत बचतीतील वाढीमुळे भांडवल-श्रमिक गुणोत्तर व उत्पादन श्रमिक (श्रम) गुणोत्तर वाढेल परंतु दीर्घकालीन वृद्धी दर वाढणार नाही. हे खालील आकृतीत दर्शविले आहे.




वरील आकृतीत भांडवल श्रम (श्रमिक) गुणोत्तर (K / L) हे 'क्ष' अक्षावर व भांडवल श्रम (श्रमीक) गुणोत्तरातील बदलाचा दर हा 'य' अक्षावर दाखविला आहे. या आकृतीमध्ये 'S' या बचतीच्या दरातील वाढ, फलन $sF(r,1)$ दर्शविणाऱ्या वक्राला वर $s^1F(r,1)$ वक्राकडे ढकलते. त्यामुळे भांडवल श्रमीक (श्रम) गुणोत्तर समतोल $r_1$ पासून $r_1$ कडे सरकते. अशा तऱ्हेने 'S' बचतीमधील वाढ दर हा श्रमिकाच्या उत्पादन संतुलनात वाढ घडवून आणेल तसेच वृद्धीच्या दरात तात्पुरती वाढ होईल. भांडवल - श्रमीक गुणोत्तराच्या उच्च स्तर समतोलामुळे अर्थव्यवस्था उच्च स्तरावर गेल्यामुळे आर्थिक वृद्धीच्या दरात वाढ होईल.

अर्थात आकृती १ मध्ये दाखविल्याप्रमाणे मजबूत स्थिरता अपरिहार्य नाही हे उत्पादन वक्राच्या $sF(r,1)$ आकारावर अवलंबून असते.




वरील आकृतीमध्ये उत्पादन वक्र $sF(r,1)$ हा $nr$ या रेषेला तीन ठिकाणी छेदतो - $r_1$, $r_2$ आणि $r_3$. परंतु यापैकी $r_1$, आणि $r_3$ हे बिंदू स्थिर समतोल स्थिती दर्शवितात. कारण एकूण उत्पादकता वक्र $sF(r,1)$ हा $nr$ शी रेषेच्या वर आहे. तर $r_2$ या बिंदूपाशी तो वक्र $nr$ रेषेच्या खाली आहे. म्हणून $r_2$ ही अस्थिर समतोल स्थिती आहे. सुरुवातीच्या भांडवल-श्रम (श्रमीक) गुणोत्तरावरुन अर्थव्यवस्था ही संतुलीत वाढीकडे विकसित होत जाईल. (भांडवल-श्रम गुणोत्तर बिंदू $r_1$, किंवा $r_3$). यापैकी कोणत्याही स्थितीत श्रम पुरवठा, भांडवल साठा आणि वास्तविक उत्पादन हे n दराची अर्निबंध पद्धतीने वाढेल, फक्त $r_1$ जवळ $r_3$ पेक्षा कमी भांडवल असेल. म्हणून दरडोई उत्पादन पातळी ही $r_1$ पेक्षा कमी व $r_3$ पेक्षा जास्त असेल. संबंधित

संतुलीत वाढ समतोल हा $r_1$ येथे असेल. गुणोत्तर अथवा प्रमाण $r_2$ हे समतोल वृद्धी गुणोत्तराचे आहे. परंतु ते अस्थिर आहे.

सोलो यांच्या मते, वरील आकृती सर्व शक्यता संपवित नाही. सोलो यांनी जास्तीच्या दोन शक्यता खालील आकृतीमध्ये दाखविल्या आहेत.




वरील आकृतीमध्ये $nr$ हा किरण किंवा ही रेषा समतोल वृद्धी मार्ग दर्शविते. याठिकाणी अपेक्षित आणि नैसर्गिक वृद्धी दर समान असतात. वरील आकृतीमध्ये $S_1F^1(r,1)$ हा वक्र $nr$ रेषेच्या वर आहे. ही अती उच्च उत्पादन स्थिती दर्शविते. यामध्ये भांडवल आणि उत्पन्न हे श्रम पुरवठ्यापेक्षा जास्त वेगाने वाढते. या व्यवस्थेमध्ये, उत्पन्न आणि बचत एवढ्या प्रमाणात वाढतात की भांडवल श्रम (श्रमीक) गुणोत्तरात अमर्यादित वाढ होते. याउलट, $S_2F^{11}(r,1)$ हा वक्र मोठी अनुत्पादित व्यवस्था दर्शवितो. यामध्ये पूर्ण रोजगार पथ हा सतत कमी होणाऱ्या दरडोई उत्पन्नास कारणीभूत ठरतो. अर्थात या व्यवस्थेमध्ये एकूण उत्पन्न वाढते कारण निव्वळ गुंतवणूक ही नेहमी धन (Positive) असते आणि श्रम पुरवठा वाढत असतो. अर्थात दोन्ही व्यवस्थांमध्ये कायमच घटती सिमांत उत्पादकता आढळते.

अशारितीने आपण असे म्हणू शकतो की सोलो यांचे प्रतिमान हे नवपरंपरागत असून वैशिष्टपूर्ण आहे. सोलो यांचे प्रतिमान हे विकासाच्या सनातन आणि आधुनिक विचारांचा समन्वय (संश्लेषण आहे). हे पूर्ण रोजगार प्रतिमान असून पूर्ण रोजगार स्थिती टिकविण्याची जाणीवपूर्वक सरकारी (शासकीय) हस्तक्षेपाची गरज असते. या लवचिक प्रतिमानाचा हा महत्त्वाचा फायदा आहे की हे प्रतिमान व्यावहारिक शक्यतांचा सैद्धांतिक प्रतिरुप उपलब्ध करुन देते.

### सोलोच्या वृद्धी प्रतिमानाच्या मर्यादा (टीका) (Limitations (Criticism) of Solow's Growth Model :

सोलो यांचे प्रतिमान हे हॅरॉड - डोमर यांच्या प्रतिमानापेक्षा किंचीत सरस व वरच्या दर्जाचे आहे. हॅरॉड - डोमर प्रतिमानात सुरीच्या पात्याप्रमाणे (Knief - Edged) अत्यंत तीक्ष्ण स्वरूपात अर्थव्यवस्थेत समतोल साधला जातो (असतो). परंतु हा समतोल जर बिघडला तर अर्थव्यवस्था ही समतोलापासून दूर जाते. हॅरॉड - डोमर प्रतिमान उत्पादनातील स्थिर प्रमाणाच्या गृहीतावर आधारित आहे. याउलट सोलोचे प्रतिमान असे दर्शविते की उत्पादनातील स्थिर

प्रमाणाचे गृहीतक लक्षात घेतल्याशिवाय नियमीत वृद्धी शक्य आहे. सोलो प्रतिमानानुसार तांत्रिक प्रगती आणि श्रमशक्तीचा विस्तार करुन दीर्घकालीन वृद्धी ठरविता येते.

सोलो प्रतिमानाच्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

**१) अवास्तव गृहीते (Unrealistic Assumptions) :**

सोलो प्रतिमान हे पूर्ण स्पर्धा आणि पूर्ण लवचिक घटक किंमत (वेतन आणि व्याजदर) या अवास्तव गृहीतांवर आधारलेले आहे. परंतु प्रत्यक्षात आपल्याला पूर्ण स्पर्धा आणि पूर्व लवचिक वेतन व व्याजदर आढळून येत नाही. कामगार संघटनामुळे वेतन दर आणि रोखतेच्या सापळ्यामुळे व्याजदर हे अलवचिक असतात. यामुळे भांडवल-श्रम यांची लवचिकता कमी होते आणि त्यामुळे स्थिर वृद्धीतील स्थिरता अदृश्य होते.

**२) दीर्घकाळाची अस्पष्ट / संदिग्ध कल्पना (Vague Notion of Long Period) :**

स्थिर वृद्धी परत मिळविण्यासाठी लागणारा दीर्घकाळ हा नक्की केवढा असतो याचे स्पष्टीकरण या प्रतिमानात आढळत नाही. समायोजन किंवा बदलासाठी जर प्रदीर्घ काळ लागणार असेल, तर स्थिर वृद्धीच्या उपयुक्तेवर शंका येऊ शकते.

**३) संयोजकाच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष (neglects Entrepreners Expectations) :**

स्थूल (संपूर्ण) अर्थव्यवस्थेतील निर्णायक शक्ती म्हणून संयोजकाच्या अपेक्षांवर भर देण्यावर या प्रतिमानाने दुर्लक्ष केले आहे. याचे कारण म्हणजे या प्रतिमानात स्वतंत्र (अनवलंबी) गुंतवणूक मागणी फलनाचा अभाव आहे. याचे कारण असे की या प्रतिमानात असे गृहित धरले आहे की, गुंतवणूकीचे प्रमाण (Volume) हे नेहमी आधीच्या बचतीनुसार (exante savings) ठरविले जाते. परंतु हे वास्तववादी नाही.

**४) G आणि Gn यात फरक / भेद नाही (No Distinction between G and Gn) :**

सोलो प्रतिमान हे प्रत्यक्ष आणि नैसर्गिक वृद्धी दरामध्ये फरक करीत नाही. कारण त्यांच्या मते G हा नेहमीच Gn च्या पुढे असतो. परंतु प्रत्यक्षात अपूर्णतेमुळे आणि अर्थव्यवस्थेतील ताठरतेमुळे (अलवचिकतेमुळे rigid) G हा Gn च्या मागे पडू शकतो. त्यामुळे सोलो हा G आणि Gn यातील समतोल समस्येच्या बाहेर पडतो. ती समस्या सोडून देतो.

**५) तांत्रिक विकास आणि भांडवल संचय यातील संबंधाकडे दुर्लक्ष (Neglects relation between technical progress and capital accumulation) :**

सोलो प्रतिमान हे तांत्रिक विकास आणि भांडवल संचय यांच्या विभक्तपणावर (separation) आधारलेले आहे. म्हणजे प्रत्येक कामगारामागे भांडवल वाढविणे हे थोडे संदिग्ध / कठोर (tenuous) आहे. याचे कारण हे दोन्ही स्वतंत्र आहेत (Kadlor model काल्डर प्रतिमान). काल्डर यांने तांत्रिक ज्ञानाय भांडवल संचयाचे फलन केले.

**६) आंतरिक तांत्रिक प्रगतीकडे दुर्लक्ष (Ignores Endogenous technical Progress) :**

सोलो यांच्या मते, तांत्रिक प्रगती ही आर्थिक वृद्धी प्रक्रियेत बाह्य घटकांवरुन निर्धारित केली जाते. परंतु तांत्रिक प्रगती ही अध्ययन प्रक्रीया, संशोधनातील गुंतवणूक आणि भांडवल संचय इ. मुळे ही होऊ शकते. या सर्व बाबी सोलोने लक्षात घेतल्या नाहीत.

वरील मर्यादा जरी लक्षात घेतल्या तरी सोलो प्रतिमानाचे महत्त्व कमी होऊ शकत नाही.

## ३.३ सारांश (CONCLUSION) :

- हॅरॉड - डोमर प्रतिमान हे विकसीत देशांच्या अनुभवांवर आधारलेले आहे.
- हॅरॉड - डोमर यांच्या मते, गुंतवणूक ही अर्थव्यवस्थेमध्ये दुहेरी भूमिका बजावते. एका बाजूने गुंतवणूक ही उत्पन्न निर्माण करते, तर दुसऱ्या बाजूने गुंतवणूक ही भांडवली साठ्यात वाढ करुन अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढविते. यातील पहिल्याला मागणी परिणाम, तर दुसऱ्याला पुरवठा परिणाम मानले जाते.
- सोलो प्रतिमान हे विकसित व अविकसित देशांशी निगडीत होते.

## ३.४ प्रश्न (QUESTIONS)

१) हॅरॉड - डोमर वृद्धी सिद्धांत स्पष्ट करा.
२) हॅरॉड - डोमर प्रतिमान व विकसनशील देश यांमधील परस्परसंबंध स्पष्ट करा.
३) सोलोचे आर्थिक वृद्धी प्रतिमान स्पष्ट करा.

## ३.५ संदर्भ ग्रंथ (REFERENCES) :

1. Ray Debraj (2004), Developmen Economics, New Delhi.
2. www.Google.com

❖❖❖❖

## घटक -२

# ४

# वृद्धी व वितरणाचे आधुनिक सिद्धांत - II

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टे
४.१ तांत्रिक बदल पद्धती / दृष्टिकोन
४.२ तांत्रिक बदलाचे / विकासाचे हिक्स यांचे वर्गीकरण
४.३ हॅरॉडचे तांत्रिक विकासाचे वर्गीकरण
४.४ अभिसरण
४.५ अंतर्जात वृद्धी सिद्धांत
 ४.५.१ रोमरचा अंतर्जात वृद्धी सिद्धांत
 ४.५.२ लुकासचा अंतर्जात वृद्धी सिद्धांत
४.६ रोमर यांचे तांत्रिक बदल प्रतिमान
४.७ मानवी भांडवल
४.८ प्रश्न
४.९ संदर्भग्रंथ सूची

## ४.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. तांत्रिक बदल दृष्टिकोनाची संकल्पना समजून घेणे.
२. तांत्रिक बदलाचा हिक्स व हॅरॉड यांचा दृष्टिकोण अभ्यासणे.
३. अभिसरण ही संकल्पना अभ्यासणे.
४. मानवी भांडवल ही संकल्पना अभ्यासणे.

## ४.१ तांत्रिक बदल पद्धती / दृष्टिकोन (APPROACHES TO TECHNICAL CHANGE)

तांत्रिक बदल किंवा तांत्रिक प्रगती या दोन संकल्पना समानार्थाने घेतल्या जातात. साधारणतः तांत्रिक बदल हा तांत्रिक प्रगतीशी संबंधित असतो.

तांत्रिक बदल किंवा प्रगती यामध्ये नवीन उत्पादन पद्धतीचा शोध लावणे, नवीन उत्पादन विकसित करणे, नवीन तंत्रज्ञान अंमलात आणणे इ. गोष्टींचा समावेश केला जातो. तांत्रिक बदल हा उत्पादन फलनातील बदलाशी साधर्म्य साधतो. तांत्रिक बदलामुळे श्रम आणि भांडवल यांच्या उत्पादनक्षमतेमध्ये वाढ होते. (श्रम आणि भांडवल हे दोनच घटक आहेत असे गृहीत धरले आहे). यात समउत्पादन वक्र हा उजवीकडे पुढे सरकतो.

तांत्रिक बदल हा जेव्हा श्रम बचतकारी नसतो किंवा भांडवल बचतकारी नसतो तेव्हा तो बदल हा तटस्थ आहे असे म्हटले जाते. याउलट तांत्रिक बदल हा जेव्हा तटस्थ नसतो तेव्हा तो एकतर श्रमबचतकारी असतो किंवा भांडवल बचतकारी असतो. वृद्धी अर्थशास्त्र साहित्यामधील तटस्थ (निष्क्रिय) तांत्रिक बदल आणि तटस्थ नसलेला (अतटस्थ / क्रियाशील) तांत्रिक बदल या दोन महत्त्वाच्या व्याख्या हिक्स आणि हॅरॉड यांच्याशी संबंधित आहेत. अर्थात त्यांच्या वर्गीकरणाचे निकष वेगळे आहेत. त्यांच्या व्याख्यां मधील फरक हा त्यांच्या सैद्धांतिक दृष्टिकोनातील विविध संदर्भ प्रतिबिंबीत करतो. हॅरॉड याला अशा परिस्थितीमध्ये स्वारस्थ होते की ज्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेच्या वृद्धीच्या समतोल दरात अडथळा येणार नाही. याउलट हिक्स याला अशा परिस्थितीत स्वारस्य होते कि जिच्यात भांडवल आणि श्रम या दोहोंमधील उत्पन्न वितरणात बदल होत नाही.

आता आपण हिक्स आणि हॅरॉड यांनी विषद (स्पष्ट) केलेल्या तटस्थ तांत्रिक प्रगती या संकल्पनेचा अभ्यास करुया / ही संकल्पना समजून घेऊया.

## ४.२ तांत्रिक बदलाचे / विकासाचे हिक्स यांचे वर्गीकरण (HICKS CLASSIFICATION OF TECHNICAL PROGRES)

**तटस्थ तांत्रिक विकास (Neutral Technical Progress) :**

हिक्स यांच्या मते, तटस्थ तांत्रिक विकास / (नवप्रवर्तन) म्हणजे असा विकास जिथे एका विशिष्ट उत्पादनासाठी आपण दोन उत्पादन घटक जर सम प्रमाणात वापरले तर नवप्रवर्तनाचा (तांत्रिक विकास) परिणाम असा असेल की प्रत्येक घटकाच्या सीमांत उत्पादकतेत समप्रमाणात वाढ होईल.

उदा. एखाद्या वस्तुच्या उत्पादनासाठी आपण भांडवलाचे १० घटक आणि श्रमाचे / कामगारांचे १०० घटक वापरले. सुरुवातीला भांडवलाची सिमांत उत्पादकता ही १० युनीट्स आहे आणि श्रमाची सिमांत उत्पादकता ही १ युनिट आहे. आता तटस्थ नवप्रवर्तन हे सीमांत उत्पादकतेमध्ये समप्रमाणात वाढ करील. भांडवलाच्या सिमांत उत्पादकतेत १०.० युनिट पासून १२.० युनिट व श्रमाच्या सिमांत उत्पादकतेत १.० युनिट पासून १.२ युनीट पर्यंत वाढ होऊ शकते.

हिक्स यांच्या तटस्थ तांत्रिक विकासाचा / नवप्रवर्तनाचा अर्थ खालील आकृतीद्वारे दाखविण्यात येतो.




क्ष अक्षावर (मुळ बिंदूच्या उजवीकडे) (X-axis) दर माणसी भांडवल आणि य अक्षावर (Y-axis) दर माणसी उत्पादन दाखविले आहे. क्ष अक्षावरच (X-axis) मूळ बिंदूच्या डाव्या बाजूला आपण OR दाखवितो म्हणजे श्रम आणि भांडवल यांच्या सीमांत उत्पादनातील गुणोत्तर.

सुरुवातीला OF हा वक्र उत्पादन फलन दर्शवितो. या उत्पादन फलन वक्रावर T हा समतोल बिंदू आहे. OT या उत्पादन फलनावरील T या बिंदूपाशी असलेल्या WT या स्पर्धारिषेचा (स्पर्शिका tangent) उतार आपल्याला T या बिंदूपाशी असलेले भांडवलाचे सिमांत उत्पादन दर्शवितो. भांडवलात झालेल्या छोट्याश्या वाढीमुळे मिळालेले अधिक उत्पन्न याद्वारे दाखविले आहे. OW आपल्याला वेतन किंवा श्रमिकांचे सिमांत उत्पादन दाखविते.

वरील आकृतीमध्ये OR हा समतोल स्थितीमधील श्रमाच्या उत्पादकतेचे गुणोत्तर (प्रमाण) (OW) व भांडवलाच्या उत्पादकतेचे गुणोत्तर (r) मोजतो. याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

OWR या त्रिकोणाचा आपण विचार करुया. ज्याअर्थी RW चा उतार (जो WT च्या उताराइतका आहे) हा भांडवलाचे सिमांत उत्पादन (r) देतो, म्हणून आपण असे लिहू शकतो की, $r = \frac{OW}{OR}$

$$OR = \frac{OW}{r} = \frac{MP_L}{MP_K}$$

हिक्सच्या तटस्थ तांत्रिक प्रगतीसाठी, श्रमाचे सिमांत उत्पादन (OW) आणि भांडवलाचे सिमांत उत्पादन (r) यांच्यातील गुणोत्तर (OR) हे भांडवल-श्रम गुणोत्तराच्या कोणत्याही दिलेल्या मूल्याशी स्थिर असणे आवश्यक आहे.

वरील आकृतीमधील हिक्स यांचा तटस्थ तांत्रिक विकास असे सुचवितो की, जर तांत्रिक विकास हा OF वक्राला वर सरकवित असेल ($OF_1$) तर दोन सिमांत उत्पादनातील गुणोत्तर हे क्ष अक्षापासून टाकलेल्या अनुलंब अक्षावरील (Vertical axis) सर्व बिंदूशी समान असले पाहिजे. उदा. $ST_1$ ज्याअर्थी $OF_1$ हा वक्र OF च्या वर आहे. त्याअर्थी तांत्रिक प्रगतीमुळे

भांडवल-श्रम गुणोत्तराच्या प्रत्येक पातळीवर उत्पादित होऊ शकणाऱ्या उद्दिष्टिच्या (output) प्रमाणात वाढ झाली आहे.

जर हा तांत्रिक विकास हा हिक्स तटस्थ (Hicks neutral) हवा असेल तर $OF_1$ या वक्रावरील $T_1$ या बिंदूपाशी असलेली स्पर्शरेषा (स्पर्शिका) ही $RT_1$ सारखी R मधूनच गेली पाहिजे. असे झाले तरच श्रम आणि भांडवल यांच्या सीमांत उत्पादकतेतील गुणोत्तर $\left(\frac{OW_1}{r_1}\right)$ हे मूळ गुणोत्तराच्या $\left(\frac{OW}{r}\right)$ समान असेल.

म्हणून आपल्याकडे OF आणि $OF_1$ या उत्पादन फलनासहीत, $ST_1$ या अनुलंब रेषेवर (vertical line) हिक्सचा तटस्थ तांत्रिक विकास असेल (दर्शविला जाईल)

जर दोन घटकांमधील सिमांत उत्पादन गुणोत्तर / प्रमाण हे क्ष अक्षापासून (X-axis) काढलेल्या अनुलंब रेषेवरील प्रत्येक बिंदूशी समान असेल तरच तांत्रिक विकास हा हिक्स तटस्थ असतो.

**भांडवल बचतकारी आणि श्रम बचतकारी तांत्रिक विकास (Capital - Saving and Labour - Saving Technical Progress) :**

दोन घटकांची निविष्टी दिली असता जर नवप्रवर्तन हे भांडवलाच्या सीमांत उत्पादकतेपेक्षा श्रमाच्या सीमांत उत्पादकतेत वाढ करीत असेल तर तांत्रिक विकास हा भांडवल-बचतकारी असतो. अशावेळी श्रमापेक्षा कमी भांडवल वापरुन दिलेले उत्पादन (उद्दिष्टी) काढता येते.

आता उद्योगसंस्थेतील उत्पादनाच्या अत्यंत फायदेशीर मार्गासाठी भांडवल निविष्टी मधील घट जर जरुरी असेल, परंतु त्याची भरपाई ही श्रमाच्या रोजगारात (employment)वाढ करुन करण्यात आली ते नवप्रवर्तन हे पूर्णपणे श्रम वापरणारे आणि भांडवल बचतकारी असेल. अर्थात जर दोन्ही घटकांमध्ये घट होत असेल तर नवप्रवर्तन हे तुलनेने भांडवल बचतकारी आहे, असे म्हणता येते.

हिक्स यांच्या मते उद्योगसंस्था ही जवळजवळ नेहमीच श्रमाच्या तुलनेमध्ये कमी भांडवल निविष्टी (input) वापरुन भांडवल बचत नवप्रवर्तनाचा प्रतिसाद देईल. नवप्रवर्तनामुळे वापरलेल्या घटकांच्या सापेक्ष आणि निरपेक्ष प्रमाणात होणाऱ्या बदलाचा अचूक मार्ग हा विविध लवचिकतांवर अवलंबून असतो. एक म्हणजे हे अर्थव्यवस्थेतील भांडवल आणि श्रम यांच्या पर्यायाच्या / बदलीच्या लवचिकतेवर (elasticities) अवलंबून असते. कारण ते आपल्याला नवप्रवर्तनाचा दोन घटकांच्या किंमतीवर काय परिणाम होईल, हे ठरविण्यास मदत करतात. दुसरे म्हणजे अर्थव्यवस्था घडवणाऱ्या विविध उद्योगसंस्थांच्या वस्तूच्या लवचिकतेवर हे अवलंबून आहे.

त्याचप्रमाणे आपण श्रम बचत तांत्रिक प्रगतीची व्याख्या करु शकतो. तांत्रिक प्रगती ही श्रम बचतकारी तेव्हा असते, जेव्हा मूळ उत्पादन आणि दोन घटकांच्या दिलेल्या निविष्टीनुसार श्रमाच्या सिमांत उत्पादकतेच्या तुलनेत भांडवलाची सिमांत उत्पादकता वाढते. अशावेळी भांडवलापेक्षा कमी श्रम वापरुन दिलेले उत्पादन / उद्दिष्टी काढता येते. भांडवलात वाढ होते आणि श्रमाची संख्या पूर्णपणे कमी होते. अशावेळी नवप्रवर्तन हे संपूर्णपणे श्रम बचतशील आणि भांडवल वापरणारे असते.




## ४.३ हॅरॉडचे तांत्रिक विकासाचे (प्रगतीचे) वर्गीकरण (HARROD'S CLASSIFICATION OF TECHNICAL PROGRES)

**तटस्थ तांत्रिक प्रगती (Neutral Technical Progress) :**

हिक्सच्या तटस्थ तांत्रिक प्रगतीच्या व्याख्येचे पर्यायांची लवचिकता आणि मागणी यावर असलेले अवलंबित्व हे ही संकल्पना थोडी क्लिष्ट करते. हॅरॉड यांनी या व्याख्येवर टीका केली. कारण तटस्थता ही परिस्थितींवर (उत्पादन घटकांच्या आणि उत्पादनाच्या / वस्तूंच्या मागणी लवचिकतेवर) अवलंबून असते. त्या प्रत्यक्ष नवप्रवर्तनाच्या आंतरिक वैशिष्टांशी बऱ्यापैकी असंबधीत असतात. ही अशी एक संकल्पना आहे जिची व्याख्या ही स्थिर अर्थशास्त्र परंपरेत केली आहे. या कारणांसाठी वृद्धी आणि विकासाचे अर्थशास्त्रज्ञ हॅरॉड यांनी त्यांच्या 'Towards a Dynamic Progress' (गतीशील / गतीमान प्रगतीच्या दिशेने) या पुस्तकात दिलेल्या तांत्रिक विकासाच्या व्याख्येचा वापर करतात. हॅरॉड यांची तटस्थ तांत्रिक प्रगतीची व्याख्या ही भांडवल-उत्पादन (उद्दिष्टी) गुणोत्तराच्या दृष्टीने रचली गेली. हे हॅरॉड यांच्या व्याख्येचे मुख्य आकर्षण आहे.

हॅरॉड यांची तांत्रिक प्रगतीची व्याख्या ही नफ्याचा दर आणि भांडवल-उत्पादन (उद्दिष्टी) गुणोत्तर यांच्या संबंधाच्या दृष्टीने दिली आहे. हॅरॉड यांच्या तटस्थ तांत्रिक प्रगतीमध्ये भांडवलाची सिमांत उत्पादकता (जी नफ्याच्या दराइतकी असते असे गृहीत धरले आहे) आणि उत्पादनाची / उद्दिष्टिची सिमांत उत्पादकता या समान असणे आवश्यक आहे.

जर 'r' (नफ्याचा दर) आणि भांडवल-उत्पादन / उद्दिष्टी स्थिर असतील आणि जर तांत्रिक प्रगती झाली तर त्या तांत्रिक विकासाला हॅरॉड तटस्थ असे म्हणतात. पूर्ण स्पर्धेमध्ये जर 'r' स्थिर असणे याचा अर्थ असा होतो की हॅरॉड तटस्थ तांत्रिक प्रगतीमध्ये उत्पन्नाचे नफा आणि वेतन यांमधील वितरण जसेच्या तसे असते ते बदलत नाही. हॅरॉड यांच्या तटस्थ तांत्रिक

प्रगतीच्या काटेकोर व्याख्येसाठी जोपर्यंत भांडवल-उत्पादन / उद्दिष्टी गुणोत्तर स्थिर असेल तोपर्यंत नफ्याचा दर स्थिर राहणे आवश्यक आहे (भांडवल / उत्पादन / उद्दिष्टी दराची पातळी काहीही असो).

हॅरॉड यांची तटस्थ तांत्रिक प्रगती ही खालील आकृतीद्वारे विषद / स्पष्ट करता येते.




वरील आकृतीमध्ये दर माणशी भांडवल हे क्ष अक्षावर (X-axis) आणि दर माणशी उत्पादन / उद्दिष्टी ही य अक्षावर (Y-axis) घेतले आहे. वरील आकृतीमध्ये OF हे मुळ उत्पादन फलन आहे आणि अर्थव्यवस्था ही P या बिंदूपाशी आहे. इथे दरडोई उत्पादन / उद्दिष्टी (उत्पन्न) हे $OY_1$ आहे. भांडवल-उत्पादन / उद्दिष्टि गुणोत्तर हे $\frac{OK_1}{OY_1}$ इतके आहे. OR ही सरळ रेषा 'P' मधून जाते याचा अर्थ 'R' या बिंदूपाशी असलेले भांडवल - उत्पादन / उद्दिष्टि गुणोत्तर $\frac{OK_2}{OY_2}$ हे 'P' बिंदूपाशी असलेल्या गुणोत्तरा इतक असते. $\frac{OK_1}{OY_1}$

समजा तांत्रिक प्रगती झाली तर त्यामुळे उत्पादन फलन हे OF पासुन $OF_1$ पर्यंत वर सरकते (वाढते). आता 'R' या बिंदूपाशी अर्थव्यवस्था समतोल साधते. हॅरॉडच्या तटस्थ तांत्रिक प्रगतीसाठी भांडवलाची सिमांत उत्पादकता (r), नफा दर हे स्थिर असणे आवश्यक आहे (जेव्हा आपण OR या रेषेवर सरकतो - जिथे $\frac{K}{Y}$ पातळी दिलेली आहे आणि $\frac{OY_1}{OK_1} = \frac{OY_2}{OK_2}$ यासाठी 'P' या बिंदूपाशी असलेला OF वक्राचा उतार हा 'R' बिंदूपाशी असलेल्या $OF_1$ वक्राच्या उताराइतका असतो. याचा अर्थ P आणि R या बिंदूपाशी असलेल्या स्पर्श रेषांचा उतार समान असतो. AB आणि CD या स्पर्शरेषा (स्पर्शिका) अनुक्रमे P आणि R या बिंदूपाशी असलेली भांडवलाची सिमांत उत्पादकता मोजतात. OR या रेषेवरील / किरणावरील (Rav) कोणत्याही बिंदूशी उत्पादन फलनाचा उतार (नफा दर) स्थिर असतो.

हॅरॉड यांची तटस्थ तांत्रिक प्रगतीची व्याख्या ही अशी एक व्याख्या आहे जिथे स्थिर / भांडवल श्रम गुणोत्तर दिले असता नवप्रवर्तन हे स्वतः भांडवल आणि श्रम यांच्यामधील संबंधावर

परिणाम करीत नाही. प्रत्येक किंवा दर यंत्रागणीक असलेली उत्पादकता ही दर माणशी उत्पादकतेच्या समान प्रमाणात वाढेल. अर्थात प्रत्येक यंत्र आता जास्त उत्पादन करेल. म्हणून वस्तूची किंमत स्थिर ठेवली असता, मशीनच्या वस्तूचे मूल्य ज्या प्रमाणात वाढले असेल त्याच समान प्रमाणात वस्तुच्या प्रमाणात / वस्तुच्या दृष्टीने यंत्राचे मूल्य वाढले असणार. भांडवल - उत्पादन गुणोत्तर बदलणार नाही.

**भांडवल बचतकारी आणि श्रम बचतकारी तांत्रिक प्रगती (Capital - Saving and Labour-Saving Technical Progress) :**

अर्थात, जर तांत्रिक प्रगतीनंतर 'r' बदलला नसेल परंतु भांडवल-श्रम गुणोत्तर वाढले असेल तर तांत्रिक प्रगती ही श्रम बचतकारी असते. तांत्रिक प्रगतीनंतर जर 'r' बदलत नसेल परंतु भांडवल-श्रम गुणोत्तर घटत असेल तर तांत्रिक प्रगती ही भांडवल-बचतकारी असते.

म्हणून नवप्रवर्तन जर भांडवल बचतकारी असेल, स्थिर व्याजदरासहीत, तर त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातील श्रमाकडे जाणाऱ्या भागामध्ये (share) वाढ होईल. श्रम बचतकारी नवप्रवर्तनाच्या बाबतीत, स्थिर व्याजदरासहीत, राष्ट्रीय उत्पन्नाच्या श्रमाकडे जाणाऱ्या भागामध्ये (share) घट होते.

## ४.४ अभिसरण (CONVERGENCE) :

सोलो-स्वान नवसनातन वृद्धी सिद्धांताचा एक महत्त्वाचा अंदाज / भाकीत (Predictions) (किंवा परिणाम / or implications) म्हणजे अभिसरण (convergence) होय. एका अर्थव्यवस्थेने दुसऱ्या अर्थव्यवस्थेला गाठण्याच्या क्रियेस (प्रक्रियेस) (Catching-up Process) अभिसरण असे म्हणतात. १९९० नंतरच्या विस्तृत अनुभवजन्य संशोधनाचा केंद्रबिंदू हा अभिसरण वृद्धी अंदाज / भाकीत (Prediction) असा होता. हे विविध अर्थव्यवस्थांच्या वैविध्यपूर्ण माहिती संकलनाच्या (data sets) तुलनात्मक बाबींवर आधारित आहे. या विवादावर नवीन अनुभवजन्य वृद्धी वाङ्मयाच्या प्रकाशात चर्चा केली गेली आहे. वृद्धीच्या अभिसरणाचे दोन प्रकार आहेत.

१) परिपूर्ण किंवा बिनशर्त अभिसरण (Absolute or Unconditinal Convergence)
२) सशर्त अभिसरण (Conditional Convergence)

**१) परिपूर्ण किंवा बिनशर्त अभिसरण (Absolute or Unconditinal Convergence) :**

जर दोन बंदीस्त अर्थव्यवस्थांमध्ये (Closed Countries) / देशात समान बचत दर, समान लोकसंख्या वृद्धी दर, समान भांडवल घसारा दर आणि समान उत्पादन फलन असेल तर त्या दोन अर्थव्यवस्थांमधील स्थिर दरडोई भांडवल, मूल्ये, अवस्था आणि उत्पन्न किंवा दरडोई उत्पादन समान असेल. परंतु दरडोई भांडवलाची आणि दरडोई उत्पन्नाची कमी पातळी असलेला देश (अर्थव्यवस्था) वेगाने वाढेल आणि अखेरीस तो देश (अर्थव्यवस्था) दरडोई भांडवलाची आणि दरडोई उत्पन्नाची उच्च पातळी असलेल्या देशाला गाठेल / अभिसरेल (Catchup or Converse). दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर जेव्हा दरडोई उत्पन्नाची कमी पातळी

असलेला गरीब देशापेक्षा जास्त वेगाने वाढ (वृद्धी) करतो. तेव्हा त्याला परिपूर्ण किंवा बिनशर्त अभिसरण (Absolute or Unconditinal Convergence) असे म्हणतात. परिपूर्ण अभिसरण ही संकल्पना खालील आकृतीद्वारे स्पष्ट करता येते.




क्ष - अक्ष हा दरडोई भांडवल आणि य - अक्ष हा दरडोई उत्पन्न दर्शवितो. ४५° रेषा ही स्थिर अवस्था अट (परिस्थिती) दर्शविते. Sf (K) हा वक्र (n + d) K या रेषेला ज्या बिंदूशी छेदतो त्या ठिकाणी स्थिर अवस्था रेषा K दृढ / निश्चित केली जाते. समजा 'अ' आणि 'ब' या दोन देशांमध्ये s, n, d आणि f (K) या मापदंडाचे मूल्य समान आहे. परंतु 'अ' हा देश भांडवलाच्या कमी साठ्याने $K_A$ सुरुवात करतो आणि 'ब' हा देश भांडवलाच्या जास्त साठ्याने $K_B$ सुरुवात करतो. वरील आकृतीचा नागमोडी भाग असे दर्शवितो की, 'अ' हा देश सुरुवातीच्या कमी भांडवल साठ्यासहीत 'ब' या देशापेक्षा (जिथे सुरुवातीला जास्त भांडवल साठा आहे) जास्त वेगाने वाढतो / वृद्धी करतो. हे ठिपक्याच्या नागमोडी रेषेने वरील आकृतीत दाखविले आहे. अखेरीस 'अ' हा देश 'ब' या देशाला 'S' या बिंदूपाशी गाठतो किंवा अभिसरतो (catches up or converges). वरील आकृती 'S' या बिंदूपाशी 'अ' आणि 'ब' हे दोन्ही देश स्थिर अवस्थेत आहेत (K), म्हणून परिपूर्ण अभिसरण हे दरडोई उत्पन्न वृद्धी दर आणि प्रारंभिक दरडोई उत्पन्न पातळी यामधील व्यस्त संबंध दर्शविते.

**अनुभवजन्य प्रमाण / प्रायोगिक दाखला (Empirical Evidence) :**

बॅरो, डीलाँग, बोगोल इ. अनेक अर्थशास्त्रज्ञांनी परिपूर्ण अभिसरण गृहीतकाची प्रायोगिक / अनुभवजन्य चाचणी केली. ही चाचणी दरडोई उत्पन्न वृद्धी दर आणि दरडोई उत्पन्न प्रारंभिक पातळी यांमधील सांख्यिकीय संबंधावर आधारीत ही चाचणी केली. जवळपास सर्वांनी असा निष्कर्ष काढला की वरील गृहीतक हे अनेक देशाच्या बाबतीत आढळून येत नाही.

**२) सशर्त अभिसरण (Conditional Convergence) :**

जर विविध देशांमधील व्याजदर, लोकसंख्या वृद्धी दर इत्यादी मापदंड वेगळे / भिन्न असतील तर त्यांच्या स्थिर स्थितीतसुद्धा भिन्न असतील. परंतु काही कालावधीनंतर विविध देशांमधील वृद्धी दर हे अखेरीस समान / सारखे असतील.

हे अभिसरण सशर्त आहे, कारण दरडोई भांडवल आणि दरडोई उत्पन्न स्थिरता पातळी जी बचत दर, लोकसंख्या वृद्धी दर आणि उत्पादन फलन स्थिती यांवर अवलंबून आहे ती वेगवेगळ्या देशात भिन्न असते. म्हणून वृद्धी दरावर परिणाम करणारी वैशिष्ट्ये ही समान असली पाहिजेत. या एका अटीवर विविध देश एकवटतील / जवळ येतील (converge). याचा अर्थ जर शैक्षणिक पातळी, राजकीय स्थिरता इ अतिरिक्त घटकांचा समावेश केला, तर विविध देशांमधील वृद्धी दराच्या फरकाचे आपल्याला स्पष्टीकरण देता येईल. उदाहरणार्थ, जर एखाद्या देशामध्ये निकृष्ट शैक्षणिक व्यवस्था किंवा अस्थिर राजकीय अवस्था असेल तर दरडोई भांडवल पातळी आणि दरडोई उत्पन्न पातळी उच्च / जास्त असूनसुद्धा कमी किंवा निम्न पातळी वृद्धी दर टिकून राहील.

सशर्त अभिसरण संकल्पना ही खालील आकृतीद्वारे स्पष्ट करता येते. या आकृतीत क्ष अक्षावर दरडोई भांडवल आणि य अक्षावर दरडोई उत्पन्न घेतले आहे. सशर्त अभिसरण संकल्पना ही दोन देशांच्या संदर्भासह स्पष्ट केली आहे. यामध्ये 'अ' हा गरीब देश तर 'ब' हा श्रीमंत देश आहे. या दोन्ही देशांमधील दरडोई भांडवलाची प्रारंभिक साठा आणि बचत दर वेगवेगळे आहेत. त्यामुळे त्याच्या स्थिर अवस्था वेगवेगळ्या आहेत.




'ब' देशातील दरडोई भांडवली साठा हा 'अ' देशापेक्षा जास्त आहे $K_B > K_A$. त्याचप्रमाणे 'ब' या देशातील बचत फलन सुद्धा 'अ' या देशापेक्षा उच्च आहे, Sf $(K_B)$ > Sf $(K_A)$. वरील आकृतीमध्ये $S_B$ या बिंदूपाशी 'ब' या देशातील Sf $(K_B)$ वक्र हा ४५° अंश रेषेला छेदतो. हा छेदनबिंदू 'ब' या देशाची स्थिर अवस्था निश्चीत करतो. तसेच $S_A$ हा छेदन बिंदू 'अ' या देशाची स्थिर अवस्था निश्चत करतो. कारण या बिंदूपाशी Sf $(K_A)$ वक्र हा ४५° अंश रेषेला छेदतो. हे असे दर्शविते की कमी बचत दर आणि दरडोई भांडवलाचा कमी साठा असलेल्या गरीब देशापेक्षा उच्च बचत दर आणि दरडोई भांडवलाचा जास्त साठा असलेल्या श्रीमंत देशात वेगवान दराने वृद्धी / वाढ होते.

**अनुभवजन्य प्रमाण / प्रायोगिक दाखला (Empirical Evidence) :**

बॅरो, बॉगोल, डोव्रीक इ. अर्थशास्त्रज्ञांनी अनुच्छेद आकडेवारीच्या (cross - Sectional Data) आधारावर सशर्त अभिसरण गृहीतकाचे परीक्षण केले.

बॅरो यांनी असे दाखवून दिले की जे देश जास्त गुंतवणूक करतात त्या देशाला वेगाने वृद्धी होते. परंतु पुढे त्यांनी असे म्हटले की, उच्च गुंतवणूकीचा वृद्धीवर होणारा परिणाम हा अस्थायी / क्षणीक असतो, कारण अशा देशांमध्ये दरडोई उत्पन्न जास्त / उच्च असेल, पण वृद्धी दर उच्च नसेल, हे असे सुचविते की देश हे सशर्त एकवटतात (converge).

## ४.५ अंतर्जात वृद्धी सिद्धांत (THE ENDOGENOUS GROWTH THEORY)

अंतर्जात वृद्धी सिद्धांत हा अर्थव्यवस्थेला दीर्घकालीन वाढ (वृद्धी) विषद करणारा नवा सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार दीर्घकालीन वृद्धी दर हा अंतर्जात घटकांवर अवलंबून असतो. याउलट नवसनातनवादी वृद्धी सिद्धांतानुसार हा वृद्धीदर बाह्य घटकांवर अवलंबून असतो. सोलो - स्वान नवसनातन वृद्धी सिद्धांत सुद्धा उत्पादनाचा दीर्घकालीन वृद्धी दर स्पष्ट करतो. त्यांच्या मते उत्पादनाचा दीर्घकालीन वृद्धी दर हा दोन बाह्य घटकांवर अवलंबून असतो. एक म्हणजे लोकसंख्या वाढीचा दर आणि दुसरे म्हणजे तांत्रिक प्रगतीचा दर आणि तो बचत दराच्या स्वतंत्र (अनवलंबी) आहे. नवसनातन सिद्धांतात काही धोरण निहातार्थता आहे (Policy Implications) जेव्हा दीर्घकालीन वृद्धी दर हा बाह्य घटकांवर अवलंबून असतो. रोजर यांनी सांगितल्याप्रमाणे बाह्य तांत्रिक बदल आणि बाह्य लोकसंख्या वाढ / वृद्धी यांवर आधारित सिद्धांतामध्ये सरकारने (शासनाने) काय केले यानी कधीही फरक पडत नाही.

नवीन वृद्धी सिद्धांताने नवसनातन वृद्धी सिद्धांतावर फक्त टीका नाही केली, तर विकास प्रतिमानामध्ये अंतर्जात तांत्रिक प्रगतीचा घटक घालून त्याचा विस्तार केला. अंतर्जात वृद्धी सिद्धांत हे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी विकसीत केले. उदा. ॲरो, रोमर, ल्युकास इ.

**अंतर्जात वृद्धी सिद्धांत (The Endogenous Growth Theory) :**

अंतर्जात वृद्धी सिद्धांत हे गुंतवणूक दरातून निर्माण होणारी तांत्रिक प्रगती, भांडवल साठ्याचा आकार आणि मानवी भांडवलाचा साठा यावर भर देतात. हे नवीन वृद्धी सिद्धांत खालील गृहीतकांवर आधारलेले आहेत.

**गृहीतके (Assumptions) :**

१) बाजारात अनेक उद्योगसंस्था (Firms) असतात.

२) ज्ञान किंवा तांत्रिक प्रगती ही विना-प्रतिस्पर्धी (Non-Rival) वस्तू आहे.

३) सर्व उत्पादन घटक एकत्र घेतले असता त्यात वाढता अनुमाप प्रत्यय आढळतो आणि एकल घटक घेतला तर स्थिर अनुमाप प्रत्यय आढळतो.

४) लोक ज्या गोष्टी करतात त्यातून तांत्रिक प्रगती होत असते. याचा अर्थ तांत्रिक प्रगती ही लोकांच्या नव कल्पना निर्मितीवर अवलंबून असते.

५) अनेक व्यक्ती आणि उद्योगसंस्था यांच्यात बाजार शक्ती (Market Power) असते आणि त्यांनी लावलेल्या शोधांपासून त्यांना नफा मिळतो. हे गृहीत उत्पादनाच्या वाढत्या अनुमाप प्रत्ययापासून आले आहे आणि त्यामुळे अपूर्ण स्पर्धा निर्माण होते.

वरील गृहीते विचारात घेता आपण खालील सिद्धांत मांडतो.

### ४.५.१ रोमरचा अंतर्जात वृद्धी सिद्धांत (Romer Endogeneous Growth Model) :

रोमर याने ॲरोच्या सिद्धांताशी तफावर दाखविणारा आपला एक वेगळा अंतर्जात सिद्धांत १९८६ मध्ये प्रथम मांडला. तो ‘Learning by Investment’ या नावाने सादर केला गेला. त्यांनी असे गृहीत धरले की ज्ञान निर्मिती हे गुंतवणूकीचे जोड फळ आहे किंवा ज्ञान निर्मिती हे गुंतवणूकीचे जोड उत्पादन किंवा परिपाक (side product) आहे. रोमर यांनी उत्पादन फलन मांडताना ‘ज्ञान’ हे साधन / निविष्ठी (Input) म्हणून घेतले. रोमर यांचे उत्पादन फलन खालीलप्रमाणे आहे.

$$Y = A(R)\,F\,(R_i, K_i, L_i)$$

$Y =$ एकूण उत्पादन / उद्दिष्टी (aggregate output)

$A =$ संशोधन आणि विकास कार्यापासून मिळणारा ज्ञानाचा सार्वजनिक साठा (public stock of knowledge)

$R_i = i$ उद्योगसंस्थेची संशोधन आणि विकास कार्यावर केलेल्या खर्चापासून मिळणारा परिणाम साठा

$K_i$ and $L_i = i$ उस्त्रोगसंस्थेचा भांडवल साठा आणि श्रम साठा

या सिद्धांतानुसार नवीन ज्ञान हा दीर्घकालीन वृद्धीचा अंतिम निर्धारक आहे. हा निर्धारक, संशोधन तंत्रज्ञानातील गुंतवणूकीनुसार ठरविला जातो. संशोधन तंत्रज्ञान हे घटत्या प्रत्ययाचे / प्रमाणाचे प्रदर्शन करते. याचा अर्थ संशोधन तंत्रज्ञानातील गुंतवणूक ही ज्ञान दुप्पट करणार नाही. त्याचप्रमाणे, संशोधन तंत्रज्ञानात गुंतवणूक करणारी उस्त्रोगसंस्था ही ज्ञानवाढीची / ज्ञानवृद्धीची अनन्य लाभार्थी (exclusive beneficiary) असू शकत नाही. एकस्व अधिनियम संरक्षणातील (Patent Protection) अपुरेपणामुळे इतर उद्योगसंस्था सुद्धा नवीन ज्ञानाचा उपयोग करुन घेतील आणि आपल्या उत्पादनात वाढ करतील. वाढलेल्या ज्ञानामुळे झालेल्या वस्तूंच्या उत्पादनात आपल्याला वाढता प्रत्यय दिसून येतो. रोमर यांनी संशोधन तंत्रज्ञानातील गुंतवणूकीस अंतर्जात घटक असे मानले.

### ४.५.२ लुकासचा अंतर्जात वृद्धी सिद्धांत (Lucas Endogeneous Growth Theory):

उझावा (Uzawa) यांनी मानवी भांडवलातील गुंतवणूकीवर आधारीत अंतर्जात वृद्धी प्रतिमान विकसित केले, जे पुढे ल्युकास यांनी वापरले. ल्युकास यांनी असे गृहीत धरले की, शिक्षणातील गुंतवणूक ही मानवी भांडवलाच्या उत्पादनास कारणीभूत ठरते. शिक्षणातील गुंतवणूक ही वृद्धी प्रक्रियेमधील निर्णायक निर्धारक असते. ल्युकास यांनी मानवी भांडवलाचा अंतर्गत परिणाम (प्रभावी)आणि बाह्य परिणाम (प्रभाव) यात फरक केला आणि सांगितला. प्रशिक्षण घेत असलेल्या प्रत्येक कामगारांच्या उत्पादकतेत वाढ होते. ते कामगार अधिक उत्पादनक्षम होतात. हा झाला अंतर्गत परिणाम (प्रभाव). याउलट भरभराट / भरमसाठ वाढ (Spillover) भांडवलाच्या उत्पादकतेतील वाढ आणि अर्थव्यवस्थेतील इतर कामगारांच्या उत्पादकतेतील वाढ हे बाह्य परिणाम (प्रभाव). भौतिक भांडवलातील गुंतवणूकीपेक्षा मानवी भांडवलातील गुंतवणूकीमुळे भरभराट परिणाम (Spillover) होतो आणि त्यामुळे तंत्रज्ञानाच्या

पातळीमध्ये वाढ होते. त्यामुळे उद्योगसंस्थेतील उद्दिष्टी (Output) हा खालील आकार (form / रचना) घेतो.

$$Y_i = A(K_i) \bullet (H_i) \bullet H^e$$

इथे, $A =$ तांत्रिक गुणांक

$K_i, H_i =$ भौतिक आणि मानवी उद्दिष्टी (inputs) ज्यांचा वापर वस्तू उत्पादन करण्यासाठी केला जातो.

$H =$ अर्थव्यवस्थेतील मानवी भांडवलाची सरासरी पातळी

$e =$ मानवी भांडवलाच्या बाह्य परिणामांची ताकद दाखविणारा मापदंड आहे.

ल्युकास यांच्या प्रतिमानानुसार प्रत्येक उद्योगसंस्था ही स्थिर अनुमाप प्रत्ययास सामोरी जाते, तर संपूर्ण अर्थव्यवस्था ही वाढत्या अनुमाप प्रत्ययास (increasing returns) सामोरी जाते. करत करत शिकणे (Learning by doing), नोकरीतील प्रशिक्षण (on the job training) आणि सांडवण परिणाम (spillover effect) हे मानवी भांडवलात सामावले आहे किंवा यात मानवी भांडवलाचा समावेश असतो. अर्थव्यवस्थेतील एकूण मानवी भांडवलापेक्षाही, मानवी भांडवलाच्या सरासरी पातळीमुळे प्रत्येक उद्योगसंस्थेचा फायदा होतो. अर्थव्यवस्थेतील ज्ञान आणि कौशल्य यांची सरासरी पातळी हा आर्थिक बुद्धीचा निर्णायक निर्धारक आहे.

इतर उद्योगसंस्थांनी साठविलेलेल / जमविलेले ज्ञान (Documulated Knowledge) किंवा अनुभव यापेक्षा अर्थव्यवस्थेतील ज्ञानाची सरासरी पातळी आणि कौशल्य हे आर्थिक वृद्धीचे निर्धारक आहेत. या सिद्धांतानुसार संस्थांच्या गुंतवणूक तंत्रज्ञान हा उद्योगसंस्थांच्या गुंतवणूक निर्णयाचा अंतर्जात रितीने पुरविलेला परिणाम (Side Effect) आहे. वापरणाऱ्यांच्या दृष्टिकोनातुन तंत्रज्ञानाला सार्वजनिक वस्तू म्हणून मानले गेले. याचा परिणाम म्हणून, उद्योगसंस्था या किंमत घेणाऱ्या म्हणून मानल्या जाऊ शकतात आणि पूर्ण स्पर्धेप्रमाणे इथेसुद्धा अनेक उस्त्रोगसंस्था समतोलात असू शकतात.

## ४.६ रोमर यांचे तांत्रिक बदल प्रतिमान (ROMER'S MODEL OF TECHNOLOGICAL CHANGE)

रोमर यांच्या १९९० मधील अंतर्जात तांत्रिक बदल विवेचनात (Endogenous Technical Change) कल्पना / संकल्पना उत्पादनातील विशेष म्हणून संशोधन क्षेत्राला ओळखले गेले. रोमर यांच्या मते कल्पना / संकल्पना या नैसर्गिक साधनांपेक्षाही जास्त महत्त्वाच्या असतात. यासाठी त्यांनी जपान या देशाचे उदाहरण दिले. नैसर्गिक साधनांची कमतरता असून सुद्धा जपान या देशाने नवीन पाश्चिमात्य कल्पना आणि तंत्रज्ञान यांचा खुलेपणाने स्विकार केला. नवीन तंत्रज्ञानासाठी व कल्पनांसाठी जपान नेहमीच खुला (Open) आहे. मेजी युगात (Meija Era) जपानने अमेरिकेतून यंत्रसामग्री आयात केली. नंतर ती यंत्रसामग्री सुटी-सुटी करुन ती कशी कार्य करते, याचा अभ्यास केला आणि नंतर त्यांचे चांगले नमुने उत्पादित केले. म्हणून अर्थव्यवस्थेच्या वृद्धीसाठी कल्पना (ideas) खूप आवश्यक आहेत. या कल्पनांमुळे उत्पादनाचे नवीन व सुधारीत नमुने मिळू लागले.

रोमर यांच्या मते नवीन ज्ञान हे उत्पादन प्रक्रीयेमध्ये तीन प्रकारे प्रवेश करतात. नवीन अर्धसिद्ध निवीष्ठी (input) उत्पादनासाठी अर्धसिद्ध वस्तू / माल (goods) क्षेत्रामध्ये नवीन रचना (Design) वापरणे. अंतिम क्षत्रात, श्रम, मानवी भांडवल आणि उपलब्ध उत्पादक टिकाऊ हे अंतीम वस्तू तयार करतात आणि नवीन रचना ही ज्ञानाचा एकूण साठा वाढविते. ज्यामुळे संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या मानवी भांडवलाची उत्पादन क्षमता वाढते.

**गृहीतके (Assumptions) :**

रोमरचा सिद्धांत हा खालील गृहीतांवर आधारलेला आहे.

१) तांत्रिक बदलांमुळे आर्थिक वृद्धी होते.

२) तांत्रिक बदल हा अंतर्जात आहे.

३) अर्थव्यवस्थेमध्ये तांत्रिक बदल उपलब्ध करुन देण्यात बाजार प्रोत्साहने / प्रेरणा महत्त्वाची भूमिका बजावतात.

४) नवीन रचनेच्या (design) शोधासाठी मानवी भांडवलाची निर्दिष्ट गुणवत्ता आवश्यक असते.

६) नवीन रचनेचा शोध लावणाऱ्या उद्योगसंस्थेसाठी ज्ञान (किंवा नवरचना) हे अंशतः वगळता येणारे आणि ठेवून घेण्याजोगे असते, असे गृहीत धरण्यात आले. समजा एखाद्या संशोधकाने नवीन रचनेचे एकस्व (patent) मिळविले असेल, तर त्याच्या परवानगीशिवाय दुसरे कोणीही ते वापरु किंवा विकू शकत नाही. दुसऱ्या बाजूने इतर संशोधकांना हे स्वातंत्र्य असते की ते एकस्व रचनेचा (patented design) अभ्यास करतील आणि आवश्यक ते ज्ञान प्राप्त करुन घेतील. म्हणून एकस्व (patents) ही उद्योगसंस्थांना संशोधन आणि विकास प्रक्रियेत कार्यरत राहण्यास प्रोत्साहन देतात.

७) तंत्रज्ञान हे नॉन-रायव्हल (Non-rival) निविष्टी (Input) आहे. एका उद्योगसंस्थेच्या वापरामुळे दुसऱ्या संस्थेच्या वापराला अटकाव करता येत नाही. एखादी उद्योगसंस्था जर एखादे तंत्रज्ञान वापरत असेल तर दुसऱ्या उद्योगसंस्थेला त्याच्या वापरापासून रोखता येत नाही.

८) अतिरिक्त खर्च आणि निविष्टीच्या मूल्यात घट न करता वेगवेगळ्या वेळी उद्योगसंस्था या नवीन रचनेचा / ज्ञानाचा वापर करु शकतात.

९) असे गृहीत धरले गेले की विद्यमान रचनेच्या वापरातील कमी खर्च हा नवीन रचना करण्याच्या खर्चावर नियंत्रण ठेवते व तो खर्च कमी करते.

१०) जेव्हा उद्योगसंस्था या संशोधन आणि विकास प्रक्रियेत गुंतवणूक करतात आणि नवीन रचनेचा शोध लावतात. तेव्हा तिथे बाह्यता (externalities) होतात. ज्या खाजगी करारााद्वारे अंतर्गत बनविल्या जातात.

**प्रतिमान (The Model) :**

वरील गृहीतांनुसार (गृहीतांच्या आधारे) रोमरचे प्रतिमान हे खालील तांत्रिक उत्पादन फलनाद्वारे मांडता येते.

$$\Delta A = F\left(K_A, H_A, A\right)$$

$\Delta A =$ वाढते तंत्रज्ञान

$K_A =$ नवीन रचना (किंवा तंत्रज्ञान) तयार करण्यासाठी केलेली भांडवली गुंतवणूक

$H_A =$ नवीन रचनेच्या संशोधन आणि विकास प्रक्रियेमध्ये वापरलेले मानवी भांडवल

$A =$ विद्यमान रचनेचे तंत्रज्ञान

$F =$ तंत्रज्ञानासाठी उत्पादन फलन

उत्पादन फलन असे दाखविते की तंत्रज्ञान हे अंतर्जात आहे. जेव्हा नवीन रचनांसाठी संशोधन आणि विकास प्रक्रियेमध्ये मानवी भांडवल वापरले जाते. तेव्हा तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात वाढते म्हणजे $\Delta A$ मोठे असते. नवीन रचनांच्या शोधासाठी जेव्हा संशोधन प्रयोगशाळेमध्ये आणि साधनांमध्ये जास्त भांडवल गुंतवले जाते. तेव्हा तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात वाढ होते. पुढे विद्यमान तंत्रज्ञान $(A)$ हे नवीन तंत्रज्ञानाच्या $(\Delta A)$ उत्पादनासाठी प्रोत्साहन देते. तंत्रज्ञानामुळे तयार झालेले घन सांडवण परिणाम हे इतर उद्योगसंस्थाद्वारे वापरले जातात. भौतिक भांडवल वापर, मानवी भांडवल आणि विद्यमान तंत्रज्ञान यांच्याद्वारे नवीन तंत्रज्ञान (ज्ञान, रचना) यांचे उत्पादन वाढविले जाते.

## नवीन वृद्धी सिद्धांताच्या मर्यादा (Limitations / Criticism of New Growth Theory) :

नवीन वृद्धी सिद्धांत हा नवसनातन वृद्धी सिद्धांतापेक्षा जास्त सुधारलेला / उन्नत आहे, असे म्हटले जाते. परंतु तरीही या सिद्धांताच्या काही मर्यादा (व टीका) खाली नमूद केल्या आहेत.

१) स्कॉट आणि अेयुबॅच यांच्या मते, नवीन वृद्धी सिद्धांतात मांडलेल्या काही महत्त्वाच्या घटनांचा अंश आपल्याला ॲडम स्मिथ आणि कार्ल मार्क्स (वाढता अनुमाप) यांच्या लिखाणात आढळतो.

२) श्रीनिवासन यांच्या मते, नवीन वृद्धी सिद्धांतामध्ये काहीच नवीन गोष्टी आढळून येत नाहीत. त्यांनी मांडलेल्या वाढता अनुमाप आणि घटकांची अंतर्जावता या कल्पना नवसनातन आणि कॉल्डोर यांच्या सिद्धांतातून घेतल्या आहेत.

३) फिशर यांनी नव वृद्धी सिद्धांतावर टीका करताना असे सांगितले की, हा सिद्धांत फक्त उत्पादन फलन आणि स्थिर स्थिती (institutions) या गोष्टींवरच आधारलेला आहे.

४) ओल्सन यांच्या मते नवीन / नव वृद्धी सिद्धांतामध्ये मानवी भांडवलाच्या भूमिकेवर अतिरिक्त भर दिला आहे आणि संस्थांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले गेले आहे.

५) नव वृद्धी सिद्धांताच्या अनेक प्रतिमानांमध्ये भौतिक भांडवल आणि मानवी भांडवल यातील फरक स्पष्ट केला गेला नाही. उदा. रोमरच्या सिद्धांतानुसार आर्थिक वृद्धीमध्ये भांडवली वस्तू महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यांनी असे गृहीत धरले की, मानवी भांडवल जमा होत जाते आणि जेव्हा ते भौतिक भांडवलामध्ये सामावले जाते तेव्हा ते प्रेरणादायी (driving force) होते.

६) मॅनक्वी, Weil यांनी असे सांगितले की, भौतिक आणि मानवी भांडवल संचय हे चिरस्थायी आर्थिक वृद्धी घडवून आणू शकत नाही.

## ४.७ मानवी भांडवल (HUMAN CAPITAL)

आर्थिक विकासात मानवी भांडवल खूप महत्त्वाची भूमिका बजावते. ॲडम स्मिथ, वेबलन आणि मार्शल या अर्थशास्त्रज्ञांनी सुद्धा उत्पादनामध्ये मानवी भांडवलाचे महत्त्व विशद केले आहे. ॲडम स्मिथ यांनी देशाच्या स्थिर भांडवल साठ्यामध्ये रहिवाशांनी प्राप्त (संपादित) केलेल्या आणि उपयोगी क्षमतांना समाविष्ट केले. वेबलन यांच्या मते, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य यांच्याशिवाय भौतिक भांडवलाचा उत्पादक म्हणून वापर होऊ शकत नाही. मार्शल यांनी शिक्षणाला राष्ट्रीय गुंतवणूक मानले. मार्शल यांच्या मते मानवी भांडवलाती गुंतवणूक ही सर्व भांडवलातील गुंतवणूकीपेक्षा जास्त उपयुक्त आहे. त्यामुळे अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या मते मानवी भांडवलातील कमी गुंतवणूकीमुळे अविकसित देशात वाढीचा / वृद्धीचा दर कमी आहे. जोपर्यंत या देशांमध्ये ज्ञान, शिक्षण, तांत्रिक सुधारणा, कौशल्य यांचा प्रसार होत नाही तो पर्यंत भौतिक भांडवलाची उत्पादकता सुद्धा वाढणार नाही. विकासासाठी नैसर्गिक साधने आणि भौतिक भांडवल आवश्यक असते. पण हे दोन्ही घटक हे फायदेशीरपणे वापरण्याचे कार्य श्रमीकांकडूनच केले जाते, म्हणून मानवी भांडवल महत्त्वाचे ठरते. नैसर्गिक साधन आणि भौतिक भांडवल कसे वापरायचे आणि किती प्रमाणात वापरायचे आणि आर्थिक विकास कसा साधायचा, हे श्रम बळाच्या म्हणजे श्रमीकांच्या गुणवत्तेवर अवलंबुन असते. यालाच मानवी भांडवल असे म्हणतात.

मानवी भांडवल म्हणजे श्रमीकांची गुणवत्ता. मानवामध्ये असलेल्या उत्पादकतेला मूर्त स्वरूप देणे, मानवी भांडवलामध्ये अपेक्षित आहे. यामध्ये शिक्षण, नोकरीतील प्रशिक्षण, वैद्यकीय सेवा, आरोग्य सेवा या सर्वांमुळे निर्माण होणाऱ्या कौशल्य, ज्ञान, कल्पना, चांगले आरोग्य इत्यादींचा समावेश होतो. देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील उपलब्ध असलेल्या कामगार वर्गाच्या किंवा कामगार शक्तीच्या रचनेवर अवलंबून असतो. एका विशिष्ट (कमी) पातळीमुळे फक्त मुलभूत शिक्षण हे विकासाला बदली देऊ शकत नाही. अर्थव्यवस्थेमध्ये आवश्यक असलेल्या विविध कामगार शक्तिंचा पुरवठा करण्याचे काम शिक्षणामुळे होणे गरजेचे आहे. म्हणूनच मानवी भांडवल हे मनुष्यबळाच्या विविध पातळ्यांकडे निर्देश करते. मानवामध्ये असलेल्या उत्पादन क्षमतेच्या देणगीला मानवी भांडवल असे म्हणतात. औपचारिक शिक्षण, नोकरीतील शिक्षण, सुधारीत आरोग्य आणि मनोवैज्ञानिक कल्याण या सर्वांमुळे मानवी भांडवल वाढते. जर एखाद्या देशतील लोक जर सुशिक्षित, चांगले पोषीत, कुशल आणि सुदृढ असतील तर त्या देशात जास्त मानवी भांडवल आहे असे म्हणतात.

### मानवी भांडवलातील शुल्टझचे विचार / मत (Schultz views on Human Capital):

टी. डब्ल्यु शुल्ट्झ यांनी मानवी भांडवल विकसित करण्याचे पाच मार्ग सांगितले.

१) आरोग्य सुविधांची तरतूद करणे की ज्याचा परिणाम लोकांच्या आर्युमानावर, सामर्थ्यावर, शक्तीवर आणि चैतन्यावर होतो.
२) नोकरीतील शिक्षणाची (on-job-training) तरतूद की ज्यामुळे कामगार शक्तीचे कौशल्य वाढते.
३) प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षण व्यवस्थेचे आयोजन करणे.
४) प्रौढांसाठी अभ्यास आणि विस्तार कार्यक्रम / उपक्रम
५) बदलत्या नोकरीच्या संधीच्या अनुशंगाने कुटुंबांना स्थलांतर सुविधा उपलब्ध करुन देणे.

**आर्थिक विकासामध्ये मानवी भांडवलाची भूमिका (Role of Human Capital in Economic Development) :**

मानवी भांडवल हा आर्थिक वृद्धीचा मुलभूत स्त्रोत आहे. मानवी भांडवल हा वाढती उत्पादकता आणि तांत्रिक प्रगतीचा स्त्रोत आहे. मानवी भांडवलाच्या प्रगतीचा दर हा विकसित आणि अविकसित देशातील फरकाचा महत्त्वाचा भाग आहे.

**१) संशोधन आणि विकास प्रक्रीयेला प्रोत्साहन देणे आणि प्रतिभा-पलायन (Brain-drain) वर नियंत्रण ठेवणे (Encourage research and development and control Brain-drain):**

मानवी भांडवल हे संशोधित आणि विकास प्रक्रियेला प्रोत्साहन / प्रेरणा देते. यात अनेक सांडवण परिणाम आहेत. मानवी भांडवल हे नवीन वस्तू आणि तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी संशोधक आणि तंत्रज्ञ यांना प्रोत्साहन देते. मानवी भांडवल हे विद्यापीठे व इतर संस्थांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देते. मानवी भांडवलाचा देशातील बौद्धिक वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे देशातून प्रतिभा-पलायन होत नाही. देशामध्ये संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण झाले की चांगल्या संधीसाठी दुसऱ्या देशात जाणाऱ्या बुद्धीमान लोकांचे प्रमाण कमी होते. मग त्यांच्या प्रातिभांचा उपयोग देशातील विकास कार्यासाठी करुन घेता येतो.

**२) लोकसंख्या नियंत्रणात मदत (Helps in Population Control) :**

शैक्षणिक सुविधांद्वारे मानवी भांडवल निर्मिती होत असते. साक्षरता, मुख्यत्वेकरुन महिला साक्षरतेचा जननदर आणि बालमृत्यु दरावर इष्ट परिणाम होतो. साक्षरतेच्या उच्च पातळीमुळे जननदर आणि बालमृत्यु दर यांमध्ये घट होते. याचा परिणाम लोकसंख्या नियंत्रण राखण्यात होतो.

**३) लोकांची उच्च कार्यक्षमता (High Efficiency of People) :**

आरोग्य सेवा तरतुदींमुळे मानवी भांडवलामध्ये सुधारणा होते. आरोग्य सेवा तरतुदींमुळे आयुर्मानात सुधारणा होते, त्याच्यात वाढ होते, त्याचबरोबर पौष्टिक आहारामुळे लोकांच्या कार्यक्षमतेत वाढ होते, पौष्टिक आहारामुळे लोकांची शारीरिक आणि बौद्धिक कार्यक्षमता वाढते, त्यात सकारात्मक सुधारणा होते. या सर्व बाबींमुळे आर्थिक वृद्धी घडून होते.

**४) चांगली जीवन गुणवत्ता (Better Quality of Life) :**

आयुर्मान आणि साक्षरता दरातील सुधारणा आणि बालमृत्यु दरामधील घट यामुळे मानवी भांडवलात वाढ होते. मानवी भांडवलातील ही वाढ देशातील लोकांच्या उत्तम जीवन गुणवत्तेची खात्री देते. चांगली जीवन गुणवत्ता हे सर्व आर्थिक घडामोडींचे / व्यवहारांचे अंतिम उद्दिष्ट आहे.

**५) संसाधनांचा वापर (Resource Utilisation) :**

भौतिक भांडवल आणि बाकी सर्व संसाधने ही आर्थिक वृद्धीमध्ये महत्त्वाचे कार्य पार पाडतात. परंतु त्यांचा वापर हा मानवी कार्यक्षमतेवर अवलंबून असतो. म्हणून मानवी भांडवलातील गुंतवणूक महत्त्वाची असते.

**६) जास्त परतावा (Higher Returns) :**

मानवी भांडवलातील गुंतवणूक ही दीर्घकाळपर्यंत जास्त परतावा देत राहते. अर्थात यासाठी मानवी भांडवल अद्ययावत (updating) करणे आवश्यक असते. ही सर्व दीर्घकालीन गुंतवणूक आहे.

**७) आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास (Economic Growth and Economic Development) :**

मानवी भांडवलातील गुंतवणूकीमुळे ज्ञान, कौशल्य, साक्षरता, संशोधन आणि विकास प्रक्रिया, आरोग्य इ. सर्व गोष्टीमध्ये वाढ व सुधारणा होते. या सर्वांमुळे गरीबी, असमानता, बेरोजगारी या सर्व समस्यांवर मात करता येते. त्यामुळे आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास जलद होण्यात मदत होते.

**८) श्रमीकांच्या गुणवत्तेत वाढ (Improvement in Quality of Labour) :**

आर्थिक विकास हा फक्त श्रमीकांच्या संख्येवर अवलंबून नसतो तर तो त्यांच्या गुणवत्तेवरसुद्धा अवलंबून असतो. खरतरं ही गुणवत्ता संख्येपेक्षा जास्त महत्त्वाची असते. श्रमीकांच्या गुणवत्तेतील सुधारणा ही आर्थिक विकासाचे मोठे साधन आहे. श्रमीकांच्या गुणवत्तेतील सुधारणा हे आर्थिक विकासाचे साधनही आहे आणि परिणामसुद्धा (cause and effect). आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वृद्धी अधिक बदल (Economic Growth + Change). म्हणजेच आर्थिक विकास = आर्थिक वृद्धी + बदल. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर सर्व क्षेत्रातील बदल, राजकीय स्थिरता, या सर्व गोष्टी आर्थिक विकासासाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत. यासाठी शिक्षण आणि आरोग्य यामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

## ४.८ प्रश्न (QUESTIONS)

१) तांत्रिक बदलाचे हिक्सचे वर्गीकरण स्पष्ट करा.
२) तांत्रिक बदलाचे किंवा विकासाचे हॅरॉडचे वर्गीकरण स्पष्ट करा.
३) रोमरचा अंतर्जात वृद्धी सिद्धांत स्पष्ट करा.
४) मानवी भांडवल ही संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट करा.

## ४.९ संदर्भ ग्रंथ (REFERENCES) :

१. Basu, Kaushik (1998) Analytical Development Economics, New Delhi.
२. Ray. Debraj (2004) Development Economics, New Delhi.

❖❖❖❖

**घटक-३**

**५**

# विकासाचे सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र - I

**घटक रचना :**


५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ ग्रामीण बाजाराचे विभाजन

५.३ ग्रामीण भू बाजार

५.४ ग्रामीण श्रमबाजाराचे विभाजन

५.५ ग्रामीण भांडवल बाजाराचे विभाजन

५.६ ग्रामीण पतपुरवठा बाजार विभाजन

५.७ सारांश

५.८ प्रश्न

५.९ संदर्भग्रंथ


## ५.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- ग्रामीण श्रम बाजाराचे विभाजन समजावून घेणे.
- ग्रामीण पतपुरवठा बाजाराचे विभाजन समजावुन घेणे.
- ग्रामीण भू-बाजाराची संकल्पना समजावून घेणे.

## ५.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

या प्रकरणात आपण ग्रामीण बाजाराचे विभाजन कशा पद्धतीने केले जाते, हे पाहणार आहोत. जागतिक अर्थव्यवस्थेचा विचार केला तर असे लक्षात येते की, काही देशांच्या अर्थव्यवस्था या विकसित आहेत, तर काही देशांच्या मागासलेल्या आहेत आणि म्हणून अशा अर्थव्यवस्थांचा विकास घडवून आणण्यासाठी त्या बाजारपेठांचा विकास घडवून आणणे आवश्यक ठरते. या बाजारामध्ये श्रम बाजार, जमीन बाजार, भांडवल बाजार, पतपुरवठा बाजार यांचा प्रामुख्याने समावेश होतो. या वरील सर्व बाजारांचा अभ्यास या प्रकरणात आपण करणार आहोत. विशेषतः या वेळी बाजाराचे विभाजन, साधनांची वैशिष्ट्ये, सूक्ष्म वित्तपुरवठा, सूक्ष्मलक्षी

कौटुंबिक जननदर सिद्धांत, ग्रामीण पतपुरवठा बाजार तसेच संस्था आणि विकास या घटकांचे सूक्ष्म अध्ययन या प्रकरणात करणार आहोत.

## ५.२ ग्रामीण बाजाराचे विभाजन (SEGMENTATION OF RURAL MARKET)

ग्रामीण बाजाराचे विभाजन करण्याची मुख्य समस्या म्हणजे बाजाराचे विभिन्न जिनसी स्वरूप. बाजाराचे स्वरूप विषम असूनही बाजारातील उपभोक्ता त्यांच्या सर्वसाधारण गरजा, सवयी, रुढी, परंपरा, पसंती इत्यादी आधारावर विभाजन करीत असतो. ग्रामीण बाजाराचे विभाजन ही अशा प्रकारची प्रक्रिया आहे, त्यामध्ये संभाव्य ग्रामीण बाजारपेठेची सामान्य गरज आणि वैशिष्ट्ये असलेल्या उपभोक्त्याचे विशिष्ट उपबाजारात विभाजन करणे होय. ग्रामीण बाजाराचे विभाजन ही ग्रामीण बाजारपेठेत खरेदी-विक्री व्यवहार यांचे डावपेच लागू करण्यासाठीची प्रारंभिक पायरी आहे. एकदा का बाजाराचे विभाजन झाले की विक्रेत्याने योग्य विपणन साधनाचे ओळखलेल्या उपभोक्त्याच्या गटांना लक्ष्य केले की, लक्ष्यित विभागानुसार कंपनीचे उत्पादन योग्य स्थितीत येईल. बाजार विभाजन ही बाजाराच्या विविध भागांच्या प्रतिसाद लक्षणांमधील फरक ओळखून मर्यादित विपणन साधनांकडून अधिकाधिक बाजारात प्रतिसाद मिळविण्याची एक पद्धत आहे. हे बाजार व्यवस्थापकाचे महत्त्वाचे व प्रभावी साधन आहे. बाजार विभाजन म्हणजे बाजाराचे उपविभाजन म्हणजेच ग्राहकांचे एकजिनसी उपसंच जिथे कोणतेही उपसंच निश्चितपणे वेगळ्या बाजार मिश्रणासह पोहोचण्यासाठी लक्ष बाजार म्हणून निवडले जाऊ शकते. अशा बाजार विभाजनाच्या व्याख्या वेगवेगळ्या अर्थतज्ज्ञांनी करण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकन मार्केटिंग असोसिएशनच्या मते, "बाजार विभाजन म्हणजे विशिष्ट कंपनीची समाप्ती होऊ शकणारी विशिष्ट एक समान वैशिष्ट्ये असलेल्या ग्राहकांच्या विखुरलेल्या बाजारात विभागणे होय." फिलिप कोटलर यांच्या मते, "बाजार विभाजन म्हणजे मार्केटचे विभाजन हे उपभोक्त्याच्या एकजिनसी समूहात विभाजित करणे आहे, जिथे कोणतेही उपसंच निश्चितपणे विपणन मिश्रणाने गाठण्यासाठी बाजार लक्ष म्हणून निवडले जाऊ शकते." विल्यम जे. स्टँटन यांच्या मते, "बाजार विभाजनामध्ये उत्पादनासाठी एकूण वैविध्यपूर्ण बाजार असणे आणि त्यास अनेक उपबाजारामध्ये विभागणे किंवा त्यातील प्रत्येक बाबींमध्ये महत्त्व एकजिनसी असल्याचे दिसून येते."

### ३.२.१ ग्रामीण बाजार विभागणीची वैशिष्ट्ये (Features of Segmented Rural Market):

**१) मोजण्या योग्य (Measurable) :**

बाजाराची एकूण क्षमता मोजण्यासाठी बाजार विभाजन मोजण्या योग्य असणे आवश्यक असते. विभाजनातील चले यातील फरक स्पष्ट आणि मोजण्या योग्य असणे आवश्यक ठरते. विभाजनाचा आकार, नफा आणि इतर संबंधित लक्षणे मोजण्यायोग्य आणि माहिती प्राप्त करण्याच्या दृष्टीने योग्य असणे आवश्यक आहे. जर ही माहिती उपलब्ध नसेल तर विभाजन करणे शक्य नाही. बाजारपेठेतील ग्राहक व ग्राहकांची संबंधीत विस्तृत माहिती नसल्यामुळे उत्पादन (कंपनी) ग्रामीण बाजारपेठेत प्रभावीपणे पोहचू शकत नाही. विशेषतः बाजारपेठेचा आकार, ग्राहकांची खरेदी शक्ती आणि ग्रामीण बाजारपेठेतील ग्राहकांसंबंधी सर्व माहितीच्या अभावामुळे हे शहरी बाजारपेठेसारखे मानले गेले. या ग्रामीण बाजारविभागणीसाठी वापरली

जाणारी बहुमूल्य माहिती प्राप्त व्हावी, यासाठी आज ग्रामीण कंपन्यांचा विविध कंपन्यांकडून अभ्यास केला जात आहे.

## २) प्रवेश करण्यायोग्य (Accessible) :

ग्रामीण बाजाराचे विभाजन हे परवडणाऱ्या किंमतीवर सध्याच्या नेटवर्कद्वारे लोकांना प्रवेश करण्यायोग्य असावे. ग्रामीण बाजारपेठेचे विभाजन करताना विभाजन केलेल्या बाजारपेठेतील वस्तू वितरित करण्यासाठी सोयीस्करपणे लोकांपर्यंत पोहोचविता येतील हे सुनिश्चित करणे महत्त्वाचे असते. ग्रामीण बाजारपेठांच्या दुर्गमतेमुळे विक्रेत्यांनी ग्रामीण बाजारपेठांपेक्षा शहरी बाजारपेठां पसंत केल्या आहेत. परंतु अलीकडेच पायाभूत सुविधांच्या सुधारणांमुळे आणि खेड्यांच्या संपर्कात आणि वितरणाच्या इतर नवीन वाहिन्यांमुळे ग्रामीण बाजारपेठा अधिक सुलभ होत आहेत. व्हॅंनद्वारे व ग्रामीण वितरक आणि किरकोळ दुकांनाना भेट देणाऱ्या ग्रामीण विक्रेत्यामार्फत ग्रामीण बाजारपेठेतील उपभोक्त्यापर्यंत पोहोचता येते.

## ३) भिन्नता (Different) :

बाजाराचे विभाजन हे विभिन्न प्रकारचे असले पाहिजे, जर ते विभिन्न विपणन नकाशावर भिन्न प्रतिक्रिया दर्शवित असतील तर त्या बाजारांचे विभाजन खंडित करण्याचा काही उपयोग होत नाही. जेव्हा विभाजनाला विशिष्ट वैशिष्ट्ये असतात तेव्हाच ते विक्रेत्याला अधिक आकर्षित करतात. काही उत्पादनाच्या बाबतीत ग्रामीण ग्राहकांचा प्रतिसाद वेगवेगळ्या विभाजनाला शहरी ग्राहकांपेक्षा वेगळा असू शकतो. उदा. मोटारसायकल खरेदी करताना ग्रामीण उपभोक्ता टिकाऊपणा, मायलेज व दुचाकीवरुन वजन वाहून नेण्याच्या क्षमतेला अधिक महत्त्व देतात, तर शहरी ग्राहक शैली, शक्ती, सौंदर्यशास्त्र याचा विचार करतात.

## ४) खरा किंवा ठळक (Substantial) :

ग्रामीण बाजाराचे विभाजन फायदेशीर होण्यासाठी त्याचा आकार पुरेसा मोठा असावा. या विभाजनात एक तर मोठ्या संख्येने हलके वापरकर्ते किंवा मोठ्या संख्येने भारी वापरकर्ते यांचा समावेश असावा, जेणेकरुन विपणन कंपनीला त्याचा फायदा होईल. यात अशा लोकांचा समावेश असावा ज्यांचा समज शिकणे, वृत्ती, पसंती आणि क्रियांमध्ये ते समान आहेत. त्याप्रमाणे त्यांना लपविणे सोपे जाईल. ग्रामीण भाग एकसंघ नसतात. प्रदेशानुसार त्यात फरक आढळतो. उदा. भाषा, विचारसरणी आणि वर्तन म्हणून स्वतंत्र प्रचार कार्यक्रमाची रचना करणे अवघड आहे. कारण ग्राहकांचा आकार इतका मोठा नाही त्यामुळे प्रयत्न करणे शक्य नाही.

## ५) सामान्य विचार (General Concidaration) :

उपरोक्त गोष्टी व्यतिरिक्त विभाजनामध्ये वृद्धीक्षमता असणे फायदेशीर असते. जे स्पर्धक आहेत, ते उत्पादनाशी थेट लढा देत नाहीत त्यामुळे कोणताही असामान्य धोका नाही. बाजाराच्या विभाजनासाठी उत्पादन संस्थेकडे पर्याप्त संसाधने असणे आवश्यक आहे. विभाजनाच्या निकषानुसार विशिष्ट उत्पादनाच्या वितरणासंदर्भात शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना यांचे पालन करणे आवश्यक आहे.

## ५.३ ग्रामीण भू बाजार (RURAL LAND MARKET)

ग्रामीण विकासासाठी व शेती विकासासाठी ग्रामीण भू बाजारपेठेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. विशेषतः मध्य आणि पूर्व युरोप व कॉमनवेल्थमधील संक्रमित देश जेथे मागील १५ वर्षांमध्ये जमीन सुधारणा, शेतमालाची पुनर्रचना आणि जमिनीच्या वापराची सध्याची रचना पूर्णपणे दुरुस्त केली आहे. भारतातही अनेक प्रकारच्या शेतजमिनी सुधारणा घडवून आणल्या आहेत. एका विशिष्ट व्यक्तीच्या मालकीच्या जमिनीचे वारसा हक्क कायद्यानुसार तसेच विपणन आणि गहाण, बक्षीस इत्यादी व्यवहारांमुळे अनेक व्यक्तींमध्ये विभाजन होण्याच्या प्रक्रियेला जमिनीचे विभाजन असे म्हणतात. बाजारांमध्ये जमिनीचे विभाजन होण्यास अनेक घटक जबाबदार असतात, त्यांची वेगवेगळी कारणे आपल्याला येथे सांगता येतील.

**भू विभाजनाची कारणे -**

**१) व्यक्तिगत स्वातंत्र्याची वृत्ती :**

भारतात ब्रिटिशांची सत्ता होती त्यावेळी खाजगी मालमत्ता व व्यक्तिगत स्वातंत्र्य यावर अधिक लक्ष देण्यात आल्यामुळे व्यक्तिगत स्वातंत्र्याची वृत्ती आपल्या देशात वाढली. परंतू यामुळे भारतातील कुटुंबव्यवस्था मोडकळीस आली आणि स्वार्थ बळावू लागला. या स्वार्थी भावनेतून आपल्या वाटणीची जमीन स्वतंत्र व वेगळी असावी अशी वृत्ती जोर धरु लागली. यापूर्वी जर पाहिले तर प्रत्येकाचा जमिनीवरील हक्क वेगळा असूनही सर्वजण लागवड मात्र मिळून करत असते. आता विभाजनाची वृत्ती बळावू लागल्यामुळे जमिनीचे वाटप होऊन वैयक्तिकरित्या जमिनीच्या तुकड्याची स्वतंत्र लागवड करु लागला. त्यामुळे जमिनीचा आकार दिवसेंदिवस लहान होत गेला.

**२) हस्तकला व्यवसायांचा ऱ्हास :**

प्रगत आणि यांत्रिकीकरणाने सुसज्ज असणाऱ्या उद्योगांशी स्पर्धा करणे शक्य नसल्याने भारतातील अनेक हस्तकला व्यवसाय यांचा ऱ्हास झालेला दिसतो. या व्यवसायातून रोजगार गमावलेल्या कारागीर वर्गाला आपला व आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी शेती हाच एकमेव मार्ग दिसू लागला. यातून जमिनीचे विभाजन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले.

**३) लोकसंख्या वाढ :**

भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार करता लोकसंख्येमध्ये होणारी प्रचंड वाढ हे जमीन विभाजनाचे प्रमुख कारण मानले जाते. वाढत्या लोकसंख्येमुळे वारसदारांची वाढती संख्या हे जमीन विभाजनाला कारणीभूत ठरणारा घटक म्हणून पाहिला जातो. वारसा हक्कामुळे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात शेतजमिनीचे विभाजन मोठ्या प्रमाणावर झाले आहे. देशातील ६७.५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते, आणि त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेती व्यवसायावर अवलंबित्वाचे प्रमाण खूप असल्याने आणि जमिनीचे विभाजन यामुळे शेतीची उत्पादकता कमी झालेली दिसते कारण या व्यवसायात प्रच्छन्न बेरोजगारी आढळते.

**४) औद्योगीकरणाचा अभाव :**

देशात औद्योगीकरणाचा दर लोकसंख्येच्या वाढीच्या दराबरोबर असायला पाहिजे तो वाढताना दिसत नाही त्यामुळे शेतजमिनीवर अतिरिक्त भार पाडून जमिनीचे विभाजन होत आहे.

**५) वारसा हक्क कायदा :**

वारसा हक्क कायदा हे एक जमिनीच्या विभाजनाचे प्रमुख कारण आहे. वारसा हक्कामुळे जमिनीच्या एकूण क्षेत्रफळाच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींमध्ये समान वाटप केले जाते. त्यामुळे जमिनीचे तुकड्या-तुकड्यामध्ये विभाजन होऊन जमिनीचा वापर योग्य पद्धतीने उत्पादनासाठी करता येत नाही.

**जमिन विभाजनाचे तोटे :**

**१)** विभाजनामुळे जमिनीचे लहान-लहान तुकड्यांमध्ये वाटप झाल्याने जमीन मालकाला मिळणाऱ्या जमिनीचा आकार खूपच लहान असतो. अशा लहान तुकड्यामुळे उपलब्ध असणारे तुटपुंजे भांडवल पूर्णपणे उपयोगात आणणे शक्य होत नाही. काही वेळा नांगरणीच्या वेळी बैल वळविण्यासाठीही पुरेशी जागा मिळत नाही.

**२)** जमिनीच्या विभाजनामुळे जमीन मालकाला कुंपण घालनेही परवडत नाही. कुंपण नसल्यामुळे अशा जमिनीचा शेतीसाठी वापर केला जात असेल तर गुरे-ढोरे पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी करतात; तसेच अशा विभाजनामुळे ट्रॅक्टर खरेदी करणे, विहीर खोदणे यासारख्या कायमस्वरूपी सुधारणा करणे शेतकऱ्यांना परवडणाऱ्या नसतात.

**३)** भूमी विभाजनामुळे सरहद्द व जाण्यासाठी पायवाट याकरिता जमीन खूप वाया जाते. त्यामुळे एकूण उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट होते. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यास जमीन मालक तयार होत नाही. काहीवेळा सरहद्द ओलांडण्यावरुन भांडणेही होतात.

**४)** देखरेख ठेवणे शक्य नसते - भू विभाजनामुळे जमीन मालकाला प्रत्येक शेत जमिनीच्या तुकड्यावर देखरेख ठेवणे शक्य होत नाही. त्यासाठी अधिक खर्च करावा लागतो.

**भू विभाजन कमी करण्यासाठीच्या उपाययोजना :**

विभाजनामुळे शेती व्यवसायावर अनिष्ट परिणाम झालेला दिसतो. हे अनिष्ट परिणाम कमी करण्यासाठी काही उपाययोजना करणे आर्थिक विकासासाठी फायदेशीर ठरेल. त्यापैकी प्रमुख उपाययोजनांचा विचार आपण या ठिकाणी करणार आहोत.

**१) संयुक्त पद्धतीने लागवड :**

भू विभाजनामुळे शेतजमिनीचे अपखंडन झाले. जमिनीचे तुकड्यां-तुकड्यांमध्ये एकाच कुटुंबात विभाजन होऊन जमिनीचा शेती उत्पादनासाठी एकत्रित वापर करता येत नाही. अशा वेळी प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीचा जमिनीवरील हक्क वेगळा असला तरी लागवडीसाठी जमीन एकत्र करुन संयुक्त लागवड पद्धतीचा स्वीकार करावा.

**२) मोठ्या मुलाकडे जमीन वाटणीच हक्क :**

वारसाहक्क कायदा रद्द करुन किंवा बदलून त्या ठिकाणी कुटुंबातील सर्वात मोठ्या मुलांकडे जमीन वाटणीचा हक्क दिल्यास विभाजनाचा प्रश्न सुटेल. यामुळे कुटुंबातील इतर मुलांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरु करण्याचा प्रश्न निर्माण होईल. नाहीतर भूमिहीन शेतमजुरांची संख्या वाढेल.

### ३) सामूहिक शेती :

भूमी विभाजनाचा मार्ग अवलंबण्यापेक्षा शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचा अवलंब केल्यास यांत्रिक पद्धतीने शेती मोठ्या प्रमाणावर करता येईल. त्यामुळे वैयक्तिक किंवा खाजगी मालमत्तेचा हक्क नष्ट होऊन शेतीच्या विकासाला हातभार लागेल.

### ४) सहकार तत्वावर शेती :

सहकार तत्त्वावर आधारित शेती हा शेती क्षेत्रातील सुवर्णमध्य मानला जातो. वाडीतील किंवा गावातील कुटुंबांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेतीची लागवड केल्यास जमिनीचे विभाजन होणार नाही. शेतीमध्ये यांत्रिकीकरण किंवा कायमस्वरूपी सुधारणा करणेही शक्य होईल आणि आर्थिक विकासाला हातभार लागेल.

### ५) जमीन एकत्रीकरणाचा मार्ग किंवा तुकडे जोड कार्यक्रम :

एकाच व्यक्तीच्या मालकीची असलेली परंतु इतस्ततः पसरलेली जमीन एकाच ठिकाणी आणण्याच्या उपक्रमाला तुकडेजोड असे म्हणतात. हा तुकडेजोड कार्यक्रम सक्तीने किंवा सहकारी तत्त्वांचा अवलंब करुन राबविता येतो. अशा प्रकारचे प्रयत्न पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश व विशेषता बडोदे संस्थांनामध्ये करण्यात आले. त्या संदर्भात १९२७ मध्ये स्वतंत्र कायदा संमत होऊन एकत्रीकरणाची सुरुवात झाली. या १९२७ च्या कायद्यान्वये ग्रामीण भागातील एकूण खातेदारांपैकी दोन तृतीयांश खातेदारांनी एकत्र येऊन या प्रकारचा अर्ज केल्यास सरकार त्या गावातील भूमीच्या एकत्रीकरणाची आखणी करते व तशा प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी करते. भारतात १९६६ मध्ये ५४ लक्ष एकर जमिनीचे एकत्रीकरण करण्यात आले.

## ५.४ ग्रामीण श्रमबाजाराचे विभाजन (SEGMENTATION OF LAND MARKET)

अल्पविकसित, विकसनशील व अविकसित देशांच्या श्रम बाजाराचा विचार केला असता असे लक्षात येते की, विकसित देशांच्या तुलनेत अल्पविकसित व विकसनशील अर्थव्यवस्थेत श्रम पुरवठा हा अधिक आहे. त्यामुळे विकसनशील व अविकसित देशात श्रम बाजाराचे स्वरूप भिन्न स्वरूपाचे आढळते. श्रम बाजार हा वस्तू व सेवांच्या बाजारासारखा नसून बाजारातील समतोल हा श्रमाची मागणी व पुरवठा यातून प्रस्थापित होत असतो. बाजारातील वर्तन वस्तू बाजारापेक्षा भिन्न स्वरूपाची असते. या प्रक्रियेने एखाद्या विशिष्ट प्रकारच्या श्रमाचा पुरवठा व त्या श्रमाला असणारी मागणी यांच्यात समतोल निर्माण होतो. त्या प्रक्रियेला श्रम बाजार असे म्हणतात. बाजारही श्रमाची मागणी व पुरवठा यांच्यात समायोजन घडवून आणणारी एक यंत्रणा असते. अशा श्रम बाजाराच्या व्याख्या वेगवेगळ्या अर्थतज्ज्ञांनी वेगवेगळ्या पद्धतीने केलेल्या आहेत.

### ग्रामीण श्रमबाजाराच्या व्याख्या (Definitions of Rural Labour Market):

**१)** "विशिष्ट प्रकारच्या श्रमाचा पुरवठा आणि श्रमाची मागणी यांचे संतुलन साधणारी प्रक्रिया म्हणजे श्रम बाजार होय." (The labour market is a process by which supplies of a particular types of labour and demand for that types of labour balance or seek to obtain a balance.)

**२)** "ज्या भौगोलिक भागात राहण्याचे ठिकाण न बदलता श्रमिक रोजगार सहजपणे बदलू शकतात, अशा आर्थिकदृष्ट्या एकात्मिक भौगोलिक प्रदेशास श्रमदान बाजार असे म्हणता येईल." (Labour market is an economically integrated geographical unit within which workers may readily change jobs without changing their place of residence.)

**३) लॉईड रेनोल्ड्स यांच्या मते,** "विविध कौशल्य असलेले आणि अर्थव्यवस्थेतील नानाविध कामात रस असणाऱ्या श्रमिकांचे योग्य वर्गीकरण करणारी एकमेव पद्धती म्हणजे श्रम होय."

**श्रम बाजाराची वैशिष्ट्ये :**

श्रम बाजार हा वस्तू बाजार व भांडवल बाजार यापेक्षा भिन्न असतो. वस्तू बाजारात वस्तू व सेवांची तसेच भूमी बाजारात भूमीची मागणी व पुरवठा यांचे ग्राहक व विक्रेते येऊन व्यवहार पूर्ण करतात, परंतू श्रम बाजार ही एक प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये श्रमाचा पुरवठा व श्रमाची मागणी यांच्यात समतोल प्रस्थापित होत असतो. अशा श्रम बाजाराची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे -

**१) श्रम बाजाराचे स्थानिक स्वरूप :**

स्थलपरत्वे श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा हा मर्यादित असतो. सर्वसाधारणपणे श्रमिक वर्ग एका ठिकाणाहून अन्य ठिकाणी किंवा एका उद्योग संस्थेतून दुसऱ्या उद्योग संस्थेत काम करण्यास सहसा तयार होत नाही. श्रमिकांची गतिशीलता कमी असते. उद्योग संस्थेला विशिष्ट प्रकारची कौशल्ये आत्मसात केलेल्या श्रमिकांची आवश्यकता असते तो अधिक स्थानिक बाजारपेठेतून उद्योग संस्थेला प्राप्त होत असतो. उदाहरणार्थ साखर कारखान्यात काम करण्यास श्रमिक वर्ग हा त्याच भागात उपलब्ध होत असतो.

**२) मालक व श्रमिक यांच्यातील संबंध :**

इतर बाजाराप्रमाणे श्रम बाजारातील मालक व श्रमिक यातील संबंध तात्पुरते नसतात. यातील संबंधात व्यक्तिगत घटक महत्त्वाचे असतात. परंतू बाजारात व्यक्तिगत किंवा वैयक्तिक घटकांकडे दुर्लक्ष केले जाते.

**३) अपूर्ण स्पर्धेचे अस्तित्व :**

पारंपारिक अर्थशास्त्रज्ञांनी वस्तू बाजारपेठेप्रमाणे श्रमबाजारपेठेत पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व असते, असे गृहीत धरले आहे. परंतू वास्तवतः जगाच्या कुठल्याही बाजारपेठेत पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नाही जी मोठ्या प्रमाणावर आढळून येते ती अपूर्ण स्पर्धा. ह्या अपूर्ण स्पर्धेत मक्तेदारीयुक्त स्पर्धा व अल्पाधिकार बाजारपेठ मोठ्या प्रमाणात आढळते होय.

**४) श्रम वेतनाची निश्चिती :**

वेतनाची निश्चिती हे महत्त्वाचे श्रम बाजाराचे वैशिष्ट्ये आहे. विकसनशील देशात सुविधांच्या अभावामुळे अकुशल आणि असंघटित श्रमिक वर्गाला मिळणारे वेतन खूप कमी मिळते. श्रमिकांची अल्प वेतनावर काम करण्याची तयारी असते. तर श्रम बाजारात काही

ठराविक काळासाठी श्रमाचा मोबदला स्थिर राहण्याची प्रवृत्ती असते. मालक वर्गाला प्रत्येक श्रमाच्या मागणी पुरवठ्यातील बदलानुसार वेतनात बदल होऊ नये, असे वाटते.

**५) गुंतागुंतीचा श्रम बाजार :**

श्रम बाजार हा अधिक गुंतागुंतीचा असतो. वस्तू बाजारात ज्याप्रमाणे एखाद्या वस्तूची विक्री वेगवेगळ्या बाजारात केली तर किंमतीत फारसा फरक नसतो. परंतू श्रमबाजारात मात्र वेगवेगळ्या प्रदेशात मिळणारी किंमत वेगवेगळी असते. कोणत्याही व्यवसायात किंवा उद्योगात मिळणाऱ्या मोबदल्याबरोबर सभ्य वागणूक, गौरव, मोठेपणा व प्रतिष्ठा या बाबी कामाच्या ठिकाणी मिळणे आवश्यक असते.

**६) अर्थव्यवस्थेचा विस्तार :**

हे श्रम बाजाराचे महत्त्वाचे लक्षण आहे. भारतासारख्या देशाचा विचार केला तर कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण १३८ कोटी लोकसंख्येमागे ६७.५% एवढे आहे. त्यामुळे श्रमाचा मुबलक पुरवठा होतो. यामधील थोडे लोक मालक व व्यवस्थापक म्हणून काम पाहतात, तर उर्वरित लोक श्रमिक म्हणून काम पाहतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी श्रम या उत्पादन घटकाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो.

**७) भिन्न सौदाशक्ती :**

औद्योगिकरणामुळे उत्पादन संस्थांमधील श्रमिक वर्गाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसते. त्यामुळे सौदाशक्ती ही वाढताना दिसते. परंतु सौदाशक्ती ही भिन्न स्वरूपाची या बाजारात आढळते. व्यक्तिगत स्वरूपाची सौदाशक्ती कमी तर सामूहिक सौदाशक्ती ही अधिक असते. त्यामुळे मिळणाऱ्या लाभाचे प्रमाण सुद्धा भिन्न राहते.

**८) श्रमिकांच्या विविधता :**

श्रम बाजारात एकजिनसीपणा कधीच आढळत नाही. प्रत्येक श्रमिकाची कार्यक्षमता, कौशल्य, प्रशिक्षण, प्रामाणिकपणा यात भिन्नता आढळते. श्रमिकांच्या विविधता असल्याने मिळणाऱ्या वेतनात ही विविधता किंवा भिन्नता आढळते.

**९) अलवचिक श्रम पुरवठा :**

श्रम बाजारपेठेतील श्रमाचा पुरवठा हा लवचिक असतो. हा पुरवठा प्रामुख्याने श्रमाची संख्या व कार्यक्षमता यावर अवलंबून असतो. तसेच श्रमिकांचा पुरवठा हा लोकसंख्या वाढ किती प्रमाणात होते म्हणजेच मृत्यूदर व जन्मदर यातील बदल यावर अवलंबून असतो. अर्थव्यवस्थेतील व्यापार चक्रामुळे श्रमिकांच्या मागणीत बदल घडून आल्यास त्याचा परिणाम पुरवठ्यावर होतो.

**१०) उपभोक्त्याची बाजारपेठ :**

अर्थव्यवस्थेत कुशल कामगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. परंतु अकुशल कामगारांना रोजगार प्राप्तीसाठी मोठी स्पर्धा करावी लागते. त्यामुळे श्रम बाजारपेठ ही दोन प्रकारची सौदाशक्ती असलेली बाजारपेठ ओळखली जाते. मागणी अभावी श्रमिकांना आपला श्रम पुरवठा राखून ठेवता येत नाही.

**श्रम बाजाराचे प्रकार :**

श्रम हा उत्पादन प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा उत्पादन घटक म्हणून ओळखला जातो. या श्रमाचा पुरवठा अर्थव्यवस्थेत कुटुंब संस्थेकडून केला जातो. या श्रम बाजाराची व्याप्ती ही स्थानिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असते. अशा श्रम बाजाराचे प्रकार खालीलप्रमाणे -

**१) संघटित श्रम बाजार :**

संघटित श्रमबाजार हा श्रमिकांच्या सामूहिक सौदा शक्तीद्वारे कामगारांची आर्थिक स्थिती, काम करण्याची वेळ व परिस्थिती सुधारण्यासाठी एक प्रतिनिधी म्हणून एकत्रित श्रमिकांचे संघटन आहे. या संघटित श्रमिकांच्या समूहाला संघटना असे म्हणतात. अनेक विकसनशील व अल्पविकसित देशातील श्रम संघटना शिक्षण, आरोग्य, असमान प्रवेश व सामाजिक सुरक्षितता या बाबतीत त्रस्त आहेत. त्यामुळे अस्थिरता, कामगार व मालक संघर्ष निर्माण होतो. परंतु संघटित श्रम बाजारामुळे श्रमिकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी मदत झाली आहे.

**२) असंघटित श्रम बाजार :**

असंघटित श्रम बाजारात रोजगार विषयक अटी-शर्ती निश्चित नसतात, कारण कामगार वर्ग असंघटित असतो. त्यामुळे या असंघटित श्रमबाजारात श्रमिकांना मिळणाऱ्या सुविधाही अपुऱ्या असतात. भारतातील एकूण ६७.५% लोकसंख्येपैकी ९४% हिस्सा हा असंघटित क्षेत्राचा आहे. भारतातील असंघटित श्रमिक बाजार हा व्यवसाय, रोजगाराचे स्वरूप, सामाजिक वंचित गट आणि सेवा वर्गीकरणानुसार विभागला आहे. या असंघटित श्रम बाजारात लहान व सीमांत शेतकरी. भूमिहीन शेतमजूर, मच्छिमार, पशुपालन, विणकर, कारागीर, कामगार, तेल गिरणी कामगार इत्यादीचा समावेश होतो.

**३) अंतर्गत व बाह्य श्रम बाजार :**

जेव्हा श्रम बाजारात श्रमिकामध्ये ऊर्ध्वगामी गतिशीलता असते तेव्हा अंतर्गत श्रमबाजार अस्तित्वात येतो. एकाच उद्योग संस्थेतील श्रमिक एका पदावरुन दुसऱ्या उच्च पदावर जाण्याचा प्रयत्न करतात. पदोन्नतीसाठी श्रमिक प्रयत्नशील असतात. अधिक वेतन आणि इतर सवलती प्राप्त करण्यासाठी श्रमिकांची उच्च पदावर जाण्याची धडपड असते. अशा बाजाराला अंतर्गत श्रमबाजार असे म्हणतात.

एखाद्या उद्योग संस्थेत पदोन्नतीची कोणतीही शक्यता नसेल तर श्रमिक तो उद्योग संस्था सोडून अन्य उद्योग संस्थेत जाण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारच्या स्थलांतरास बाह्य श्रमबाजार असे म्हणतात.

**४) संरचीत व असंरचित श्रम बाजार :**

ज्या बाजारात प्रशासकीय नियंत्रण असते व कामगार संघटनांचा विशेष प्रभाव नसतो, अशा बाजाराला संरचित श्रमबाजार असे म्हणतात. या श्रमिक बाजारात सरकारी कर्मचारी, प्रस्थापित उद्योगसंस्थांमधील कामगार संघटनेचे सभासद असलेले कामगार आदींचा यामध्ये समावेश होतो.

एक मालक व एक कामगार अशी अवस्था ज्या बाजारात असते अशा बाजाराला असंरचित श्रम बाजार असे म्हणतात.

**५) प्राथमिक व दुय्यम बाजार :**

प्रा. पी.बी, डॉ. डोरींजर आणि प्रा. एम.जे. पीरे यांनी श्रम बाजाराचे हे वर्गीकरण केले आहे. प्राथमिक श्रम बाजारात उच्च वेतन रोजगार, सातत्यता, कामावर योग्य वातावरण अशी लक्षणे आढळतात, अशा बाजारपेठेस प्राथमिक श्रम बाजार असे म्हणतात. दुय्यम बाजारात कमी वेतन, रोजगार असातत्यता, कामावर प्रतिकूल परिस्थिती अशी परिस्थिती असते, अशा बाजारास दुय्यम बाजार असे म्हणतात.

## ५.५ ग्रामीण भांडवल बाजाराचे विभाजन (SEGMENTATION OF RURAL CAPITAL MARKET)

भारतीय भांडवल बाजार हा अर्थव्यवस्थेत गुंतवणूकीसाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देण्याचे काम करतो. या बाजारात मध्यम व दीर्घकालीन स्वरूपाची कर्जे दिली व घेतली जातात. अर्थव्यवस्थेचा विकास साध्य करायचा असेल तर भांडवल संचय आवश्यक आहे. हा भांडवल संचय फक्त भांडवल बाजारात शक्य आहे. कारण भांडवल संचय यामुळे शेती, उद्योग, सेवा, व्यापार, वाहतूक इत्यादी क्षेत्रातील गुंतवणूक वाढून उत्पादनाला चालना मिळते व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. भांडवल बाजार म्हणजे अशी संस्थात्मक यंत्रणा जिथे मध्यमकालीन व दीर्घकालीन कर्जाच्या देवाणघेवाणीचे व्यवहार चालतात.

**भांडवल बाजाराची व्याख्या :**

**१) रुद्र व दत्त यांच्या मते,** "मध्यम व दीर्घकालीन कर्जाचे व्यवहार करणाऱ्या धनको व ऋणकोच्या संघटित स्वरूपाला भांडवल बाजार असे म्हणतात."

**२) लिविंगस्टन यांच्या मते,** "भांडवलाच्या प्रवाहावरील नियंत्रणाद्वारे महत्तम उत्पन्न प्राप्त करुन देणाऱ्या क्षेत्राकडे भांडवल घडविणारी यंत्रणा म्हणजे भांडवल बाजार होय."

**३) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,** "भांडवल बाजार म्हणजे असे केंद्र की जे तरल ऐवजाचे दीर्घकालीन व्यवहार करते."

**भांडवल बाजाराची रचना :**

भारतीय भांडवल बाजाराच्या रचनेत प्रामुख्याने विविध घटकांचा समावेश होतो. यात सरकारी प्रतिभूमि बाजार, औद्योगिक प्रतिभूमि बाजार, विकास वित्तसंस्था व वित्तीय मध्यस्थ इत्यादी.

**१) सरकारी प्रतिभूमि बाजार :**

यालाच गिल्ट एज्ड बाजार असेही म्हणतात. या बाजारात सरकारी व निमसरकारी रोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या बाजाराला सरकारी प्रतिभूमि बाजार असे म्हणतात. या बाजारात ट्रेझरी बिल, सरकारी कर्जरोखे, बाँड्स यांची खरेदी विक्री केली जाते. या बाजारात केली

जाणारी गुंतवणूक ही कमी उत्पन्न देणारी असली तरी सुरक्षित असते. प्रामुख्याने या बाजारात आर.बी.आय., व्यापारी बँका, बँकेतर वित्तीय संस्था उदा. LIC, IDBI, ICICI, GIC इत्यादींचा समावेश होतो.

**२) औद्योगिक रोखे बाजार :**

ज्या बाजारात उद्योग व्यवसाय स्थापन करण्यासाठी कंपन्या शेअर्स, डिबेंचर्स, बाँड इत्यादी विकून दीर्घकालीन भांडवल उभारणी करतात, या बाजारास औद्योगिक रोखे बाजार असे म्हणतात.

**अ) नवरोखे बाजार :**

याला नव्या प्रतिभूतीचा बाजार किंवा प्राथमिक भांडवल बाजार म्हणतात. पहिल्याच वेळेला काढलेल्या शेअर्स, डिंबेचर्स, बाँड्स इत्यादी स्वरूपात नवीन मौद्रिक भांडवल उभारणे हे प्राथमिक भांडवल बाजाराचे कार्य आहे.

**ब) दुय्यम रोखे बाजार :**

याला जुन्या प्रतिभूतीचा किंवा विद्यमान रोखे बाजार असे म्हणतात. एकदा प्रचलित झालेल्या कर्जरोख्यांची व्यक्ती-व्यक्ती मध्ये, संस्था-संस्थांमध्ये खरेदी विक्री करणाऱ्या बाजाराला दुय्यम रोखे बाजार असे म्हणतात.

**३) बँकेतर वित्तीय संस्था :**

खाजगी क्षेत्रातील उद्योगांना मध्यम व दीर्घकालीन कर्जपुरवठा करण्यासाठी या बँकेतर वित्तीय संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. उदा. भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ (IFCI) १९४८, भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ (ICICI) १९५५, भारतीय औद्योगिक विकास बँक (IDBI) १९६४, भारतीय औद्योगिक गुंतवणूक बँक (IIBI) १९९५ तसेच आयात-निर्यात बँक (EXIM) १९६२ इत्यादी. तसेच राज्य पातळीवर कर्जाची उभारणी करण्यासाठी राज्य वित्त महामंडळ (STC), राज्य औद्योगिक महामंडळ (SIC) या बँकेत्तर संस्था स्थापन करण्यात आल्या.

**४) वित्तीय मध्यस्थ :**

या वित्तीय मध्यस्थांमध्ये मर्चंट बँक, म्युचुअल फंड, विमा कंपन्या, पेन्शन निधी व प्राव्हिडंट फंड, पतदर्जा ठरविणाऱ्या संस्था, पत व हमी संस्था, व्हेंचर कॅपिटल कंपन्या व लीजिंग कंपन्या इत्यादींचा समावेश होतो. वेगवेगळ्या मार्गाने बचती गोळा करणे व दीर्घकालीन भांडवलाची गरज भागविण्याचे काम वित्तीय संस्थांकडून पार पाडले जाते. उद्योग संस्थांनी किंवा कंपन्यांनी नव्याने विक्रीसाठी काढलेल्या भागभांडवल याचे व्यवस्थापन करणे, अंडर राईटर म्हणून काम करणे तसेच लेझीम कंपन्यांच्या माध्यमातून भाडे तत्त्वावर अवजड यंत्रसामग्री पुरविणे या सेवा पुरविल्या जातात. भारतात सध्या वित्तीय संस्थांमध्ये म्युचुअल सहयोग निधीचा वाटा खूप मोठ्या प्रमाणावर आहे.

**भांडवल बाजाराची भूमिका (Role of Capital Market):**

देश स्वतंत्र झाल्यानंतर देशात दीर्घकालीन गुंतवणूकीसाठी तसेच भांडवल बाजाराचा विकास व्हावा यासाठी भांडवल बाजाराने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

**१) निधी उभारणे :**

१९५१ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते २०१७ च्या १२ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत देशात दीर्घकालीन भांडवलाची गरज भागविण्यासाठी आवश्यक असणारा निधी उभारण्याचे काम भांडवल बाजारातून करण्यात आले. यामध्ये व्यापारी बँका, जीवन विमा व यू.टी.आय. यासारख्या संस्थांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

**२) बचत गोळा करणे :**

भारतीय भांडवल बाजार कुटुंब, व्यक्ती, गुंतवणूकदार यांच्याकडून बचती गोळा करुन त्यांचे दीर्घकालीन भांडवलाची गरज भागविण्यासाठी गुंतवणूकीत रूपांतरण करण्याचे काम करतो. त्यासाठी या घटकांना आकर्षक व्याज व नफा मिळवून दिला जातो.

**३) कर्जाऊ निधीची उपलब्धता :**

भारतीय भांडवल बाजाराकडून दीर्घकालीन व मध्यमकालीन कर्ज उभारणी केली जाते. कालांतराने ही कर्जे परत केली जातात व पुन्हा नव्याने कर्ज घेतली जातात हे चक्र अव्याहतपणे चालू राहते. अशाप्रकारे भांडवल बाजारात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी निधी उपलब्ध केला जातो.

**४) विकासाला चालना देणे :**

भारतीय भांडवल बाजारात अल्प दरात भांडवल उभारणी केली जाते. या भांडवलाचा वापर उद्योगसंस्थेत दीर्घकालीन गुंतवणूक उभी करण्यासाठी केला जात असतो. त्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळते.

**५) विविध सेवांचा लाभ :**

भांडवल बाजारातील घटकांकडून यामध्ये गुंतवणूकदार, उद्योजक, व्यक्ती, संस्था, सरकार यांना विविध सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. उद्योगधंद्यांनी विक्रीस काढलेल्या भाग भांडवल, त्यांचे व्यवस्थापन, शेअर्स विक्रीतून किमान भांडवल गोळा करण्याची हमी देणे, जी तूट निर्माण होईल ती भरुन काढणे इत्यादी सेवा पुरविल्या जातात.

**६) मागासलेल्या प्रदेशाचा विकास :**

भांडवल बाजारातील काही संस्थांनी मागास विभागाचा विकास केलेला आहे. उदा. नाबार्डकडून ग्रामीण व अविकसित भागात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे कार्य करण्यात आले. यामध्ये रस्ते, जलसिंचन सुविधा, विद्युत पुरवठा इत्यादी.

**७) रोजगाराच्या संधी निर्माण करणे :**

भांडवल बाजाराच्या विकासामुळे सर्व क्षेत्रात उदा. शेती व संलग्न क्षेत्र, रस्ते, पूल बांधणे, उद्योगाची उभारणी करणे तसेच टेलीफोन, रेल्वे, जलवाहतूक, हवाई वाहतूक इत्यादी

अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आल्या. सध्या काही उद्योगांमध्ये १००% गुंतवणूकीला सरकारने परवानगी दिली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात विशेषतः मोठ्या उद्योगांची स्थापना केली जात आहे. उदा. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प.

**८) विदेशी भांडवलाचा प्रवाह :**

भांडवल बाजार हा विदेशी भांडवल देशात आकृष्ट करण्याचे कार्य करतो. म्हणून भारताने देशात गुंतवणूकीचे प्रमाण वाढावे, यासाठी "Make in Invest" यासारखे कार्यक्रम राबविले आहेत. त्यामुळे अनेक क्षेत्रात परकीय गुंतवणुकीचे प्रमाण वाढले आहे. आज अनेक क्षेत्रात उदा. पर्यटन क्षेत्र, हॉटेल व्यवसाय, पायाभूत सुविधा या क्षेत्रात १०० टक्के परकीय गुंतवणूकीची परवानगी सरकारने दिली आहे.

**९) आजारी उद्योगांचे पुनर्वसन :**

भांडवल बाजारातील विविध वित्तीय संस्थांनी जे उद्योग आजारी आहेत अशा उद्योगांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. अशा पुनर्वसनासाठी मोठ्या प्रमाणावर निधी आवश्यक असतो. यासाठी IDBI, ICICI, UTI यासारख्या संस्थांनी भांडवली मदत परकीय चलन स्वरुपात, कर्ज उभारणी प्रत्यक्ष भाग भांडवल खरेदी यासाठी आर्थिक मदत केली आहे. आज सरकारच्या अखत्यारी मध्ये कार्यरत असलेले उद्योग आजारी अवस्थेमध्ये आहेत. उदा. एअर इंडिया.

**१०) गुंतवणूकीच्या संधी :**

भांडवल बाजारामुळे सर्वसामान्य लोकांना भांडवल बाजारात बॉड्स, कर्जरोखे, डिबेंचर्स यामध्ये गुंतवणूकीची संधी उपलब्ध करुन दिली जात आहे.

## ५.६ ग्रामीण पतपुरवठा बाजार विभाजन (SEGMENTATION OF RURAL CREDIT MARKET)

जर ग्रामीण पतपुरवठा बाजार उत्तम प्रकारे स्पर्धात्मक व सहजतेने देशात कार्य करीत असतील तर त्यांच्या अभ्यासाची गरज भासणार नाही. परंतु भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार करता या ग्रामीण पतपुरवठा बाजाराचा जेवढ्या प्रमाणामध्ये विकास व्हायला पाहिजे तेवढ्या प्रमाणामध्ये झालेला दिसत नाही. कारण भारतात जवळपास ७०% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. त्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे आणि शेतीला पतपुरवठा करणाऱ्या संस्था देशामध्ये खूप कमी आहेत. त्यामुळे ग्रामीण पतपुरवठा बाजार पूर्ण स्पर्धेपासून खूप दूर आहे. या बाजारात मोठ्या प्रमाणावर अपूर्ण स्पर्धा आढळते. या बाजारात पतपुरवठा मागणी व पुरवठा यातून निश्चित होत असतो त्यावरुन व्याज दर निश्चित होत असतो.

**व्याख्या :**

ज्या बाजारात पत मागणी वक्र व पतपुरवठा वक्र एकमेकांना छेदतात तेथे किंमत निश्चती होते म्हणजेच व्याजदर निश्चित होतो. अशा बाजारास पतपुरवठा बाजार असे म्हणता येईल.

### ग्रामीण पतपुरवठा बाजाराचे वर्गीकरण :

सध्या ग्रामीण भागामध्ये पतपुरवठा करणाऱ्या काही संस्थात्मक संघटना असून त्यांच्या माध्यमातून माफक व्याजदरांमध्ये पतपुरवठा केला जातो. परंतु पूर्वीच्या काळी ज्यावेळी संस्थात्मक यंत्रणा पतपुरवठा करण्यासाठी अक्षम होत्या त्यावेळी बिगर संस्थात्मक यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणावर पतपुरवठा केला जात होता. परंतु हे बिगर संस्थात्मक घटक मोठ्या प्रमाणावर कर्ज घेणाऱ्या लोकांचे शोषण करायचे. कारण यांचा व्याजाचा दर खूप मोठा असायचा. ते २५% ते ५०% पर्यंत व्याज दर आकारत असत.

### ग्रामीण पतपुरवठ्याचे स्त्रोत / मार्ग :

ग्रामीण पतपुरवठ्याचे वर्गीकरण खालील स्त्रोतांच्या माध्यमातून स्पष्ट करता येते यामध्ये संस्थात्मक व बिगर संस्थात्मक असे वर्गीकरण केले जाते.

### अ) संस्थात्मक स्त्रोत / मार्ग :

#### १) सरकार (Government):

ग्रामीण भागात विशेषतः शेती क्षेत्रात कर्ज पुरवठा करणारा एक संस्थात्मक मार्ग म्हणजे सरकार होय. यावेळी ग्रामीण अर्थव्यवस्थेत दुष्काळ, महापूर किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती उग्र स्वरूप धारण करते, त्यावेळी अशा अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्याचे काम सरकारकडून केले जाते. अशावेळी सरकारकडून आर्थिक स्वरूपाची मदत केली जात असते.

#### २) सहकारी संस्था (Coopertive Institutions):

संस्थात्मक पतपुरवठ्याचा दुसरा सर्वात महत्त्वाचा मार्ग म्हणजे सहकारी संस्था होय ज्या सरकारच्या अधिपत्याखाली कार्य करतात. या सहकारी संस्थांमध्ये कार्यक्षमरीत्या पतपुरवठा करण्याची क्षमता आहे. भारतीय पतपुरवठ्यात सहकारी संस्थांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

#### अ) प्राथमिक सहकारी संस्था (Primary Cooperative Institutions):

प्राथमिक सहकारी पतसंस्था हा एक ग्रामीण भागातील पतपुरवठ्याचा स्त्रोत म्हणून ओळखला जातो. प्राथमिक सहकारी संस्था ही ग्रामीण भागातील सभासदांनी एकत्र येऊन ग्रामीण भागासाठी पुतपुरवठा करणारी संस्था म्हणून ओळखली जाते. ग्रामीण भागात सहकाराची व एकमेकांना मदत करण्याची भावना वाढीस लागावी, यासाठी या प्राथमिक सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात. प्राथमिक सहकारी संस्थेमध्ये सभासद हे भाग भांडवल पुरवीत असतात. प्रत्येक सभासदाला किमान रकमेचे काही भाग घ्यावे लागतात.

#### ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (Distric Central Cooperative Bank):

ही जिल्हा पातळीवर कार्यरत असणारी सहकारी पतपुरवठा संस्था असते. ही प्रामुख्याने प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना कर्जपुरवठा करीत असते. तसेच ती प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था व राज्य सहकारी बँक या मधला दुवा म्हणून काम पाहते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची रचना व कामकाज गुंतागुंतीचे असते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी सलग्नीत असलेल्या प्राथमिक संस्थांना अल्प, मध्यम व दीर्घकालीन स्वरूपाचा पतपुरवठा करण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती बँकेद्वारे केले जाते.

### क) राज्य सहकारी बँका / शिखर बँक (State Cooperative Bank):

सहकारी पतपुरवठ्याच्या त्रिस्तरीय रचनेत राज्य सहकारी बँकेचे महत्त्वाचे स्थान आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या स्तरावर राज्यातील राज्य सहकारी बँका काम पाहत असतात. जिल्हा मध्यवर्ती बँकांना कर्जपुरवठा करण्याचे महत्त्वाचे कार्य राज्य सहकारी बँका करीत असतात. राज्य सहकारी बँका या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व नाणेबाजार या मधला दुवा म्हणून काम पाहतात आणि बाजारातून कर्ज उभारुन ही बँक जिल्हा मध्यवर्ती बँकांना कर्जपुरवठा करते.

### ३) भूविकास बँका (Land Development Bank):

शेतीमध्ये कायम स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणण्यासाठी तसेच मोठी यंत्रसामग्री खरेदी करणे, नवीन जमीन खरेदी करणे, जलसिंचनाच्या सुविधा निर्माण करणे, यासाठी दीर्घकालीन पतपुरवठा आवश्यक असतो. हा पतपुरवठा करण्याचे काम भूविकास बँका करतात. सध्या भारतात भूविकास बँका अस्तित्वात नाहीत. परंतु पूर्वी भूविकास बँकांचे कार्य अनन्यसाधारण होते.

### ४) व्यापारी बँका (Commercial Bank):

भारतात शेती क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा पाया मानला जातो. तो पाया मजबूत बनविण्याचे काम पतपुरवठ्याच्या माध्यमातून केले जाते. या शेती क्षेत्राला केला जाणारा पतपुरवठा सहकारी संस्थांच्या माध्यमातून कमी होतो, तेव्हा तो पतपुरवठा करण्याचे कार्य व्यापारी बँका करतात. या बँका शेतीला अल्प, मध्यम व दीर्घकालीन कर्जपुरवठा अल्प व्याजदरात करतात.

### ब) बिगर संस्थात्मक स्रोत मार्ग (Non-Institutional Resources):

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात पतपुरवठा करणे हा ऐरणीचा विषय आहे. कारण शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने या शेती क्षेत्राला आवश्यक पतपुरवठा करण्याचे काम गेल्या ७० वर्षात संस्थात्मक संघटनांना जमले नाही. त्यामुळे आज भारतातही बिगर संस्थात्मक घटकांची मदत घ्यावी लागते. त्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर सध्या नसले तरी अनेक राज्यात या बिगर संस्थात्मक घटकांकडून काही प्रमाणात पतपुरवठा केला जातो. या मार्गांनी कर्जपुरवठा करणाऱ्या घटकांचा पुढील प्रमाणे समावेश केला जातो.

### १) नातेवाईक (Relatives) :

शेती क्षेत्रात बऱ्याच वेळा शेतकरी किंवा शेतमजूर आपल्या अडचणी सोडविण्यासाठी आपल्या जवळच्या नातेवाईकांकडून पैशाच्या स्वरूपात कर्ज काढतात. यात व्याजाचा दर कमी असतो. यामध्ये कर्ज देणारी व्यक्ती अगदी जवळची असल्याने काही वेळा बिनव्याजी कर्ज दिले जाते. असे कर्ज काढणारे लोक ग्रामीण भागातील भूमिहीन शेतकरी, शेतमजूर, सीमांत शेतकरी असतात.

### २) शेतकरी सावकार (Farmer Lender):

या प्रकारचा पतपुरवठा मोठे शेतकरी लहान शेतकऱ्यांना करीत असतात. मोठ्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याकारणाने गावातील लहान शेतकऱ्यांना अडचणींच्या वेळी कर्ज पुरवठा या मोठ्या शेतकऱ्यांकडून केला जातो. त्या मोठ्या शेतकऱ्यांना

शेतकरी सावकार म्हटले जाते. यांच्याकडे कर्ज देण्याचा कुठल्याही प्रकारचा परवाना नसतो. यांचा व्याजाचा दर धंदेवाईक सावकारांपेक्षा तुलनेने कमी असतो.

### ३) धंदेवाईक सावकार (Commercial Lender) :

धंदेवाईक सावकारांचा व्यवसाय हा पिढीजात असतो. हे सावकार कर्ज देताना कर्जदार त्याच्या परतफेडीच्या कार्यक्षमतेचा विचार करुन कर्जपुरवठा करीत असतात. कर्ज द्यायचे किंवा देऊ नये हा सर्वस्वी निर्णय या सावकारांवर अवलंबून असतो. परंतु ज्यावेळी कर्ज पुरवठा केला जातो. त्यावेळी व्याजाचा दर हा २५ टक्के ते ५० टक्के पर्यंत असतो त्यामुळे हे धंदेवाईक सावकार मोठ्या प्रमाणावर शेतकरी, शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण करीत असतात.

### ४) व्यापारी (Merchants) :

भारतात कर्ज पुरवठा करणारा आणखी एक बिगर संस्थात्मक स्त्रोत म्हणजे व्यापारी होय. हे व्यापारी शेतकऱ्यांच्या शेतावर पीक घेण्यासाठी पतपुरवठा करीत असतात. बऱ्याच वेळा हे व्यापारी शेतामध्ये पीक तयार झाल्यानंतर ते पीक व्यापाऱ्यांना देण्याचे बंधन असते. हे पिक व्यापाऱ्यांना विकून आलेल्या पैशातून कर्जाची परतफेड केली जाते. मात्र यामध्ये व्यापारी वर्गाकडून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला हा कमी असतो अशा वेळी हा व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे शोषण करीत असतो.

## ग्रामीण पतपुरवठा बाजाराची वैशिष्ट्ये (Features of Rural Credit Market):

### १) माहितीची मर्यादा (Limitation of Information):

पतपुरवठा बाजारामध्ये माहितीची मर्यादा हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. ग्रामीण पतपुरवठा बाजारात प्रामुख्याने दोन प्रकारच्या मूलभूत माहितीच्या मर्यादा असतात. एक म्हणजे कर्जाचा वापर कसा करावा यासंबंधी माहितीचा अभाव व दुसरे म्हणजे कर्जाची परतफेड निर्णयाच्या संदर्भात माहितीचा अभाव किंवा मर्यादा यामुळे ग्रामीण पतपुरवठा बाजार हा काहीवेळा पतपुरवठा करण्यास अयशस्वी ठरतो.

### २) विभाजन (Distribution):

ग्रामीण पतपुरवठा बाजाराचे दुसरे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पतपुरवठा बाजाराचे विभाजन होय. ग्रामीण पतपुरवठा बाजारात केला जाणारा पतपुरवठा हा वैयक्तिक घटकाकडून केला जात असतो. विशेषतः ग्रामीण सावकार निश्चित स्वरूपात वारंवार कर्जपुरवठा करीत असतात परंतु ते एका विशिष्ट क्षेत्राबाहेर कर्जपुरवठा करण्यास टाळाटाळ करतात.

### ३) परस्पर संबंध (Relations) :

परस्पर संबंध हे ग्रामीण पतपुरवठा बाजाराचे महत्त्वाचे लक्षण आहे. यामध्ये आपण परस्पर पतपुरवठ्याचे व्यवहार पार पाडू शकतो. विशेषतः आपल्या ग्रामीण भागात असणाऱ्या धूर्त सावकारांची प्रतिमा किंवा त्यांचे स्थान कमी करायचे असेल तर ग्रामीण भागात अत्यल्प व्याज दराने पतपुरवठा करणे हे आहे. बहुतांशी ग्रामीण भागातील सावकार त्यांचा एकमेव व्यवसाय म्हणून कर्जावर व्याज घेत नाहीत. यामध्ये श्रीमंत जमीनदार, दुकानकार किंवा पीक विक्रीचे व्यवहार करणारे व्यापारी यांचा समावेश होतो. विभाजित बाजारपेठेत हे जाणून आश्चर्य होऊ

शकत नाही. कारण जमीनदार बहुधा त्यांच्या भाडेकरु किंवा शेतमजुरांना श्रेय देतात जेथे हे जमीनदार किंवा व्यापारी शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांच्याकडून ते धान्य खरेदी करतात.

**४) रेशनिंग (Rationing):**

अनौपचारिक पतपुरवठा बाजारामध्ये कर्जदाराला कर्ज दात्याकडून किती प्रमाणात कर्ज पुरवठा केला जाऊ शकतो, याची मर्यादा दिलेली असते. म्हणजे किती प्रमाणामध्ये त्याचे वाटप केले जाऊ शकते, हे या बाजाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पहिल्या दृष्टिक्षेपात असे लक्षात येते की, कोणताही सावकार मोठ्या प्रमाणावर पतपुरवठा का करतो ? तथापि या ठिकाणी रेशनिंगचा अर्थ असा घेतला जातो की, चालू व्याजदरात एखादा कर्जदार अधिक कर्ज घेऊ ईच्छित असेल, परंतु तो ते घेऊ शकत नाही.

**५) अनन्यता (Diffentiability):**

अंतिमतः अनौपचारिक पत व्यवहारांमध्ये सामान्यतः सावकार यांना आवडत नाहीत की त्यांचे कर्जदार एका स्त्रोतापेक्षा अधिकाकडून कर्ज घेत असतात, ते आग्रह धरतात की कर्जदाराने त्यांच्याशी पूर्णपणे व्यवहार करावेत. म्हणजेच आवश्यक कर्जासाठी इतर कोणत्याही कर्जदाराने त्यांच्याशी संपर्क साधता कामा नये.

**६) व्याजदरातील फरक (Difference in Interest):**

औपचारिक व अनौपचारिक ग्रामीण पतपुरवठा बाजारांमध्ये व्याजाचे दर हे भिन्न असल्याचे आढळून आले. विशेषतः औपचारिक ग्रामीण पतपुरवठा बाजारांमध्ये व्याजाचे दर कमी, तर अनौपचारिक बाजारात व्याजाचे दर जास्त आहेत. भारतात हा व्याजदर २५ टक्के ते ५० टक्के पर्यंत दिसतो, तर पाकिस्तानात तो ७८.५ टक्के एवढा दिसतो.

## ५.७ सारांश (CONCLUSION) :

या प्रकरणामध्ये ग्रामीण बाजाराचे विभाजन स्पष्ट केले आहे. तसेच ग्रामीण बाजार विभागणीची वैशिष्ट्ये देखील अभ्यासली आहेत. ग्रामीण भू-बाजार, ग्रामीण भू-विभाजनाची कारणे व तसेच भू विभाजन कमी करण्यासाठी उपाययोजना देखील या प्रकरणामध्ये स्पष्ट केलेल्या आहेत.

## ५.८ प्रश्न (QUESTIONS)

१) ग्रामीण पतपुरवठा बाजाराचे विभाजन स्पष्ट करा.
२) ग्रामीण भांडवल बाजाराचे विभाजन स्पष्ट करा.
३) ग्रामीण श्रम बाजाराचे विभाजन स्पष्ट करा.
४) ग्रामीण भू-बाजाराची संकल्पना स्पष्ट करा.
५) ग्रामीण बाजाराचे विभाजन स्पष्ट करा.

## ५.९ संदर्भ ग्रंथ (REFERENCES) :


1. आर्थिक वृद्धी आणि विकास (२०११) प्रा. विठ्ठल सोनावणे व चंद्रमोहन जोशी (शेठ प्रकाशन)
2. वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र (२०११) - प्रा. डॉ. जे. एफ. पाटील (फडके प्रकाशन)
3. भारतीय अर्थव्यवस्था - श्री. निरंजन कोळंबे
4. व्यावसायिक अर्थशास्त्र - एच.एच. अट्रावलकर (शेठ प्रकाशन)
5. Basu Kaushik (1998), Analytical Development Economics, New Delhi.
6. Ray Debraj (2004), Developmen Economics, New Delhi.
7. www.Google.com


❖❖❖❖

## घटक-३

# ६

# विकासाचे सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र - II

**घटक रचना :**


६.० उद्दिष्टे

६.१ घरगुती पत बाजार

६.२ सूक्ष्म वित्त पुरवठा

६.३ सूक्ष्मलक्षी कौटुंबिक जन्मदर सिद्धांत

६.४ संस्था आणि विकास

६.५ सारांश

६.६ प्रश्न

६.७ संदर्भग्रंथ


## ६.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- सूक्ष्म वित्त पुरवठ्याचे महत्त्व समजून घेणे.
- सूक्ष्मलक्षी कौटुंबिक जननदर सिद्धांत अभ्यासणे.
- आर्थिक विकासाच्या वाढीवर संस्थांचा होणारा परिणाम अभ्यासणे.

## ६.१ घरगुती पत बाजार (HOUSEHOLD CREDIT MARKET)

जगातील बऱ्याच देशांमधील उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये घरगुती पतपुरवठा वेगाने वाढत आहे. हा घरगुती पतपुरवठा वाढीचा दर प्रमंडळ पतपुरवठ्यापेक्षा अधिक आहे. याला जबाबदार घटक म्हणजे कमी चलनात वाढ आणि व्याजदर, उच्च उत्पन्न पातळी, मालमत्तेच्या किंमती (उदा. गृहनिर्माण) आणि आर्थिक उदारीकरण होय. सध्याच्या काळात उदयोन्मुख देशांच्या बाजारपेठांमध्ये आर्थिक संकटानंतर प्रमंडळ पतपुरवठा कमी आणि उदयोन्मुख बाजारपेठेत प्रमंडळ क्षेत्रात दीर्घकालीन भांडवलाचा सहभाग तसेच परदेशी बँकांकडून देण्यात येणारे कर्ज यामुळे घरगुती पतपुरवठा वाढीचा दर हा प्रमंडळ क्षेत्रापेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे.

घरगुती पत बाजारामध्ये पतपुरवठा अधिक चांगल्या पद्धतीने झाल्याने या बाजारातील अस्थिरता कमी होते. गुंतवणूकीच्या अनेक संधी निर्माण होऊन लहान तसेच कौटुंबिक

